म. ग्रं. सं. ठाणे
विषय नाटक
वा. क्र. ३५८

आ. १९६ सन १९९८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
पु. नाव — ~~व्यक्यभाव~~
ले — मोहविलसित
विष. — नाटक

१९६
सं. क्र.

मोहविभासित

नाटक

ना. ८२०

१८३० सा

वा.आ.टक्के ८२८

ना: ३००

ना. ३५०

अनु - १०६

अनु - १०६

द्धीवर आहे, मी शुद्धीवर आहे" या वचनांला जितकें वजन द्यावयाचें तितकेंच " मात्सर्याब्धितरंगविक्लव " झालेल्या बिचाऱ्या **चंद्रकांता**च्या उक्तींना द्यावयाचें, हें त्याच्याही लक्षांत आलें नाहीं. तरी **सत्यव्रत** हा उतावीळ नव्हता; व्यवहार त्यास चांगला परिचित होता; त्यानें महाराजांस असें सांगितलें "मी **सुधन्व्यास** आपल्या ह्मणण्याप्रमाणें दूर करीन, परंतु पूर्ववत् आपण प्रसन्नमुद्रा धारण करावी. त्यास किंवा राजास आपल्या संशयाविषयीं बोलूं नये, व राज्ञीचा त्याग करूं नये"— हें वचन राजाच्या तोंडापुरतेंच होतें, असें दिसतें. कारण राजा गेल्यावर त्यानें आपला निषेध केला आहे, आणि **इंदुमती**च्या पातिव्रत्याविषयीं त्यानें यत्किंचित्‌ही संशय प्रगट केला नाहीं. " प्रभुनिदेश न मी जरि तो करीं, प्रभु तरी मम जीवित संहरी, " इतक्या पल्लयावर जरी मजल आली होती तरी विष देऊन हात विटाळण्याचा बेत त्यानें रहित करून स्वदेशत्याग पत्करिला ! याप्रकारें " त्यजुनि गृहजनांतें, मानवित्तें तयानें, असुख बहु वरीलें सुप्रसन्नें मनानें. " ही **चंद्रकांता**चीच उक्ति होय, परंतु मोहपटलें वितळून गेल्यावरची ! एव्हां तर **तिमिर** दाट पसरून उद्दाम भंजनाची नुक्ती कोठें झुळूक सुरू झाली आहे. असो. पुढें **सत्यव्रता**ची व **सुधन्व्या**ची गांठ पडली, तींत "**चंद्रकांत** एकाएकीं मजवर कोपला, काय कारण झालें तें न कळे " असें **सुधन्व्यानें** ह्मटल्यावरून **सत्यव्रतानें** सविस्तर वर्तमान सांगितलें. नंतर दोघांनींही बरोबरच **मद्रदेशास** एकदम निघून जावें असा बेत होऊन, दोघेही निघून गेले. ही बातमी लागतांच **चंद्रकांता**चें आशापाताळ एकच झालें. त्यानें **इंदुमतीस** कारागृहांत टाकिलें, व तिजकडे **नंदन** बाळाला जाण्याची मनाई केली. येथून त्या मोहाच्या परिणामास चांगला प्रारंभ झाला. परंतु त्याला पत्नी फार चांगली मिळाली कुलक्षय व्हावयाचा तो तिच्यामुळेंच टळला. **इंदुमती** ही जाया मानिनी वधू ! तिच्या मनांत "असुखवन्हि बहु पेटला " ह्मणून तिचा " लोचननिर्झर आटला !" तिला कारागृहांत जावयाला कांहीं भीति वाटली नाहीं. " राजाला " कांहीं वाटो, " देवाला ठाउके आहेत!" असें ह्मणून तिनें आपलें समाधान केलें. तिच्या जवळच्या दासी रडायाला लागल्या त्यावेळेस ती त्यांना ह्मणाली, "कांग, तुह्मीं कां उगींच रडतां ? वेड्या नाहीं तर ? रडायला नको कांहीं, कारागृहीं टाकिलें, ह्मणून अपराध का केलासें होतें ?××× आजचा हा प्रसंग कृपाळु ईश्वरानें माझ्या बऱ्याकरितांच घडवून आणिला आहे, असें समजा. "—पतीला दुःख होऊं नये ह्मणून ती आपणाकडून फार जपे, पण यावेळीं तिचा उपाय हटला. तिला भावी दुःखें दिसत होतीं, परंतु काय करिते ! तिच्या शुद्धाचरणाविषयीं सर्व नगर साक्ष देतें, परंतु **चंद्रकांता**ला त्याचें काय ? त्याच्या मनाची "खातरी झाली " होती—त्याला याहून " सबळ प्रमाण नको " होतें. केवळ पौरांची खातरी होण्याकरितां कुलगुरूंचें "आज्ञापत्र" त्यानें मागविलें. पुढें आज्ञापत्रीं सर्व संशयनिवृत्ति **आनंदनिधींनीं** केली होती, तरी **चंद्रकांता**चा हेकडपणा गेला नाहीं. त्यानें व्यवहार पुढें चालवावा असेंच ह्मटलें. या व्यवहारांत किती खोट्या साक्षी झाल्या असत्या कोण जाणे ? परंतु लेखांतील शेवटल्या गूढावाक्याचें ( "तिजाविणें [मुक्तावलीविणें]नाहीं तु ग संतति "याचें ). प्रसंतर नंदनमृत्युरु

द्धीवर आहें, मी शुद्धीवर आहें" या वचनांला जितकें वजन द्यावयाचें तितकेंच "मात्सर्याधिष्ठितरंगविकृत" झालेल्या बिचाऱ्या **चंद्रकांता**च्या उक्तींना द्यावयाचें, हें त्याच्याही लक्षांत आलें नाहीं. तरी **सत्यव्रत** हा उतावीळ नव्हता; व्यवहार त्यास चांगला परिचित होता; त्यानें महाराजांस असें सांगितलें "मी **सुधन्व्यास** आपल्या ह्मणण्याप्रमाणें दूर करीन, परंतु पूर्ववत् आपण प्रसन्नमुद्रा धारण करावी. त्यास किंवा राजास आपल्या संशयाविषयीं बोलूं नये, व राज्ञीचा त्याग करूं नये"— हें वचन राजाच्या तोंडापुरतेंच होतें, असें दिसतें. कारण राजा गेल्यावर त्यानें आपला निषेध केला आहे, आणि **इंदुमती**च्या पातिव्रत्याविषयीं त्यानें यत्किंचित्ही संशय प्रगट केला नाहीं. "प्रभुनिदेश न मी जरि तो करीं, प्रभु तरी मम जीवित संहरी," इतक्या पल्ल्यावर जरी मजल आली होती तरी विष देऊन हात विटाळण्याचा बेत त्यानें रहित करून स्वदेशत्याग पत्करिला! याप्रकारें "त्यजुनि गृहजनांतें, मानवित्तें तयानें, असुख बहु वरीलें सुप्रसन्नें मनानें." ही **चंद्रकांता**चीच उक्ति होय, परंतु मोहपटलें वितळून गेल्यावरची! एव्हां तर **तिमिर** दाट पसरून उद्दाम भंजनाची नुक्ती कोठें झुळूक सुरू झाली आहे. असो. पुढें **सत्यव्रता**ची व **सुधन्व्या**ची गांठ पडली, तींत "**चंद्रकांत** एकाएकीं मजवर कोपला, काय कारण झालें तें न कळे" असें **सुधन्व्यानें** ह्मटल्यावरून **सत्यव्रतानें** सविस्तर वर्तमान सांगितलें. नंतर दोघांनींही बरोबरच **मद्रदेशास** एकदम निघून जावें असा बेत होऊन, दोघेही निघून गेले. ही बातमी लागतांच **चंद्रकांता**चें आ-

कारागृहांत टाकिलें, व तिजकडे **नंदन** बाळाला जाण्याची मनाई केली. येथून त्याच्या मोहाच्या परिणामास चांगला प्रारंभ झाला! परंतु त्याला पत्नी फार चांगली मिळाली; कुलक्षय व्हावयाचा तो तिच्यामुळेंच टळला; **इंदुमती** ही जात्या मानिनी वधू! तिच्या मनांत "असुखवन्हि बहु पेटला" ह्मणून तिचा "लोचननिर्झर आटला!" तिला कारागृहांत जावयाला कांहीं भीति वाटली नाहीं. "राजाला" कांहीं वाटो, "देवाला गेले आहेत!" असें ह्मणून तिनें आपलें समाधान केलें. तिच्या जवळच्या दासी रडायाला लागल्या त्यावेळेस ती त्यांना ह्मणाली, "कांग, तुह्मीं कां उगींच रडतां? वेड्या नाहीं तर? रडायला नको कांहीं, कारागृहीं टाकिलें, ह्मणून अपराध का केलासें होतें? ××× आजचा हा प्रसंग कृपाळु ईश्वरानें माझ्या बऱ्याकरितांच घडवून आणिला आहे, असें समजा."—पतीला दुःख होऊं नये ह्मणून ती आपणाकडून फार जपे, पण यावेळीं तिचा उपाय हटला. तिला भावी दुःखें दिसत होतीं, परंतु काय करिते! तिच्या शुद्धाचरणाविषयीं सर्व नगर साक्ष देतें, परंतु **चंद्रकांता**ला त्याचें काय? त्याच्या मनाची "खातरी झाली" होती—त्याला याहून "सबळ प्रमाण नको" होतें. केवळ पौरांची खातरी होण्याकरितां कुलगुरूंचें "आज्ञापत्र" त्यानें मागविलें. पुढें आज्ञापत्रीं सर्व संशयनिवृत्ति **आनंदनिधींनीं** केली होती, तरी **चंद्रकांता**चा हेकडपणा गेला नाहीं. त्यानें व्यवहार पुढें चालवावा असेंच ह्मटलें. या व्यवहारांत किती खोट्या साक्षी झाल्या असत्या कोण जाणे? परंतु लेखांतील शेवटल्या गूढावाक्याचें ("तिजावीणें [मुक्तावलीविणें] नाहीं

घडून आल्याबरोबर **चंद्रकांताचा** व्यामोह नष्ट झाला. व्यामोहाची इमारत वाळूच्या पाया-वरच रचलेली ती एकदम कोसळली यांत कांहीं नवल नाहीं. व यापुढें **चंद्रकांताच्या** पश्चात्तापास प्रारंभ झाला व तद्द्वारा त्याच्या मनाचें किल्मष धुवून गेलें ! पांचव्या अंकांत त्याची आत्मनिंदा, मृत मानलेल्या राज्ञीचें गुणस्मरण, द्वितीय संबंध करा असें ह्मणणाऱ्या सरदारांचा निषेध, ज्या **यशोदेला** पूर्वीं तोंडास येईल तें ह्मटलें तिचा गौरव, **सत्यव्रत** व **सुधन्वा** महाराज यांविषयीं पूर्वीं लुप्त झालेल्या प्रेमाचा पुनः प्रसर, **कमलाक्षा**विषयीं **सुधन्व्याशीं** रदबदली करण्याविषयीं निश्चय, **मुक्तावलीचें** दर्शन होतांच तिच्याविषयीं मनांत आविर्भूत झालेलें सहज वात्सल्य, भासमान **इंदुमतीची** प्रतिकृति, परंतु वस्तुतः **इंदुमतिच** पाहून केलेला आत्मधिक्कार व प्रियागुणस्मरण, व ती खरोखरच **इंदुमती** आहे अशी खातरी झाल्यावर तिचें दोन वाक्यांनीं केलेलें समाधान [ काय? अझून ही शंका तुझ्या मनांतली गेली नाहीं काय? याजकडे ( सुधन्व्याकडे ) बघ—हा माझा भाऊच ! म्यां चांडाळानें व्यर्थ कल्पना घेतली ! हा माझा व्यामोह !], व शेवटील वरप्रार्थनेंतील ( भरतवाक्यांतील ) उद्गार—

झाली मोहप्रभावें मति अति कलुषा ती प्रसादास पावो
मोहांधां सर्व लोकां विलसित सगळें हें खरा मार्ग दावो!

पाहून तो प्रेक्षकांच्या अथवा स्थानभेदें-करून वाचकांच्या, क्षमेस पात्र होतो. बारा वर्षें पश्चात्ताप करून प्रिया, कन्यका, व मित्र यांचा पुनरपि समागम प्राप्त झाला हा मोठासा लाभ झाला असें वाटत नाहीं.

कुलीन व पोक्त स्त्रीनें कसें वागावें हें **इंदुमती** शिकविते. पतीचा इतका अनावर कोप झाला असतां, ती आपलें देहभान विसरत नाहीं. तिची व **नंदनाची** ताडातोड केली तरी ती धैर्य टाकीत नाहीं. या संसारांत स्त्रीचें सौख्य ह्मटलें ह्मणजे पतीचें प्रेम, तें जरी इचें सकृद्दर्शनीं नाहींसें झालें, तरी ती गडबडत नाहीं. एवढें कुभांड रचलें असतांही पतीची निर्भर्त्सना न करितां आपल्या प्रियाची आठवण होऊन ह्मणते काय कीं, तो "आपल्या कन्येची अशी स्थिति पाहता, तर त्याला काय दुःख झालें असतें !"—शाबास ! **इंदुमती** ! शाबास ! तुझी ही शांति कोठें ? आणि कोठें **देवयानीचें** पितृगृहीं रुसून जाणें, आणि प्रियाकरवीं **ययातीस** शाप देवविणें ! परंतु ही शांति कोठवर ? जोंपर्यंत **नंदनाचा** मृत्यु ऐकिला नाहीं तोंपर्यंत. ती वार्ता ऐकतांच चंडवायूच्या योगानें केळ पडावी तशी **इंदुमती** एकदम भुईवर मूर्च्छित होऊन पडते, आणि सर्वांस त्या वेळीं असेंच वाटतें कीं ही मेलीच. **यशोदेनें** ही संधि साधून असेंच प्रगट केलें कीं ही खरोखरच मेली. कित्तीएक कविकलानभिज्ञ आक्षेपक असें ह्मणतील कीं, **शेक्सपियर** कवीची येथें मोठी चूक झाली आहे. **यशोदेस** एवढी **इंदुमती** लपवितां कशी आली ? व या कृत्याबद्दल उल्लेख शेवटल्या प्रवेशापर्यंत कसा केला नाहीं ? त्यांस असें वाटतें कीं आपल्या पौराणिकांतल्याप्रमाणें सर्व गोष्टी प्रत्यक्ष रंगभूमीवर करून दाखविल्या पाहिजेत,—त्यांचा केवळ निर्देश करितां कामा नये. त्यांच्या मतें व्यंजनाद्वारें कवीला आपला अर्थ कळविण्याला कांहीं अधिकार नाहीं. परंतु चित्रलेखांत जसें चित्रकारास प्रधान चित्र पुरस्तरभूभागीं काढून व्यक्ततर करावें लागतें, व अप्रधान चित्रें पश्चाद्भागीं ढकलावीं लागतात, तद्वत् कवीलाही प्रधान गोष्टी तेवढ्या

पुढें करून लहान सहान गोष्टींचा क्वचित् मध्यमाधम पात्रांच्या मुखें निर्देश, क्वचित् केवळ व्यंजनाच, करावी लागते. " कवीचें मर्म कळण्यास अंगीं कांहीं रसिकता पाहिजे" असें एका ग्रंथकाराचें ह्मणणें आहे तें यथार्थ आहे, ह्मणूनच एका कवीनें " अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख " अशी ईश्वराजवळ प्रार्थना केली! असो. **यशोदेनें इंदुमतीस** आपल्या वाड्यांत गुप्त रीतीनें लपवून ठेविली, व ती तशी राहिली. **आनंदनिधीच्या** संशुद्धिलेखांतील " लाभे ती जरि शोधिशी; तिजविणें नाहीं तुला संतति " हींच वाक्यें! एक प्रसंतर आलें, दुसरें प्रसंतर पाहण्याला राणीचा धीर होईना. पतीपासून दूर राहिलें तरच नष्ट कन्येची फिरून गांठ पडेल, व संततिक्षयाचें दुःख होणार नाहीं, असा तिचा पक्का विश्वास होता. हा विश्वास सुधारलेल्या आधुनिक कालाशीं विसदृश आहे, हें खरें. परंतु प्राचीन कालाला अनुसरूनच आहे असें ह्मणावें लागतें. शेवटल्या प्रवेशांत **यशोदेच्या** मुखानें **मुक्तावली** सांपडल्याची वार्ता ऐकून राजाची गांठ घेण्याची जी अपूर्व योजना तिनें घडवून आणिली, निदान जी तिला मान्य झाली, त्या योजनेंत आत्मसंयम आपल्या अंगीं पूर्ण वसत आहे अशी तिनें आपली खातरी दाखविली आहे. बारा वर्षें जी कन्या दृष्टीस पडली नाहीं तिचें दर्शन होऊनही, व ज्या पतीनें आपला धिक्कार केला तो आपले गुण आपल्या समोर घेत आहे असें ऐकूनही, जिची चित्तवृत्ति गडबडली नाहीं, त्या साध्वीचें धैर्य लोकोत्तर कां ह्मणूं नये? परंतु याही प्रवेशांत तिचें अभिमानित्व कवीनें फार सुरेख [illegible]नें वर्णिलें आहे. पतीनें अनुनय केला तरी पतीच्या विरागास जें कारण झालें तें तिच्या हृदयांत तसेंच सलत होतें. सर्वांच्या भेटी झाल्या, तरी तिनें **सुधन्व्याकडे** पाहिलें नाहीं, आणि ह्मणूनच **चंद्रकांतास** " अर्जुना ही तुझ्या मनांतली शंका गेली नाहीं काय? " अशा उक्तीनें तिची क्षमा मागणें भाग पडलें. या सर्व गुणांनीं **इंदुमती** आमच्या **भारतवर्षीयांस** फारच पूज्य होईल असें वाटतें. **इंग्लिश** कवीनें आपल्या ग्रंथांत " **क्याथराईन** "–[ आठव्या **हेनरी** राजाची पत्नी ]–व **इंदुमती** (Hermione)यांची शांति, अभिमान, मितभाषित्व, गांभीर्य, व दुःखसहिष्णुता यांचें वर्णन करण्यांत पुष्कळ बुद्धिचातुर्य खर्चिलें आहे, व त्याचा असाही भाव असावा कीं हीं उदाहरणें पाहून आपल्या देशभगिनी आपलें वर्तन त्याप्रमाणें ठेवितील. परंतु हल्लींच्या **इंग्लिश** सभ्य स्त्रियांची पतीबरोबर हमरीतुमरी, पतीचें थोडें क्रूर वर्तन असलें कीं सोडचिठ्ठी मागणें, व पतींची सर्व गोष्टींत बरोबरी करणें, हा प्रकार कवीच्या काल्पनिक स्त्रीजातीशीं फारच विसदृश आहे. गोष्ट खरी आहे, कीं हल्लींचा मनु निराळा आहे; सुधारणा अधिक झाली आहे; जो तो आपले हक्क पुढें करितो आहे; स्त्रियांस स्वातंत्र्य अधिक अधिक मिळूं लागलें आहे, अबलांचा अर्धांगीपणा लोपत जाऊन त्या सर्व व्यवहारांत पुरुषांशीं संग्राम करण्यास उभ्या ठाकत आहेत; व न जाणों या जगतीतलावर आजवर अर्धी प्रजा दास होती, व अर्धी तिजवर प्रभुत्व गाजवीत होती, त्यामुळें सृष्टींतील अर्ध्या बुद्धीचा वहुतेक ऱ्हास होत होता, त्या बुद्धीस यापुढें प्रसर मिळून राजकवीच्या

" Everywhere
Two heads in Council, two beside the hearth,
Tw[illegible] the tangled business of the world.

> Two in the liberal offices of life,
> Two plummets dropt for one to sound the abyss
> Of Science, and the secrets of the mind :
> Musician, painter, sculptor, critic, more :
> And everywhere the broad and bounteous Earth
> Should bear a double growth of those rare souls,
> Poets, whose thoughts enrich the blood of the world.
>
> A. Tennyson—"The Princess." II.

ह्मणण्याप्रमाणें जिकडे तिकडे एकीबद्दल दोन होतील. तरी ही दशा आपल्या देशांत निदान भावीच आहे, आणि ती चांगली असली तरी गत व वर्तमान दशेंतील सुखाकडे सिंहावलोकन केलें असतां आमचे उन्नतीच्छु अग्रणी आह्मांवर फार घसरतील असें आह्मांस वाटत नाहीं. **इंदुमती**सारखीं स्त्रीरत्नें आमच्या देशांत पुष्कळ पैदा झालीं आहेत, व अजूनही होत आहेत; तेव्हां तशी साध्वी आपल्या सर्व लोकांच्या चित्तांत पूज्यबुद्धि उत्पन्न करील यांत कांहीं संशय नाहीं. अशीं रत्नें पुढें निपजतील कीं नाहीं याविषयीं थोडा संशय आहे, आणि असा संशय घेतला ह्मणून आमचा कोणीं निषेध केला तरी तो आह्मांस मान्य आहे. मात्र इतकेंच आमचें ह्मणणें आहे कीं, गतकालाचीं किंवा प्रणश्यत् कालाचीं सुखें अमुक अमुक होतीं, व तीं भविष्यत्कालीं कदाचित् प्राप्त होणार नाहींत, असा किंचित् विषादपर उद्गार आमचे मुखावाटें निघाला, ह्मणजे आह्मीं जरठ झालों, व आमचे आचारविचारही जरठ झाले, असा आक्षेप करण्यास कोणास अवकाश मिळत नाहीं. आमचें असें मत आहे कीं "त्या त्या मनूंत तीं तीं सुखें असतात; एकाचीं सुखें दुसऱ्यांत असूं शकत नाहींत; लोकसमुदाय जसजसा सुधारणेचा मार्ग आक्रमीत जातो, तसतसे त्याच्या दृष्टीस नवे नवे चमत्कार पडतात; आणि हे चमत्कार निःसंशय पूर्वीं[illegible] चमत्कारांहून विभिन्न व क्वचित् अधिक मनोहरही असतात."

**इंदुमतीचीच** कन्या **मुक्तावली**, तेव्हां तीही मातेप्रमाणेंच मोठ्या मनाची, धीर, प्रेमळ व दुःखसहिष्णु आहे. गोपालांत जरी ती वाढली, तरी तिचें स्वाभाविक उदारत्व लोपलें नाहीं, आणि ह्मणूनच तिनें यौवनदशापन्न **कमलाक्षाचें** चित्त हरण केलें तरी तिच्यामध्यें कैतव मुळींच नव्हतें. **कमलाक्ष** हा राजपुत्र, याच्याशीं आपला विवाह असंभवनीय होय हें ती जाणून होती; व ह्मणून त्यास वरचेवर ह्मणे कीं "हा नाद आपण सोडून द्या कसा!" पुढें त्याच प्रवेशांत "शेवटीं दैवानें खरें" केल्यावर इतकेंच ह्मणाली कीं "राज्य नको आणि कांहीं नको, माझ्या गाईच मला असोत ह्मणजे झालें." तिचें सारल्य किती आहे हें त्याच प्रवेशांतील **सत्यव्रताच्या** व **कमलाक्षाच्या** लटपटी झाल्यावर तिच्या पुढील भाषणावरून कळून येतें:— "एकूण तुमचा कार्यभाग व्हायला माझेंही अंग पाहिजे?—मला या वेळीं कांहीं सुचत नाहीं."—थोडीशी सुद्धां लटपट तिच्या हातून व्हावयाला तिच्या इतकें जीवावर येतें! परंतु ही लटपट केवळ मौनरूप होती. आणि ती तिच्या अव्याज प्रेमातिशयाकरितां सदय रसिकजनाच्या क्षमेस पात्र होईल, असा आमचा भरंवसा आहे. "कुटिलनयनिष्णात" **सुधन्व्याच्या** व राजदरबारांत वागून वाऱ्याची दिशा ओळखणाऱ्या **सत्यव्रताच्या** जर ती स्तुतीस पात्र झाली आहे, दोघांसही जर वाटत आहे कीं इचें शहाणपण व इचें लावण्य गोपकुलांतलें नव्हे, **सुधन्वा** रागावला असतांही तीस "मोहिनी" असें जर ह्मणत आहे, त्याला जर तिचें "सौंदर्य राजकुल

शोभणारें आहे" असें वाटत आहे, तिचें प्रबुद्ध भाषण ऐकून मधुरवाक्पटु **सत्यव्रत** "हें अंगचेंच वळण, या दुसऱ्यांना शिकवितील," असें ह्मणून शेवटीं भाविपदसूचक "बाईसाहेब" हे शब्द जर योजीत आहे, तर तिची सर्व कृति केवळ **कमलाक्षास**च प्रिय होती—[ सर्वहि मानसहारि ! कृती तव काय नसे प्रिय ] असें नव्हतें.

**सत्यव्रत** हा **चंद्रकांता**च्या पदरचा मोठा विश्वासू व इमानी सरदार होता. याचें नातें परिजनाहून अर्थात् अधिक होतें. राजा त्या जवळ "विविध हितगुज" सांगे, व **सत्यव्रत**ही "बहुपरी योग्य बोध" त्यास करी. राजानें **सुधन्व्या**चा प्राण हरण करावयाचा आपला "नृशंस हेतु" **सत्यव्रता**ला कळविला, परंतु त्यास तो कबूल झाला नाहीं. उलट त्याचा बेत **सत्यव्रता**नें **सुधन्व्यास** कळवून त्याला स्वदेशीं जाण्यास सांगितलें, व आपणही घरदार सोडून त्याजबरोबर गेला. **मद्रदेशीं सत्यव्रता**चें नातें **सुधन्व्या**पाशीं कदाचित् अधिकच बिकट होतें. एकतर त्यानें राजाचा प्राण वांचविला, व दुसरें तेथील पुष्कळ मोठीं कामें उचललीं होतीं तीं दुसऱ्यास झेंपण्यासारखीं नव्हतीं. यामुळें **सुधन्वा** राजाचें प्रेम त्यावर विशेषच होतें. अंतस्थ गोष्टींत त्याचीच सल्लामसलत राजा घेई. **कमलाक्ष मुक्तावलीच्या** नादीं लागला हें समजतांच तेथील प्रकार प्रत्यक्ष पाहावा असा बेत राजानें केला, तेव्हां त्याबरोबर असणारा **सत्यव्रत**च ! **कमलाक्षा**चें प्रेम **मुक्तावलीवर** अतिशय बसलें, तें दूर करितां येणार नाहीं, दूर करण्याचा प्रयत्न केला तर पितापुत्रांत वितुष्ट पडून पित्यास पुत्रशोक किंवा पुत्रास [illegible]यहानि प्राप्त होण्याचा प्रसंग येऊन ठेपला आहे, असें जेव्हां **सत्यव्रतास** दिसलें, तेव्हां त्यानें युक्ति लढविली, व त्या युक्तींत फार दिवस न गेलेल्या स्वदेशभूमीचें दर्शन घेण्याचा हेतु साध्य होण्याची शक्कल काढिली. येणें करून उभय कुळांचा संतानरक्षक **सत्यव्र**[illegible] झाला.

**सिंहलद्वीप**राजकुळाची "संजीवनौषधि" राजधात्री **यशोदा** होय. इचें प्रेम राजकुलावर फार, परंतु प्रेमातिशय आणि शहाणपण हीं क्वचित् एके ठिकाणीं निवास करितात. याचें उत्कृष्ट उदाहरण अंक २ प्रवेश ३ हें होय. **मुक्तावली**ला घेऊन ती राजाकडे गेली, आणि या अर्भकाच्या "लीला" पाहून त्याचें मन द्रवेल असें तिला वाटलें. आणि त्याप्रमाणें कांहीं अंशीं झालेंही. परंतु **यशोदे**च्या अतिप्रसंगामुळें दुसराच अनर्थ ओढवला. तिनें राजास जेव्हां कटु शब्दांनीं प्रहार केले, तेव्हां त्याचा प्रकोप अनावर होऊन त्यानें असा हुकूम केला कीं, या अर्भकास कोठें तरी देशांतरीं टाकून द्यावें. याप्रमाणें करायला गेली एक, आणि झालें एक ! सद्धेतूनें कार्यभाग होतोच असें नाहीं. परंतु यापुढें तिला चांगली ठेंच लागली असें दिसतें. **इंदुमती** राज्ञी मूर्छित होऊन पडली, तेव्हां तिची पुढची व्यवस्था इनेंच ठेविली, व सर्वत्र असें प्रगट केलें कीं ती मृत्यूच पावली. पुढें **चंद्रकांत** बारा वर्षें पश्चात्तापरूपी तप आचरीत असतां, इतर दरबारी लोक त्यास ह्मणत कीं द्वितीय संबंध करावा, तेव्हां ती मोडाही घाली. याचें वरपंगी कारण ती असें सांगे कीं, "**इंदुमती**सारखी दुसरी मिळणार आहे?" परंतु वस्तुतः राज्ञी जिवंतच होती. थट्टेनें जण[illegible] दरबाऱ्यांस असें ह्मणे कीं "तुह्मी

लग्न करायला लावालच, तर बायको बघायचें काम मजकडे टाकाहो! मी अशी पाहीन कीं, आपणा सर्वांस वाटेल कीं या आमच्या बाईसाहेब इंदुमतीच कीं काय?" यावर चंद्रकांतानें जेव्हां ह्मटलें "यशोदाबाई! तुह्मी सांगाल तेव्हां लग्न करीन! मग तर झालें ना?" तेव्हां यशोदा जाणो सर्वांचा हिरमोड करण्यासारखें बोलली कीं "ह्मणजे जेव्हां आमच्या बाईसाहेब जिवंत होतील तेव्हां!" हा प्रसंग अर्थात् दरबाऱ्यांच्या मतें कधीं येणारच नव्हता, परंतु तोच तिनें खरोखर घडवून आणिला. तो प्रसंग फारच मनोवेधक आहे, व स्वत: कवीस सुद्धां तसेंच वाटलें असावें; कारण त्यानें पूर्व प्रसंगास उद्देशून असें ह्मटलें आहे कीं, "हा प्रयोग पहायला राजे रजवाडेच पाहिजे होते! कारण राजांनींच तो करून दाखविला!" आणि पूर्व प्रसंगाची छाया यावर न पडून, हा प्रसंग स्पष्ट खुलावा ह्मणून प्रेक्षकांसमोरच त्याचा प्रयोग करून दाखविला आहे! पूर्वींच्याचें मध्यम पात्रांच्या मुखानें वर्णन केलें आहे! ही कविकला! असो. नाटकाच्या पूर्वभागांत यशोदेनें आगळीक करून जें राजकुळाचें नुकसान केलें होतें, तें सर्व या प्रवेशांत तिनें भरून दिलें! ती कृतार्थ झाली! "एकाद्या क्षेत्रीं" जाऊन तिनें आतां "राम राम ह्मणत" बसावें. हेंच तिला योग्य! असो; हें प्रकरण फार लांबत चाललें, तेव्हां आटोपतें घेतलें पाहिजे.

संस्तावक हा सत्यव्रताप्रमाणें शहाणा होता, परंतु मनाचा कच्चा होता. इंदुमतीवर खोटा आरोप केला आहे, असें त्यास वाटूनही तो राजाची मर्जी जाऊं नये ह्मणून "होस हो" ठोकून देई. या तोंडपुजेपणाचें प्रायश्चित्त कवीनें त्यास दिलें आहे. "कुटिल" हें पात्र फार मौजेचें आहे. संसारपथ आक्रमीत असतां असलें चटकदार पात्र बरोबर नसलें, तर वाट कंटाळवाणी वाटेल, ह्मणून हें कवीनें योजिलें असावें. कुटिल लबाड आहे, खिसेकापू आहे, बढ्या बढ्या बाता झोंकणारा आहे, सर्वांना फसवायाला पाहत आहे, तरी तो प्रियच आहे. वेड्यानें त्याच्या "हुशारीबद्दल" राजपुत्राजवळ तारीफ केल्यावर त्यास चांगली एकादी असामी दरबारांत मिळाली असेंच आपण समजूं. गोपाल आणि वेड्या यांचें गांवढळ पण रमणीय भाषण व वर्तन, पाहिला व दुसरा सरदार यांच्या वृत्तींतील फरक, सुधन्वा राजाच्या चुका, यांविषयींही थोडेंबहुत लिहावयाचें होतें. परंतु झालें हेंच फार वाढत गेलें. तेव्हां याविषयीं आतां कांहीं लिहीत नाहीं. सांगावयाचा भावार्थ हाच कीं, शेक्सपियर कवीच्या कृतींचें चांगलें अध्ययन केलें पाहिजे, ह्मणजे त्यांचें मर्म कळतें. उगीच चार घटका मौज सांपडेल एवढ्यावरच राहूं नये. मौज तर आहेच, परंतु पाहिजे असल्यास उत्तम प्रतीचें शिक्षणही आहे. शिक्षण आणि मौज हीं दोन्ही कवीच्या ग्रंथांत सांपडत असल्याकारणानें ते ग्रंथ आबालवृद्धांस प्रिय झाले आहेत. तद्देशीयांसच झाले आहेत असें नाहीं, तर परदेशीयांसही झाले आहेत. युरोपांतील सर्व देशांत त्याचे ग्रंथ "बायबल" च्या योग्यतेचे समजतात. त्यांचीं भाषांतरें बहुतेक भाषांतून झालीं आहेत. आपल्याही देशांत बंगाली, कानडी, गुजराथी वगैरे भाषांतून त्याच्या कांहीं कांहीं ग्रंथांचीं भाषांतरें झालीं आहेत; मराठी भाषेत पुष्कळच झालीं आहेत हें महाराष्ट्रीयांस सांगणें नको.

ग्रंथ नानादेशांच्या लोकांस प्रतिकृतिरूपानेंही इतके प्रिय होतात, तेव्हां ते तसेच असले पाहिजेत ! नानाविध संसारप्रसंग पाहून कवीचें मन फारच प्रबुद्ध झालें होतें. हे प्रसंग त्याचे डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभे राहत. कवीचा "आत्मा" मूळचा एक असूनही "सहस्रधा विभक्त" होऊन त्या त्या प्रसंगीं शोभे ! तेव्हां अशा कवीची सेवा करण्यांत आह्मांस धन्यताच वाटते. आतांपर्यंत द्विवार सेवा झाली आहे. ही त्रिवार करून कदाचित् आह्मीं त्याचा शेवटचा निरोप घेऊं. देवळांतही भजकांची गर्दी फार होत चालली आहे, तेव्हां धक्काबुक्की न होतां बाहेर पडलों तर बरेंच झालें असें समजूं. देवळांत न येतांही प्रभूचें दर्शन हृदयांतरीं घेतां येतेंच. ज्यांनीं देवळाचा आह्मांस उंबरठा दाखविला, व ज्यांनीं आंत प्रवेश करून दिला, त्या सर्वांचे आभार आह्मीं आमरण विसरणार नाहींच नाहीं.

प्रकृत नाटक आमचे परममित्र रा. रा. **शंकर मोरो रानडे** यांनीं आपल्या 'अर्णवां' तून प्रसिद्ध केलें. 'तारा' नाटक छापीत असतांना जी त्यांनीं आह्मांस मदत दिली, तिच्याहीपेक्षां हल्लीं त्यांनीं अधिक दिली. ग्रंथ शुद्ध करण्याचें, छापण्याचें, व ठिकठिकाणीं टिपा देण्याचें काम त्यांनीं आपणावरच घेतलें. **मोहविलसि**तांत विशेष ठिकठिकाणीं घातलेल्या कविता होय. त्या प्रकृत ग्रंथकाराच्या दोषामुळें साधारण वाचकांस दुर्बोध झाल्या, तेव्हां त्यांवर टिपा देणें अवश्यच होतें. या कवितांतून एक दोन कविता **भवभूति-भर्तृहरि** कवींच्या श्लोकांचें केवळ भाषांतररूप आहेत, हें **संस्कृतज्ञ** जाणतील, व या "ग्रंथचौर्या"बद्दल क्षमा करतील, अशी आहे. शेवटीं ही प्रस्तावना लिहिण्याचें काम आजपर्यंत उरकलें नाहीं, ह्मणून आह्मीं वाचकांची क्षमा मागून हा लेख पुरा करितों.

**ग्रंथकर्ता.**

उमरावती, कार्तिक शुद्ध
११ रविवार शके १८०५.
ता. ११ नोवेंबर सन १८८३ इ.

*** येथपर्यंत आमचे परम मित्र रा. रा. **विष्णु मोरेश्वर महाजनी** एम्. ए. यांनीं आपल्या "**मोहविलसित**" नाटकाची प्रस्तावना आह्मांकडे लिहून पाठविली, ती जशीची तशीच छापून प्रसिद्ध केली आहे. ही प्रस्तावना अगोदरच लांबली आहे, तेव्हां आणखी कांहीं मजकूर लिहून तींत भर घालण्याचा आमचा हेतु नाहीं. शिवाय रा. **महाजनी** यांचा लेख इतका शोधकबुद्धीचा व परिपूर्ण आहे कीं, त्या लेखांत आह्मीं आपल्या कल्पनेनें नवीन भर घालण्याचें मनांत आणिलें, तरी आह्मांस ती घालतां येईल कीं नाहीं याचाही आह्मांस संशयच वाटतो. तेव्हां त्या नादांत पडण्याचें साहस आह्मांस नको. असें जरी आहे, तरी रा. **महाजनी** यांच्या लेखांतील एका भागासंबंधानें थोडाबहुत तरी लेख लिहिल्याशिवाय आमच्यानें रहावतच नाहीं. हा लेख लिहिणें हें एका अर्थीं आह्मांस अत्यंत कष्टकर वाटतें, तथापि दुसऱ्या अर्थीं विचार करितां आमच्या ज्या एका अत्युदार मनाच्या मित्रानें आमच्या ऐन संकटसमयीं आह्मांस मदत केली, व तीही अशीच कीं ती मदत तशा प्रसंगीं न मिळती, तर आमचा हा "**अर्णव**" कधींच नाममात्रशेषही होऊन जाण्याचीच भीति होती, त्या तशा मित्राच्या त्या तशा उपकारांचें आह्मांस कांहींच वाटत नाहीं असें होऊन

आमचें मनच आह्मांस खाऊं लागत आहे. व एवढ्यासाठींच आह्मीं फक्त तेवढ्याच प्रसंगास उद्देशून या स्थळीं चार शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

या वर जी प्रस्तावना आली आहे, तिच्या शेवटल्या पाराग्राफांत रा. **महाजनी** यांनीं आह्मांकडून त्यांस झालेल्या अल्पस्वल्प मदतीस गौरवून घेतलें आहे, तथापि खुद्द आह्मांस त्यांच्याकडून जी मदत झाली, तिजपुढें आमची मदत कांहींच नाहीं. रा. **महाजनी** यांचें "**तारा**" नाटक छापत असतां आह्मांकडून यद्यपि तें पुस्तक छापत असतां प्रुफांच्या वगैरे संबंधानें मदत झाली हें खरें आहे, तथापि ती मदत ह्मणजे अशाच प्रकारची होती कीं ती त्यांच्या विस्तीर्ण मित्रमंडळांतून कोणींही आनंदानें पत्करिली असती. परंतु रा. **महाजनी** यांनीं आह्मांस केलेली मदत याहून फारच निराळ्या प्रकारची व अधिक महत्वाची आहे. आमचा '**अर्णव**' आपल्या प्रकृतिधर्मास अनुसरून केव्हां केव्हां ओहोट खाण्याचा संभव नाहीं असें नाहीं, तथापि जोंपर्यंत त्याचा पृष्ठभाग उचंबळविणारा इंदु त्याजवर छत्र धरून आहे, तोंपर्यंत त्यास सृष्टिधर्माप्रमाणें अधींच ओहोट न यावी असें प्रत्येकास वाटण्याजोगें असतें. असें आहे तथापि जगांत कधीं कधीं पदार्थांनीं विसदृशधर्मानुसरण केलेलेंही आपल्या अनुभवास येतें, त्यापैंकींच कांहींसा अनुभव आमच्या "**अर्णवा**"सही घडला. हा अनुभव ह्मणजे काय याचें विशेष स्पष्टीकरण आह्मीं या स्थळीं लिहून करीत नाहीं, तथापि ज्या कोणास तें स्पष्टीकरण ह्मणजे काय याची जिज्ञासा होईल, त्यांनीं आमच्या "**अर्णवा**" पैकीं पु० २ अंक ९|१० यांतील आच्छादनपत्रावरील "**वर्गणीदारांस सूचना व विज्ञप्ति**" हीं एकवार काढून पाहिल्यास त्यांना आमचा आशय बऱ्याच प्रकारें कळून येण्याचा संभव आहे. "**नाट्यकथार्णव**" सुरू करण्याचे वेळीं त्यांत आह्मीं चारच प्रकरणें सुरू केलीं होतीं, तीं '**रतिमन्मथ** नाटक', '**दौलतराव** नाटक', '**शिलादित्य**' व '**मथुरा**' हीं होत. या चोहोंपैकीं '**दौलतराव** नाटक' पु० १ अं० ८ यांत संपून गेल्यामुळें त्याचे ऐवजीं सदर अंकापासून '**अतिपीडचरित** नाटक' येऊं लागलें, व तेंही पु० ३ अंक ७ यांत संपून गेल्यामुळें त्याचे ऐवजीं '**अनुतापशमन** नाटक' घालण्यास सुरुवात केली, व पु० २ अं० ८ यांत तें नाटक २४ पृष्ठेंपर्यंत छापूनही झालें. बाकीचीं तिन्हीं प्रकरणें सवडीसवडीनें छापत होतींच. यांशिवाय आमच्या पुस्तकांत '**प्रहसनसंग्रह**' ह्मणून एक नवीन भाग पु. २ अं. २ मध्यें सुरू केला होता त्याचींही पृष्ठें केव्हां केव्हां मधून येत. ही स्थिति पु. २ अं. ८ पर्यंत अबाधित चालली असून तींत मुख्यत्वें ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट ही होती कीं, आमचे पुस्तकांतील नाटकशाखेपैकीं **इंग्रजी** धर्तीचें एक नाटक सतत येत गेलें, व तेंही अशा प्रकारें कीं एकवार अशा प्रकारचें नाटक सुरू झालें ह्मणजे तें संपेपर्यंत तशा प्रकारचें नवीन नाटक ह्मणून सुरू केलेंच नाहीं. हा आमचा आह्मीं लावून घेतलेला नियम मोडण्याचें वस्तुतः कारण न यावें, परंतु दैवदुर्वियोगानें तें कारण आलेंच; व आमचा पु. २ अं. ८ तयार झाला असूनही कित्येक महिनेपर्यंत तो वाचकांच्या ह्मणून हातांत देतांच येईना, कारण अंक स्वतः आमचेच हातीं नाहीं, तेव्हां आह्मीं तो वाचकांस तरी कसा द्यावा

विलक्षण प्रसंग येऊन गुदरला असतां त्यावेळीं पूर्वीचे चालू विषय पुढें लिहिणें आपोआपच बंद पडलें, कारण जोंपर्यंत वाचकांस पु. २ अं. ८ यांतील मजकूरच वाचण्यास देतां येत नव्हता, तोंपर्यंत त्या मजकुरापुढील मजकूर त्यांचे हातांत देऊनही उपयोग नव्हता. अर्थात् अशा अडचणीचे प्रसंगीं पूर्वीचे सर्व विषय तसेच एका बाजूस ठेवून अगदीं नवेच विषय लिहूं लागण्याची जरूर पडली. परंतु आह्मीं एकप्रकारच्या द्वंद्वसमासाशीं संनिकृष्ट झालेले, तेव्हां नवीन विषय लिहिण्यासही चांगलासा अवकाश मिळेना, व त्यामुळें आमचा हा "अर्णव" आतां खचितच नामशेष होतो अशी आह्मांस धास्ती पडली. अशा महान् अडचणींच्या प्रसंगीं रा. महाजनी यांचें 'मोहविलसित नाटक' आह्मांकडे अगदीं अकल्पित आलें. या वेळापूर्वीं आपल्या 'अर्णवां'त दुसऱ्या कोणाचाही लेख न घालण्याचा आमचा कटाक्ष होता, परंतु तो कटाक्ष आह्मांस अप्रयोजक व अडचणीचा ह्मणून टाकून द्यावा लागला. एकादा गचाळसा लेख कोणाकडून लिहून त्यावेळीं आह्मांकडे येता, तर तोही केवळ एक "अर्णव" जगविण्याकरितांच आमचे पुस्तकांत आम्हीं घालूं लागण्याची ती वेळ होती. असो; अशा या ऐन प्रसंगाच्या भरांत आह्मीं पडलों असतां आमच्या सुदैवानें आह्मांस प्रस्तुतचें नाटक मिळालें. रा. महाजनी यांच्या 'तारानाटका'ची चांगुलपणाविषयीं प्रसिद्धि पूर्वींच झाली होती, तथापि तेवढ्या प्रसिद्धीवरच अवलंबून न रहातां आम्हीं त्या नाटकाचें हें भावंड साद्यंत अवलोकन केलें, व त्यांतील एकेक खुबी व चमत्कार मनांत भरत जाऊन सरतेशेवटीं रा. महाजनींचें हें नाटक आपले पुस्तकांत यावेंच अशी आमची बुद्धि झाली. या बुद्धीस अनुसरून आम्हीं रा. महाजनी यांस विचारण्याचाच कायतो अवकाश, आम्हीं विचारल्याबरोबर त्यांनीं उदारपणें आमच्या शब्दाचा मान राखिला, व हें नाटक आह्मांस दिलें. अशा प्रकारचें अकल्पित उत्तेजन मिळाल्यावर आह्मांसही स्वतःचे नवीन लेख तयार करण्याची उमेद आली, व त्याचेंच फळ पु. २ अं. ९।१० यांत छापिलेलें 'प्रेमगुटिका नाटक' हें होय. अशाप्रकारें हे दोनच नवीन विषय घालून हा जोड अंक तयार होतो आहे तों सुदैवानें ८ वा अंकही आमचे हातीं आला, व पुढें सर्वच मार्ग खुला झाला. तेव्हां सांगावयाचें तात्पर्य मिळून इतकेंच कीं, आमचे मित्र रा. महाजनी यांचे या बाबतींत आह्मांवर किती उपकार झाले आहेत ते आह्मांस बोलूनही दाखवून पुरे होण्यासारखे नाहींत. तेव्हां त्यांचें यथातथा अनुमान वाचकांनींच करून घ्यावें एवढेंच आम्हीं या स्थळीं ह्मणूं शकतों.

नाट्यकथार्णव कर्ते.

डापे.

# मोहविलसित नाटक.

वा-ना-६२८

## पात्रें.

| | |
|---|---|
| चंद्रकांत | सिंहलद्वीपचा राजा. |
| नंदन | त्याचा पुत्र. |
| सत्यव्रत, संस्तावक, हारीतक, विद्यासागर | सिंहलद्वीपचे सरदार. |
| सुधन्वा | मद्रदेशचा राजा. |
| कमलाक्ष | त्याचा पुत्र. |
| धनपाल | मद्रदेशचा सरदार. |
| कुटिल | एक तस्कर. |
| गोपाल | एक गौळी. |
| वेड्या | त्याचा मुलगा. |
| इन्दुमती | चंद्रकांताची राणी. |
| मुक्तावली | चंद्रकांताची कन्या. |
| यशोदा | |
| गंगा | |
| म्हाळसा | |
| नर्मदा | |

( सरदार, गृहस्थ, द्वारपाल, रक्षक, गौळी, वगैरे. )

## "मोहविलसित" नाटकाचें शुद्धिपत्र.

या पत्रकांत ह्रस्व दीर्घ अनुस्वार इत्यादिकांच्या चुका दाखविल्या नाहींत. कारण त्या सहज समजण्यासारख्या आहेत. ज्या समजण्यासारख्या नाहींत, त्यांचें मात्र टिप्पण केलें आहे.

| पृष्ठ | रकाना | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १४ | १ | १८ | (चारुता) मानवाची | मानसाची. |
| १९ | २ | ११–१२ | डोळ्यांत | डोक्यांत |
| २३ | १ | २४ | रात्रींच्या | रात्रीच्या |
| २३ | २ | १८ | तयाच्या | तपाच्या |
| २५ | १ | २२ | हानि | वानीं (अ. स्तवीं) |
| ५० | १ | २८ | टाळूनि | लंघूनि |
| ५३ | २ | २६ | आणि शिक्षण | आणि असें शिक्षण! |
| ५४ | १ | १६ | गेलों | गेलां |
| ७३ | २ | १४ | येथून आपण जाऊं | (हें वाक्य येथें पुरें झालें ह्मणून यापुढें पूर्णविराम पाहिजे.) |

ना. ८७.५२८
पत्र
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# मोहविलसित नाटक.

## अंक १.

**प्रवेश १. स्थळ—सिंहलद्वीप—राजवाड्यांतील एक खोली.**

(सत्यव्रत आणि धनपाळ येतात.)

**धन०**—खरेंच, **सत्यव्रत** ! तुह्मीं जर आमच्या **मद्र** देशात याल, तर मी सांगतों हें खरें कीं नाहीं तें तुह्मांसच कळेल. आमचे महाराज तुमच्या महाराजांच्या भेटीस आले, तसे तुमचे महाराज आमच्या महाराजांच्या भेटीस येतील, तरच हा प्रसंग घडून येणार. नाहीं तर तुह्मीं येथें आणि आह्मी तेथें!

**सत्य०**—धनपाल ! त्याचीहो तुह्मीं आतां कशाकरितां फिकीर करितां? येत्या वर्षीं आपल्या महाराजांच्या भेटीस यावें असा **चंद्रकांत** महाराजांचा बेत दिसतो. आह्मीं अर्थात् स्वारीबरोबर असूंच.

**धन०**—तेव्हां मात्र तुह्मांला कळून येईल कीं मी ह्मणतों तें खरें कीं नाहीं. खरेंच, तुमचा आदरसत्कार कांहीं अपूर्वच! काय व्यवस्था आणि काय बेत! आमच्या हातून तुमची इतकी व्यवस्था राहील कीं नाहीं याचा संशयच! पण प्रेमानें दिलेले **सुदामाचे** पोहे जसे **कृष्णानें** मोठ्या आवडीनें खाल्ले, तसे तुह्मींही आमची भाजीभाकर गोड करून घ्यालच. खरेंच पुसाल तर—

**सत्य०**—अं:, त्यांत कांहीं नाहीं. पाहुण्यांचा आदरसत्कार करावा हा सर्वांचा धर्मच आहे.

**धन०**—धर्म तर खराच. पण करण्यात फेर आहेना? येथें आमचा कांहीं तुह्मीं मान ठेवला तो कांहीं सांगता पुरवत नाहीं. तोंड देखल्या बोलतों, असें नव्हे हो.—खरेंच! तुह्मीं आमच्या घरीं याल, तेव्हां कांहीं आह्मांस निराळीच योजना करून ठेवावी लागेल. ज्ञानवल्लीचा पेला देऊं एकेकास पाजून, ह्मणजे चांगलें ह्मटलें नाहीं तरी हरकत नाहीं; पण नांवें तर ठेवायला तुह्मांला सांपडणार नाहीं!

**सत्य०**—अहो **धनपाल** ! आह्मीं केलें हें कांहीं फार नाहीं. पण थोरांची रीतच आहे कीं अल्पांत संतोष मानून घेऊन करणाराची स्तुति करावी.

**धन०**—तुह्मांला खोटें वाटेल पण मी खरेंच सांगतों. आंत एक आणि बाहेर एक असा प्रकार नाहीं.

**सत्य०**—अहो, पण हें पहा! **चंद्रकांत** महाराजांनीं तुमच्या महाराजांचा जो आदरसत्कार केला, तो यथायोग्यच केला. त्यांचा स्नेह आजचा का आहे! बालपणीं त्यांनीं एकत्र क्रीडा केली; एकत्रच ते वाढले; तेव्हां कधीं काळीं आतां गांठ पडली तर एकमेकांनीं एकमेकांचा उत्तम प्रकारें मान ठेवावा, यांत नवल नाहीं. यांचें परस्परांवर प्रेम फार आहे, तें इतकें कीं राज्यकार्यभारामुळें त्यांच्या परस्परांच्या प्रत्यक्ष जरी गांठी पडत नाहींत, तरी प्रतीहारमुखानें वारंवार घडतात. त्यावेळीं नजराणे, प्रीति-नी

लेख, वगैरे एकमेकांचे एकमेकांस जातात. एतावता ते लांब असूनही जवळच आहेत. एवढा महान् सागर आड आहेना, तरी त्यामुळें यांच्या मानसिक गांठी पडण्याला यांहीं प्रतिबंध येत नाहीं. ईश्वर करो आणि त्यांचें प्रेम असेंच कायम राहो !

१०—मला तर नाहीं वाटत कीं त्यांच्या प्रेमांत अंतर पडेल ह्मणून. तुमचे महाराज चांगले आहेतच, आणि तुमच्या भाग्योदयानें त्यांचा पुत्र **नंदन** हाही चांगला निघेल असें वाटतें. **चंद्रकांत** महाराजांच्या पाठीमागें तो तुह्मांला त्यांचा विसर पाडील. असा सुलक्षण पुत्र मिळणा तर नाहीं कोणा पाहण्यांत आला.

य०—तुह्मीं ह्मणतां तसाच तो राजपुत्र आहे. त्याकडे पाहून सर्व प्रजाजनांस समाधान वाटतें आणि आल्हाद होतो. अगदीं जख्खड झालेलेही ह्मणतात कीं हा मोठा झालेला आह्मीं केव्हां पाहूं !

धन०—राजपुत्र मोठा झालेला पाहिला ह्मणजे त्यांना मृत्यु प्रिय वाटेल, नाहीं बरें ?

सत्य०—होय. हेतु पुरल्यावर मग त्यांना वांचून काय करायचें आहे ?

धन०—काय करायचें आहे ? वा: ! मग त्याचा पुत्र पहावा असें वाटेल ! अहो **सत्यव्रत** ! एक इच्छा परिपूर्ण झाली कीं दुसरी उद्भवतेच. (जातात.)

---

**प्रवेश २:—स्थळ तेंच. राजवाड्यांतील दिवाणखाना.**

(चंद्रकांत, सुधन्वा, इंदुमती, नंदन, सत्यव्रत, व परिवार येतात).

सुधन्वा—नाहीं, आतां पहा, राहण्याची सवड नाहीं. गेलेंच पाहिजे. कारण,

**श्लोक.**

झाले सोडुनियां मला दिन किती ती राजधानी मम !
ओढाया गुरु राज्यधू[१] मजविणें तेथें न कोणी क्षम;
केला आदर आमुचा बहुपरीं झालों ऋणी तत्त्वता;
ऐसा लोभ असो निरंतर मनीं यावी अनुज्ञा अतां.

चंद्र०—नाहीं, इतक्यांत कांहीं आह्मीं जाऊं देणार नाहीं.

सुध०—नाहीं नाहीं. मला उद्यां गेलेंच पाहिजे, कारण,

**आर्या.**

नसतां आह्मीं, राज्यावरि येइल विघ्न कोणतें न कळे.
पश्चात्तापें जैसें, तैसें इतरें न चित्त होरपळे.

तशांत, आह्मीं आपल्या येथें थोडे दिवस राहिलों असें नाहीं. आपणाला त्रास किती द्यावा ?

चंद्र०—असा त्रास होतो आहे कोणाला ? आह्मांला तो पुरवला, मग तर झालेंना ?

सुध०—नाहीं. गेलेंच पाहिजे.

चंद्र०—भलतेंच. एक आठवडा तरी राहिलेंच पाहिजे.

सुध०—नाहीं. उद्यां आह्मी जाणारच.

चंद्र०—बरें, आठवडा नाहीं, तर नाहीं. चार दिवस तरी रहा.

सुध०—काय करावें आतां ? नका नका कोणी आग्रह करूं. तुमचें आणि मी ऐकणार नाहीं ! पहा.

**श्लोक.**

मोडीन शब्द तुमचा न कधीं घडेल;
राहीन, कारण तसेंच जरी असेल,
नाहीं तसें, ह्मणुनियां मज राहवेना;
कांपे मदीय सहती न विलंबनांना[२].

तर मग मला द्याच निरोप.

चंद्र०—(इंदुमतीस उद्देशून) पाहिलें का, जातों

---

१. राज्याचें जोखड. २. विलंबनांस. विलंबनें=विलंब, उशीर.

ह्मणतात? आह्मीं तर बोवा हात टेंकले. तुमच्याकडून कांहीं होईल तर बघा आतां.

इंदु०—छे! इतक्यांतच काय मला सांगायचें तें! त्यांजकडून आधीं शपथ घेववायची होती कीं मी जाणारच, आणि मग मला सांगायचें होतें कीं राहतील तर बघ. कसला मेला हा आग्रहाचा कोरडा प्रकार! साफ सांगावें कीं जायचें नाहीं ह्मणून. ह्मणावें कीं मद्र देशांत सर्व यथास्थित आहे. कालच नव्हता का आला तिकडून दूत? इतकें सांगावें ह्मणजे त्यांचें बोलणेंच खुंटलें.

चंद्र०—शाबास! कां महाराज! ऐकलेंना!

इंदु०—मला समजलें ते कां इतकी ओढ घेतात तें. आपणाला नाहीं का दिसत काय मनांतलें कारण असेल तें? येथें आले आहेत एकटे. बाई तेथेंच राहिल्या आहेत. कमलाक्षही तेथेंच आहे. तेव्हां त्यांची भेट केव्हां घेईन असें झालें आहे. वरकरणीं मात्र ह्मणायचें, कीं राज्यकारभार करण्याला तेथें कोणी नाहीं ह्मणून. त्यांना ह्मणावें "मनातलें खरें कारण सांगा, आणखी जा, आमच्याकडून ना नाहीं. पण मनातलें कारण सांगितलें पाहिजे." आणि मग ते होऊन जरी ह्मणतील कीं आह्मीं राहतों, तरी आह्मीं त्यांस सांगूं कीं आतां नका राहूं. पण तें असो.—भाऊजी! रहाना कां एक आठवडा अधिक! एका आठवड्यानें कांहीं वर्ष होत नाहीं. हें बघा! इकडलें जेव्हां तिकडे येणें होईल, तेव्हां तुह्मीं कीं नाहीं महिनाभर अधिक ठेवून घ्या, मजकडून कांहीं ना नाहीं. मग तर झालेंना? मला जरी घरीं करमलें नाहीं, तरी त्याबद्दल तुह्मांला दोष नाहीं लावणार.राहतांना तरमग?

सुध०—नाहीं हो, वहिनी!

इंदु०—मी नाहीं ऐकायची. राहिलेंच पाहिजे.

सुध०—खचित जाणारच!

इंदु०—खचित! खचित ह्मटल्यानें मी ऐकेन वाटतें? भाऊजी! तुह्मीं आणा हजारीं वाहिल्या, तरी मी कांहीं जाऊं द्यायची नाहीं. तुह्मीं ह्मणतां खचित जाणारच. पण मी ह्मणतें, खचित जायचें नाहीं. पुरुषाच्या 'खचितांत' जितका अर्थ, तितकाच बायकांच्या "खचितांत" आहे, हें लक्षांत ठेवा. भाऊजी! मग जाणार का? सांगा काय तें. जाणारच असाल, तर सांगतें द्वारपालाला, कीं घरांतून कोणाला बाहेर जाऊं द्यायचें नाहीं! मग कसें काय? खुषीनें राहणार कीं सक्तीनें राहणार? राहणार हें खचितच!

सुध०—रहायला लावणारच, तर मग खुषीनें कां न रहावें? सक्तीनें राहून तुमचें मनच दुखवायचें कीं नाहीं? तें तरी मग कशाला पाहिजे?

इंदु०—कां मी नव्हतें सांगितलें कीं, तुह्मांला राहिलेंच पाहिजे ह्मणून? आतां राहिलां, तेव्हां बरें नाहीं का झालें?

सुध०—होय, यांत काय संशय? दादाचीही आतां मर्जी जाणार नाहीं. दादाचा लोभ मजवर किती ह्मणून सांगूं? दादाची गांठ पडली ह्मणजे मला बाळपणची आठवण होते. त्यावेळीं आह्मीं

**श्लोक.**

क्रीडासक्त सदा असूं; अवगता चिंता नसे मानसीं;
अज्ञातापकृति, प्रमोदसरसीं पोहूं जणो मानसीं;

१. अज्ञात आहे अपकृति ह्म० अपकार ज्यांना, असे आह्मीं. २. हर्षरूप सरोवरांत. हें 'मानसीं' याचें विशेषण. ३. मानस (सरोवर).

नी.

निर्व्याज प्रणयें सदैव भरलें संशुद्ध अभ्यंतर;
गेले ते अनिमित्तहास्यरुदनप्राय क्षपावासर[1] !
निरुपम सुख घेऊं बाललीला करूनी;
असुख किमपि नेणूं प्रेम चित्तीं भरूनी;
परिचित नव्हत्या त्या राज्यचिंता मनासी;
निरवधि वय वाटे तें अह्मां बालकांसी.

या॰—कसें काय! यांचें मन वळतें कीं नाहीं?

इंदु॰—होय. न वळून काय करतें?

चंद्र॰—(एकीकडे) इच्या ह्मणण्यानें राहिला, आणि माझ्या ह्मणण्यानें रहात नव्हता, अं! (मोठ्यानें) खरेंच प्रिये! आजचें तुझें भाषण फारच मनोहर असतें.

इंदु॰—आजचेंच? ह्मणजे पूर्वीं कधीं नव्हतें, वाटतें!

चं॰—नाहीं, चुकलों. एकदा पूर्वीं असें भाषण मनोहर होतें खरें!

इंदु॰—तें केव्हां? खरेंच, नायकांचीं मनें कीं नाहीं अगदीं भोळसर असतात. मला समजत नाहीं वाटतें कीं हें आपलें उगीच चढविणें आहे? असो. पण "एकदा पूर्वीं" असें ह्मटलें, तो प्रसंग कोणता?

चंद्र॰—काय? नाहीं स्मरत?

**श्लोक.**

सभास्थानीं आले बहुत नृप आशा धरुनियां
हरूं कीं तन्वीचें मन विविध चेष्टा करुनियां,
"वरींना मी अन्यां. वरिन" ह्मणसी "सिंहलपति[3]"
कसे ते पीयूषापरि विसरती शब्द सुदति!

इंदु॰—आठवतो तो प्रसंग. वाहवा! एकूण तो आणि हा सारखाच! बरें, तसें कां होईना?

चंद्र॰—(एकीकडे) हें कांहीं ठीक दिसत नाहीं. अतिस्नेह झाला ह्मणजे पापाची शंका मनांत येते! हायहाय!

**श्लोक.**

हृदय उडतें, येते ग्लानी, मना भ्रम मोहवी,
करुनि विकलें गात्रें सारीं तनू ज्वर शोषवी;
नयन निववी जी ही पूर्वीं प्रिया मृगलोचना,
मम सलत ती नेत्रांमाजी अजी कुलटांगना!

अरे! मी असें ह्मणतों खरा, पण इतक्यानेंच काय झालें! यांत पापबुद्धि आहेच असें कशावरून? मनोहर भाषण हें आदरसत्काराचें एक चिन्ह नव्हे काय?-हं-घरच्यांनीं पाहुण्यांशीं मधुर भाषण करावें हें नीटच आहे. तेव्हां यांत कांहीं काळें बेरें नाहीं.—पण नव्हे. आदरसत्काराची कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं? आपलें एकमेकाजवळ जावें, नेत्रकटाक्ष फेरावे, हंसावें, सांकेतिक खुणा कराव्या, हा का आदरसत्कार? हें आपल्याला तर नाहींच पाहवत!—(मोठ्यानें) बाळा नंदना!—तूं कोणाचा रे?

नंदन—बाबा! मी तुमचा.

चंद्र॰—(एकीकडे) माझाच? हो, खरा हा माझाच आहे.—(मोठ्यानें) बाळा! हें तुझ्या नाकाला रे काय लागलें आहे?—(एकीकडे) माझ्यासारखेंच याचें नाक आहे, असें ह्मणतात.—बरें, चिंता नाहीं.—(मोठ्यानें) चल बाळा! आपण खेळूं.—तूं काय खेळत होतास? (एकीकडे) पण ही किती खेळ खेळली असेल बरें? परमेश्वरा! धिक् माझें जिणें!—(मोठ्यानें) नंदना!

नंदन—बाबा!

चंद्र॰—(एकीकडे) हा माझाच का नंदन? याचा तोंडवळा माझ्यासारखाच आहे, थेट माझीच प्रतिमा, असें बायका ह्मणतात.—पण बायका पाहिजे तें ह्मणतील! त्यांच्यावर भरंवसा कोणीं ठेवावा?—नाहीं, पण हा नंदन माझ्यासारखाच आहे, यांत कांहीं

१. कारणाशिवाय जें हंसणें आणि रडणें, त्यानें भरलेले. २. क्षपा—रात्र, वासर—दिवस. ३. सिंहलदेशचा राजा चंद्रकांत.

संशय नाहीं.—(मोठ्यानें) बाळा! इकडे ये बघूं! गुलामा! पळूं नको! मी कांहीं मारीत नाहीं! बाऊ का आहे मजजवळ?—(एकीकडे) अरे अरे! पण याची आई तशी असेल का?—असेलही—अरे ही प्रीति

**श्लोक.**

अनावर असे; नसे स्थिर कधींहि एक क्षण;
प्रभाव न कळे इचा. अनृतसें इचें लक्षण.
कधीं न घडती जगीं, घडविते असे संगम;
विवेक करितो इला प्रतिहतों मुधा हा भ्रम.

**सुध०**—आज दादाचें मन स्वस्थ दिसत नाहीं.

**इंदु०**—कोण जाणें बाई काय कारण झालें असेल तें!

**सुध०**—दादा! असे उद्विग्न कां दिसतां? आहां कोठें?

**इंदु०**—झालें तरी काय बाई! असें उद्विग्न व्हायला? सांगणें होईलका पण?

**चंद्र०**—छे! कांहीं झालें नाहीं. मी आहें तसाच आहें. काय चमत्कार आहे? बाललीला पाहून थोरांचें सुद्धां चित्त द्रवतें. नंदनाला जवळ घेऊन, त्याच्या मुखकमलाकडे पाहूं लागलों, तों याच्या वयाचाच मी होतों तेव्हांची आठवण झाली. त्यावेळीं मीही याचप्रमाणें

**श्लोक.**

चिमुकलाच किरिट शिरीं धरीं!
चिमुकलें धनु ओढितसें करीं!
नृपकुलीं मृगया लटिकी करीं!
सपदि तातविलोचन मोहरी!

बाळा नंदना! कोणीं तुझ्या हातांतून हें कंकण हिसकून घेतलें, तर तूं उगींच बसशील कारे?

**नंदन**—हो बसतों आहे! ही नाहीं का माझी धनुकली आणि हा बाण?

१. पराभूत, हें 'इला' याचें विशेषण. २. व्यर्थ.

**चंद्र०**—हं हं—तूं युद्ध करशील एकूण? शाबास शाबास! खरा क्षत्रिय आहेस.—का भाऊ! तुमचा कमलाक्ष एवढाच असेल, नाहीं बरें? तुह्मीं मजप्रमाणें खेळतां त्याशीं?

**सुध०**—हें काय विचारावें? माझा कमलाक्ष

**श्लोक.**

आनंदबंधु हृदया. मम तो विसावा,
क्रीडा करी मजसवें. दूर त्या न ठावा.
माझा सखा क्षणिक शत्रुहि होतसे तो,
कोपा दुरी करुनियां मज तोषवीतो.

**चंद्र०**—हेही बोबा आह्मांला असाच तोषै देतात. मी याला घेऊन येथें बसतों. भाऊ! तुमची मर्जी असेल तर उद्यानाची शोभा पहावी. प्रिये! तूंही यांच्या बरोबर ऐस. यांचें कांहीं कमी पडूं देऊं नको बरें. हे माझे बंधु आहेत लक्षांत ठेव.

**इंदु०**—येथें यायचें नसेल, तर नये येऊं. पण बाळाला मी जातें घेऊन. बागेंत हिंडायची त्याला मोठी हौस आहे.

**चंद्र०**—नाहीं. राहूं दे त्याला येथेंच.

**इंदु०**—बागेंत येणें होणार ना? बसूं का आह्मीं वाट पहात?

**चंद्र०**—वाट नको पहायला. वाटलें तर येईन. (एकीकडे) तुह्मांला कोठें ठाऊक आहे कीं हें मीं जाळें पसरलें आहे!—(मोठ्यानें) जा तुह्मीं. (सुधन्वा आणि इंदुमती जाऊं लागतात त्याकडे पाहून एकीकडे) पहा! ती कशी हंसते आहे! कशी गुलगुल गोष्ट सांगते आहे! जशी त्याची धर्मपत्नीच. हा चांडाळांनो! (सुधन्वा आणि इंदुमती जातात.) हाय! हाय! माझी फटफजिती झाली! माझी राणी परपुरुषासक्त झाली!—(मोठ्यानें) बाळा! जा खेळ. तूं खेळ.

१. भीति. २. नंदन. ३. संतोष.

नी-

मी खेळतों. तुझी आईही—हें— खेळ खेळते ! अरेरे ! माझ्या विमल कुळाला इनें कलंक लाविला!—अरे जा तूं खेळ.—आजपर्यंत कितीक बरें भोळसर पुरुषांना आपल्या स्त्रिया निरर्थक पतिव्रता वाटल्या असतील !—पूर्वीची गोष्ट कशाला ?—असें वाटणारे पुरुष आतां नसतील का ? नाहींत का ? त्यांना वाटतें आपली पत्नी मोठी साध्वी आहे ह्मणून !—पण—भोळे बिचारे ! त्यांना कोठें ठाऊक आहे कीं त्यांची पत्नी जवळच्याच एकाद्या तरुण पुरुषावर आसक्त असेलशी? दहांत एकादी तरी चांगली सांपडेल काय ? हाय! हाय! स्त्रियांचा खोटेपणा किती ह्मणून वर्णावा ?

**श्लोक.**

गोड शब्द वदनें वदतील,
प्रेमपूर्ण नयनें हंसतील,
चिंतितील हृदयीं भलत्यातें,
स्त्रीचरित्र न कळे कवणातें !

असें आहे तरी त्यांना भुलून नर फसतात, सुधा ह्मणून पितात !—आणि या रोगावर औषध ह्मणून मुळींच नाहीं ! हा प्रकार अमुक ठिकाणीं नाहीं, असें कांहीं ह्मणतां येणार नाहीं ! या रोगाचा प्रवेश पाहिजे तेथें होतो ! आडकाठी कोठेंही नाहीं ! इतकें असून चमत्कार हा, कीं ज्यांना त्याची पीडा होते, त्या बहुतेकांस ती होते हेंच [illegible]त नाहीं!—कसें काय बाळा ?

इंदु०—बाबा ! मी तुमच्या सारखा आहे. नाहीं बरें ?

चंद्र०—होय.—यांतच कांहीं समाधान आहे.—कोण आहेरे तिकडे ? **सत्यव्रत** ! तुह्मी का आहां ?

सत्य०—होय महाराज !

चंद्र०—बाळा ! तूं जा यांच्याबरोबर खेळायला. कसा शहाणा आहेस, पाहूं. ( नंदन परिवारासह जातो.) ऐकिलें कां **सत्यव्रत** ! हे बोवा आणखीं राहणार !

सत्य०—त्यांना राहून घेण्याला महाराजांना कोण प्रयास पडले ! फिरफिरून ते ओढच घेत !

चंद्र०—हें पाहिलेंतना तुह्मीं ?

सत्य०—महाराजांच्या ह्मणण्याला कांहीं हो ह्मणतचना. जसजसा आपला आग्रह अधिक होऊं लागला, तसतसें त्याचें काम निकडीचें होत गेलें.

चंद्र०—एकूण तुमच्या लक्षांत हें आलें अं ?—( उत्तरी टाकून एकीकडे ) झालें! एव्हांच सुरू झालें ! इतक्यांतच कुणकुण होऊं लागली ! लागले ह्मणायला **चंद्रकांत** महाराज असे आहेत ह्मणून ! माझ्या कानावर गोष्ट येईपर्यंत ती कितीकांच्या कानीं जाईल !—( मोठ्यानें ) बरें **सत्यव्रत** ! असें होतें, तर मग हेहो कसे राहिले ?

सत्य०—राहिले ह्मणजे काय, आईसाहेबांच्या आग्रहास्तव.

चंद्र०—असें असें !—बरें, झालें तें चांगलें झालें.—पण नाहीं !—बरें, हें तुमच्याच लक्षांत आलें, कीं दुसऱ्यांच्याही लक्षांत आलें ? तुमची तैलबुद्धि आहे. तुह्मांस चटदिशीं समजतें. इतरांच्या लक्षांत नसेल आली ही गोष्ट ?

सत्य०—कां बरें ? **सुधन्वा** महाराज आणखीं कांहीं दिवस राहणार, ह्मणून बहुतेकांनीं ताडिलें आहे.

चंद्र०—हं ?

सत्य०—होय. ते येथें रहाणार.

चंद्र०—पण कां रहाणार याविषयीं सरदार काय ह्मणतात ?

सत्य०—महाराजांचें आणि राणीसाहेबांचें मन मोडूं नये ह्मणून ! इतकेंच !

चंद्र०—राणीचें मन मोडूं नये, ह्मणून अं! इतकें पुरें आहे.—सत्यव्रत !

श्लोक.

विश्वासस्थान केलें विविध हितगुजां सांगुनियां तुह्मांतें,
नाहीं अतथ्य कांहीं मजजवळि असे तूमचें हेंच नातें !
मत्कार्यैकसाधो मजसि बहुपरीं योग्य तो बोध केला.
वाटे आतां मनातें कुटिलमति तुह्मीं; व्यर्थ विश्वास ठेला.

सत्य०—नाहीं महाराज ! असें कसें होईल ?

चंद्र०—कसें ह्मणजे काय ? मी ह्मणतों हें निःसंशय खरें आहे. तुह्मीं खोटे आहांत, कारण

श्लोक.

असाल जरि हो खरे, वदतसां न कां सत्य तें ?
तुह्मांस भय कासया ? परिजनास तें शोभतें !
अथवा
प्रमाद घडला जरी, भरवसा मला आपुला.
किंवा
दिसानि जरि झांकितां नयन, काय भांबावलां ?

सत्य०—महाराज ! या दासाच्या हातून प्रमाद घडले असतील, मूर्खपणाही झाला असेल, व प्रसंगीं भेकडपणाही दिसला असेल. व असा प्रकार प्रत्येकाच्या हातून घडतो. या संसारांत अनेक प्रसंग येतात, त्यांत एकना एक दोष मनुष्याचा दिसून येणारच आहे. तरी प्रभूंनीं तो पोटांत घातला पाहिजे. कारण

श्लोक.

कार्यार्थीं जरि असे घडला प्रमाद,
मी मूढ सत्य. मजला बहु हो विषाद.
मूढें अजाणुनि जरी अवमान केला,
कीजे क्षमा. प्रभुकृपेंविण हा भुकेला.

आणखीं असें पहा कीं,

श्लोक.

जें वाटलें मजसि साहस, तें कराया
झालों पराङ्मुख; न दूषण ये जना या;
भीतिप्रमोहवश हो नर जाणताही,
शंका मनीं उपजली न कळे कशी ही ?

तेव्हां महाराजांनीं माझ्या खरेपणाविषयीं संशय घेऊं नये. दुसरी प्रभूपाशीं इतकी प्रार्थना आहे, कीं असें संदिग्ध भाषण करूं नये. माझा अपराध कोणता, हें या दासास स्पष्टपणें सांगावें. ह्मणजे घडला असेल तर कबूल करीन, नसेल तर तसें सांगेन.

चंद्र०—अहो सत्यव्रत ! मी संदिग्ध बोलत नाहीं. तुह्मांला ठाऊक असलेंच पाहिजे, कारण

श्लोक.

तुह्मां न जरि हें दिसे, नयन अंधता पावले !
तुह्मां श्रुत न हें जरी, बधिर कर्ण ते जाहले !
तुह्मां न कळलें, तरी कळतसे वदा काय तें ?
अहा! परवशा प्रिया कुटिलता कशी लोविते !

याबद्दल तुमची तर खातरी होऊन चुकली असेल, आणि मला जर

श्लोक.

सांगाल सत्य, तरि संशय काय राहे ?
राज्ञी विलोल[१] परपूरुषसक्त आहे !
बोला तुह्मांस बहु जीं दिसलीं प्रमाणें,
नाहीं तरी नयनपंगु[२] तुह्मांस जाणें.

सत्य०—महाराज! राणीसाहेब आमच्या श्री-त्यांविषयीं इतर कोणीं असें ह्मटलें असतें तर मी असा स्वस्थ बसतों ना! पण तेंच, आपण कांहीं तरी मनांत आणितां? दासाला क्षमा असावी ! पण असले विपरीत

१. माझा कार्यार्थ—त्यांचेंच एकट साधणारे असे भलो तुह्मीं !

१. चंचल. २. अधू डोळ्यांचे.

शब्द कधींही महाराजांनीं मुखांतून काढूं नयेत, व आह्मींही ऐकूं नयेत. असले शब्द कोणी परिजन उच्चारील, तर त्याची जीभ झडो !

**चंद्र०**—काय **सत्यव्रत** ! कानाशीं कान लावणें, गालाशीं गाल लावणें, हळूच बोलणें, एकीकडे बघून हंसणें, मध्येंच सुस्कारा टाकणें, एकांतस्थानाची अपेक्षा करणें, युगसम घटिका वाटणें, मध्यरात्र केव्हां होईल ह्मणून उत्सुक होणें, इतरांच्या दृष्टी-आड नीच कर्म करूं पाहणें, हें कांहीं नाहीं काय?—हें कांहीं नसेल तर सारें जग मिथ्या आहे ! आणि हा सर्व भास आहे !

**श्लोक.**

नसे ही धरित्री, नसे ईत कांहीं,
जगा व्यापितें तेंहि आकाश नाहीं;
नसे तो सुधन्वा, न मी चंद्रकांत,
नसे भाज माझी. असो हा कथान्त !

**सत्य०**—महाराज ही खचितच कुकल्पना आहे, ही आपण लवकर काढून टाका कशी. नाहीं तर इजपासून फार अनर्थ घडतील!

**चंद्र०**—(हास्यानें) कल्पना खोटी नव्हे, खरी आहे.

**सत्य०**—छे: असें कधींही होणार नाहीं.

**चंद्र०**—नाहीं ह्मणजे ? मी ह्मणतों खरी आहे आणि तुह्मी ह्मणतां नाहीं ह्मणून ? **सत्यव्रत** ! तुह्मी खोटें बोलतां ! यामुळें तुमचा मला तिटकारा येतो ! माझी आतां खातरी झाली तुह्मी अगदीं मंदधी निष्काळजी आहां—नाहीं—तुह्माला सर्व ठाऊक आहे, पण उगीच माहीत नाहींसें दाखवितां! अहो **सत्यव्रत** ! सत्य स्मरून वागा! कानांवर हात ठेवतां याला काय ह्मणावें ? हें बघा, देवाच्या घरीं क्षमा नसती, तर तिचा केव्हांच अंत झाला असता !

**सत्य०**—महाराज ! आईसाहेब परपुरुषासक्त ह्मणतां, तो परपुरुष कोण ?

**चंद्र०**—कोण ह्मणजे नाहीं ठाऊक ? अहो, तो **मद्राधिप सुधन्वा**, ज्याच्या गळ्यांत जाणों ती ताईत बनून राहिली आहे ! त्याला—(थांबून) पण माझा परिजन मजशीं इमानी असेल, आपल्या स्वतःच्या हिताकडे जशी त्याची दृष्टि असते, तशी माझ्या कीर्तीकडे असेल,—तर तो असें काम करील, कीं पुढें मग तिकडे पहायालाच नको.—परिजनचसा काय ? तुमच्या हातून नाहीं का हें काम घडणार? सुरापात्रांत थोडी पूड टाकिली, कीं मग पुन: शत्रूचें नांव काढायला नको. तुमचा मला भरंवसा आहे. **सत्यव्रत** ! या गोष्टीमुळें माझ्या तळपायाची आग मस्तकापर्यंत गेली आहे, तेव्हां माझें काम ऐकालच. असला पेला मला मिळेल,तर तो मला संजीवनी सुधाच वाटेल.

**सत्य०**—महाराज! आपण हें काय मनांत आणिलें आहे? मला विष देतां येणार नाहीं, अशी गोष्ट नव्हे. आणि मीं विष दिलेंच, तर असलें जलाल विष देणार नाहीं. असें देईन कीं त्याचा परिणाम लवकर जरी दिसून येणार नाहीं, तरी आज नाहीं उद्यां कार्यभाग करायला कधींही चुकणार नाहीं. पण आमच्या राणी साहेबांच्या हातून असें कुकर्म घडलें असेल, अशी कल्पना सुद्धां मला करवत नाहीं.—काय यांची योग्यता! काय त्यांची थोरवी !—महाराज ! आपल्या चरणांशीं लीन हा दास आजकालचा नाहीं.

१. बायका.

[stamp] ठाणे.

माझें सर्व वय आपल्याच सेवेंत गेलें, तेव्हां माझ्या—

चंद्र०—सत्यव्रत! मीं जी गोष्ट तुम्हांला सांगितली, ती खोटी आहे असें पुन: तर ह्मणा!

श्लोक.

वाटे काय तुम्हां असे मति जडा माझी तशी चंचला?
कीं दूषीन वृथा कुतर्क करुनी अत्यंत्य धौता कुला?
कीं निष्कारण शोकशंकुशकला रोपीन मी मानसीं?
कीं निद्रा सुखकारिणी मज नको? वाटे मला कालसी?

सत्य०—तुम्हांला वाटतें काय, कीं जो नंदन मला मनापासून आवडतो, त्याच्या जननीविषयीं मी—आणि—निराधार कुकल्पना काढीन? असें संभवतें तरी? मी इतकाका अधम आहे?

सत्य०—महाराज! इतकें आपण निक्षून सांगतां, तेव्हां मला खरें समजलें पाहिजे. आणि त्या कृत्याबद्दल सुधन्वा महाराजांस मी दूर करीन. पण माझी एक अट आहे, ती जर महाराजांस कबूल असेल, तर!—सुधन्वाच्या वधानंतर राज्ञीचा महाराजांनीं त्याग करूं नये. याचें कारण—एक तर, हा केवळ संशय आहे. दुसरें, नंदनाविषयीं उगीच भलभलते कोणी कांहीं ह्मणूं नये ह्मणून! नाहीं तर आपल्या आणि इतर राजांच्या दरबारांत व्यर्थ याविषयीं चर्चा होईल.

चंद्र०—माझ्या मनांतील गोष्ट तुम्हीं बोललां! यापुढें तिला मी मुळींच दूषण ठेवणार नाहीं. ही सर्व गोष्ट विसरेन.

सत्य०—महाराजांनीं आतां स्वस्थ असावें. एव्हांपर्यंत जशी प्रसन्न मुद्रा होती, तशीच पुन: धारण करावी; सुधन्वा महाराजांस किंवा बाईसाहेबांस याविषयीं संशय घेण्याला कारण ठेवूं नये. मग त्यांचा वध मजकडे लागला. विषानें जर त्यांचा अंत होणार नाहीं, तर माझें नांव बदलून ठेवा, आणि पुन: मला आपल्या पायांजवळ येऊं देऊं नका.

चंद्र०—झालें तर मग! एवढें काम करा, ह्मणजे तुम्हीं माझे दुसरे पंचप्राण व्हाल. नाहीं तर पहा, आपल्या प्राणांस मुकाल!

सत्य०—याविषयीं महाराजांनीं आतां बेफिकीर रहावें.

चंद्र०—तुम्हीं मला सांगितल्याप्रमाणें, आचरणांत वर्तनांत अंतर पडलेंसें मी दिसूं देणार नाहीं. (जातो.)

सत्य०—हा राज्ञि! हा मंदभागिनि! तुझ्याविषयीं असा खोटा संशय राजाच्या मनांत यावा काय?—माझी पण कोण बिकट स्थिति ही!

श्लोक.

प्रभुनिदेश न मी जरि तो करीं,
प्रभु तरी मम जीवित संहरी!
जरि करीं नृपसत्त्वमघात मी,
तरि पडेन अहा! कवण्या तमीं?

पहा आमच्या महाराजांची

श्लोक.

मति कशी फिरली सुहृदावरी
नच विवेक करी तिजला दुरी;
सकल तत्त्वविचार विलोपला,
मज ह्मणे 'विष दे!' प्रभु कोपला!

पण हें ह्मणणें कसें ऐकावें? असलें कारस्थान करून

१. धुतलेलें. अर्थात् शुद्ध, पवित्र. २. शोकरूप खिळ्याचा तुकडा. ३. रोंवीन. ३. काळासारखी.

१. राज्ञी (संबोधन).

**श्लोक.**

हो प्रसन्न जरि आज नृपाल,
प्राप्त होय जरि वित्त अमोल;
डाग लाविन न मी स्वकुलातें,
देह जाय तरि खेद न मातें.

**सत्या०**—तेव्हां हें राज्यच सोडून जावें, हें बरें. कारण येथें राहूनही जर मृत्यु येणार आहे, तर मग दुसरीकडे जाण्याची कां भीति वाटावी? यायोगानें हात तरी विटाळणार नाहींत.—अरे, पण सुधन्वा महाराज आले!

( सुधन्वा येतो. )

**सुध०**—हें झालें तरी काय? मजशीं बोलूं सुद्धां नये?—कसें काय सत्यव्रत! ठीक आहेना?

**सत्य०**—हो! महाराजांच्या दयेनें सर्व ठीकच आहे!

**सुध०**—कांहीं नवल विशेष?

**सत्य०**—हं—विशेष ह्मणण्यासारखें कांहीं नाहीं.

**सुध०**—नाहीं कसें?

**श्लोक.**

राजाचें मुख दुर्विषण्ण[१] दिसतें गेलें जणों राज्यसें,
बोले एकहि शब्द ना मजासि तो; झालें तरी कायसें?
मातें देखुनि ओष्ट चावुनि रदीं भ्रूभंग केला पहा;
केला मीं अपराध काय न कळे का चेतला कोप हा?

**सत्य०**—महाराज! मी काय सांगूं? कसें सांगूं?

**सुध०**—कसें सांगूं? ह्मणजे तुह्मांला माहीत आहे एकूण? तुह्मांला ठाऊक असून, सांगवत नाहीं अं? कां पण नाहीं सांगवत? अहो सत्यव्रत! तुमच्या या उतरलेल्या चर्येवरून माझी खातरी होते, कीं या प्रकरणांत माझा कांहीं तरी संबंध असला पाहिजे. नाहीं तर मजविषयीं विराग व्हायला कारण काय?

**सत्य०**—महाराज! विराग व्हायला कारणें अनेक असतात. त्यांपैकीं एक झालें आहे. पण तें मला सांगवत नाहीं. आणि विशेष हा कीं, आपणामुळें झालें आहे, तरी आपलें त्यांत मुळींच अंग नाहीं.

**सुध०**—मजमुळें झालें आहे? आणि माझें त्यांत अंग नाहीं असें कसें? मण्यारीची सांवली पडली ह्मणजे मनुष्य मरतें, तसा तर माझा कांहीं प्रकार नाहींना? कीं त्यावर माझी सांवली पडावी, त्यांच्या मनामध्यें विकृति व्हावी? अहो, सत्यव्रत!

**श्लोक.**

बुद्धीनें चतुर असां; महान् कुलानें,
आलासे अनुभव तो तुह्मां वयानें;
सांगावें मम हित कोणतें वदाना?
सेवावें न बुधजनीं कदापि मौना

**सत्य०**—महाराज! माझ्यानें नाहीं सांगवत!—

**सुध०**—मजकडून कारण घडलें, आणि मला कळूं नये?—नाहीं, सांगितलेंच पाहिजे. हें पहा सत्यव्रत! तुह्मांला मी

**श्लोक.**

आळवीं शपथ घालुनियां अता.
कासया भय यथातथ सांगतां?
काय वृत्त घडलें कळवा मला.
स्नेहसागर कसा झणिं आटला?

**सत्य०**—आतां शपथच घातली, तेव्हां सांगितलें पाहिजे. मी सांगतों तें ऐकावें, आणि त्याप्रमाणें लागलींच करावें. नाहीं तर महाराजांना आणि मला दोघांनाही रामाचें नांव घ्यावें लागेल. मग कसें?

**सुध०**—कसें कसलें? सांगा.

**सत्य०**—आपला वध करावा, अशी मला आज्ञा झाली आहे!

**सुध०**—कोणाची ती?

**सत्य०**—आमच्या महाराजांची!

**सुध०**—आणि ती कशाकरितां?

---
१. दुःखी.

सत्य०—त्यांना वाटतें आहे,—नाहीं,—ह्मणतात माझी खातरी झाली आहे—जाणों त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें आहे किंवा धरिलें आहे!—ह्मणतात आपला आणि राणी साहेबांचा कांहीं संबंध आहे ह्मणून!

सुध०—शिव! शिव! त्या साध्वीच्या नखाला तरी कोणी शिवेल काय? असें दुष्कर्म मजकडून घडलें असेल, तर मग

### श्लोक.

[१]घडो बुध मला सदा, मम न नाम घेवो मुखें,
जळो मम शरीर हें सतत दाहयोगें सुखें,
पडोत कृमि त्यांत वा बहु सुटोनि दुर्गंधिही,
धरो अधम पातकी न मजसारिखा ही मही!

सत्य०—महाराज! आपण जीव तोडतोडून जरि सांगितलें, तरी चंद्रकांत महाराजांची शंका दूर होणार आहे काय? त्यांच्या जीवांत जीव आहे, तोंपर्यंत ही राहील. आपण

### श्लोक.

अनेक शपथा वहा, मह फिरे न त्यांचा तरी,
अकारण विराग जो विधिहि काय दूरी करी?
महाप्रलयमारुतें जलधि जो असे क्षोभला
तयास शमवा, तरी सफल यत्न हो आपला!

सुध०—पण हें असें झालें कसें?

सत्य०—कसें झालें,हें मी काय सांगूं? आतां कसें झालें याचा विचार करण्यांत हंशील नाहीं. संकट आलें आहे, त्यांतून पार पडण्याचा यत्न केला पाहिजे. महाराज! या जनावर जर विश्वास असेल, तर मी सांगतों त्याप्रमाणे करा. मजविषयीं कांहीं संशय असेल, तर मी आपल्याबरोबर येतों, पण आपण आज रात्रीं येथून निघून चला. आपल्या परिजनास हा बेत हळूच कळवीन, आणि दोन दोन तीन तीन असे निरनिराळ्या वेशींतून नगराबाहेर काढून देईन. आतां मजविषयीं ह्मणाल, तर मी आपला चरणांचा दास आहें. मी आपणाला राजाचा गुप्त बेत कळविला, तेव्हां येथें राहून कांहीं आतां उपयोग नाहीं.—आपला निश्चय ढळूं देऊं नका. . . . समजून, आपणाला सांगतों ही गोष्ट . . . नव्हे. इच्या खरेपण विषयीं प्रत्यंतर प. . . ण्याच्या भरीस पडाल, तर प्रत्यंतर मिळणं कठिण! कारण माझ्यानें महाराजांच्या देखत ही गोष्ट कबूल करवणार नाहीं. आणि मग आपला जीव निर्धोक आहे असें समजणें ह्मणजे सुळावर चढविलेल्या चोरानें आपला जीव निर्धोक आहे, असें समजण्यासारखें आहे.

सुध०—सत्यव्रत! तुह्मी सांगतां ती गोष्ट ख[रीच] आहे. चंद्रकांत राजाच्या आकारावरून . . . मुद्रेवरून, त्याचें मन कळून येतें. चला! तुह्मी माझे मित्र आहां! मला या संकटांतून पार पाडून द्या, ह्मणजे तुह्मांला कशाचीहि काळजी नको! जहागीर, धन, मान सर्व कांहीं तुह्मांला मिळेल. आमचीं जहाजें तयार आहेत; मी परवांच येथून निघणार होतों, आणि आमच्या परिवारानें तशी तयारीहि ठेविली होती—पण या दोन दिवसांत काय चमत्कार झाला पहा!

### श्लोक.

राज्ञी मंगलधाम, विश्रुत तिचें सौंदर्य लोकत्रयीं . . .
राजाचा अनुराग तीवरि, तसा अत्यंत तीचा त[यावरी]
आह्मीं प्रेमनिबद्धचित्त नृपतीं वाटूं जनां एकसे . . .
[३]मात्सर्याब्धितरंगविक्षुब्ध पहा तच्चित झालें कसें?

या शंकेस आधार ह्मणून कांहीं न[ाहीं] . . . [रा]त्र . . . ! नी

---

१. कल्याणाचें घरच काय अशी. २. प्र . . .
३. मत्सरबुद्धि हाच कोणी एक समुद्र, त्याच्या [लाटां]टांनीं क्षुभित झालेलें.

पण तिजमुळें काय अनर्थ झाला आहे पहा. पूर्वी माझे ठायीं

### श्लोक.

तुयाचा जो होता प्रणय विरला तो अजि पहा !
... द्वेषें झालें अति कलुष त्याचें मन अहा !
या... ा मद्धाना बहुविध उपायांस निरखी !
...ते शंका कांहीं. मजसम न कोणीच असुखी!

मी या संकटांतून कसा तरी पार पडेन ! परंतु त्या साध्वीची काय वाट ?

### श्लोक.

नेगें काय करील कोपदहनें संदग्धचेता पति !
हा निष्कारण कोप! दुःसह कसा साहील संताप ती !
हा ! कैशी नृपभाज शुद्धहृदया पुण्यव्रता नाडिली !
योजूं काय उपाय ? दग्ध विधिनें चेष्टा कशी मांडिली?

ईश्वरा ! तिचें कल्याण कर ! मजकडून तिला काय साहाय्य होणार आहे ? उगीच राहून तिला कदाचित् अधिक जाच मात्र होईल ! सत्यव्रत ! चला मला नगरांत नेऊन पोंचवा, ह्मणजे तुह्मीं मला जीवदान दिलें, असें मी समजेन. येथून जाऊं या कसें.

सत्य०—महाराज ! दिंडीच्या किल्ल्या मज जवळच असतात, तेव्हां नगराबाहेर अडचण कांहीं पडणार नाहीं. महाराजांनीं मात्र त्वरा करावी. (जातात.)

---

## अंक २.

१. स्थळ.—सिंहलद्वीप.—राजवाडा.

(इंदुमती, नंदन आणि दासी येतात.)

इंदु०—याला नेतां काग कोणी ? यानें कीं नाहीं मला भंडावून सोडिलें आहे !

... दासी—या बाळासाहेब ! मजबरोबर खेळा. ...वला खेला पाहूं.

...—अं अं ! मी नाहीं तुजबरोबर खेळणार.

...दासी—कां नाहीं बरें ?

नंदन—घेघे ! आपले तूं माझे मुके घेतेस तुला वाटतें मी अजून लहानच आहें ! मी नाहीं तुजजवळ येत —(दुसरीस उद्देशून) मला इजजवळ जावेंसे वाटतें.

२ दासी—माझ्याच जवळ येण्याला कां बरें बरें वाटतें अमच्या धाकट्या महाराजांना ?

नंदन—कां बरें ह्मणजे काय सांगूं ? आपलें यावें वाटतें.—कायग उमे ! तुझ्या या भोंवयांचे केंस कसे काळे भोर आहेत ! बायकांना काळे केंस छानदार दिसतात नाहीं बरें ? या तुझ्या भोंवया कशा माझ्या धनुकलीसारख्या दिसतात.

२ दासी—हें कोणीं शिकविलें आपणाला ?

नंदन—मला कोण शिकवितो ? मला जसें कळतच नाहीं वाटतें. ही बघ माझी धनुकली कशी कमानदार आहे ! कायग येसू ! तुझ्या भोंवयांचा ग रंग कसा आहे?

१ दासी—तांबडा महाराज !

नंदन—वाः ! ओठांचा रंग तांबडा पाहिला आहे, पण भोंवया का तांबड्या असतात? मला फसवितेस, नाहीं ?

२ दासी—बाळासाहेब ! मी तुमच्या कानांत एक गोष्ट सांगतें. आतां कीं नाहीं थोड्या दिवसांनीं आपणाला भाऊ होणार आहे. मग आह्मीं नको ह्मटलें तरी तुह्मीं त्याशीं खेळण्याकारितां आपोआप याल.

१ दासी—आतां दिवस भरत आले ! देवाच्या दयेनें त्या सुखरूप मोकळ्या होतील !

इंदु०—काय ग त्याला भलभलतेंच सांगतां आहां ! मोठ्या शाहण्या झाल्या ! बाळा ! इकडे ये कसा. ये बैस येथें, आणखी एकादी चांगली गोष्ट सांग पाहूं.

---

१ चित्त ज्याचें जळून गेलें आहे असा.

नंदन—कोणची सांगूं? राक्षसाची सांगूं कां त्या भद्र राजाची सांगूं?

इंदु०—चांगली गोडशी सांग. मग कोणचीही असो.

नंदन—नाहीं, राक्षसाचीच सांगतों.

इंदु०—बरें ती कां होईना? राक्षसाची सांग. मला ठाऊक आहे, तूं मोठा लबाड आहेस. राक्षसाची गोष्ट सांगून तूं मला भिवविणार? बरें तूं भिवीव, पण मी नाहीं हो भ्यायची!

नंदन--सांगूं? एक होता राजा—

इंदु०—येथें असा बस, आणि मग सांग.

नंदन—याला होत्या दोन बायका! आई! मी हळूच सांगतों अं! भिंतीला सुद्धां ऐकूं येणार नाहीं.

इंदु०—हं. अगदीं कानांत सांग.

(चंद्रकांत संस्तावक आणि परिवार येतात.)

चंद्र०—काय तुह्मीं त्याला तेथें पाहिलें? सर्व परिवार त्याच्या बरोबरच होता? आणि सत्यव्रतही त्याजबरोबरच?

१ सरदार—नारळीच्या आडून पळून जातांना त्यांना मीं पाहिलें. काय पण त्यांची ती गर्दी! ते थेट अपल्या तारवापर्यंत एकसारखे पळत गेले!

चंद्र०—(एकीकडे) मला वाटलें होतें कीं हा माझा कुतर्क असावा. पण सर्व खरें! प्राज्ञांच्या अंत:करणाची प्रवृत्ति हीच त्यांस प्रमाण होय! हरहर!

**श्लोक.**

कशी शंका माझी अवितथ[१] असे आज ठरली!
कशी अंतर्ज्ञा ही मजसि मति ईशें वितरली!

अरेरे! ह्या अंतर्ज्ञा मतीनें माझ्या सुखाच्या ताटांत विष कालविलें!

अहा! कां मी नाहीं जडमति? जडा बुद्धि बरवी!
नको प्रज्ञा दीप्ता, अभिजनविना मान नुरवी!

खरेंच, हें ज्ञान चांगलें नाहीं. अज्ञानांत मोठें सुख आहे हेंच खचित! कारण,

**श्लोक.**

मंडूकावृतभोग[२]पन्नगवरें दुर्दश केला जरी,
नाहीं पन्नग देखिला, विष न तें त्याचें चढे तोंवरी!
तो का रूर्प विलोकितांच नयनीं, दावी शरीरास तें;
केला दंश मला भुजंगमवरें एसें मला भासतें!

अरे हा दुष्ट सुधन्वा खरोखरीच भुजंग[३] आहे! आणि या भुजंगाला सहाय तो सत्यव्रत! अहारे सत्यव्रता! सत्य व्रताचा खरा तूं पुतळा! तुला सत्यव्रत ह्मणण्यापेक्षां कुट्टिनीव्रत हें नांव चांगलें साजेल! मला विष देऊन दूर करावें, माझें राज्य घ्यावें, असा यांचा दुष्ट हेतु होता! माझे संशय सर्व खरे झाले! तो लुच्चा—ज्याला मी तें काम करावयास सांगितलें, तोच त्यांच्या पक्षाचा! त्यामुळें हा माझा बेत फसला, ह्मणून तो केवढा आनंद मानीत असेल! (उघडपणें १ सरदारास) बरें दिंडीचीं दारें हो कशीं इतके लौकर उघडतां आलीं?

१ सर०— महाराज! त्यांच्या किल्ल्या तर सत्यव्रताकडेच असत; आणि त्याही महाराजांच्याच आज्ञेवरून! कितीदा त्यांनीं पूर्वीं अशीं दारें उघडविलीं असतील!

चंद्र०—खरेंच. हें मला ठाऊक आहे. (इंदुमतीस लक्षून) चल, हा नंदन इकडे ये. हा माझा आहे! तुजजवळ राहतां नाहीं कामाचा!

१. खरी.

१. कुलीन. २. ज्याच्या फणेवर बेडूक बसला आहे असा पन्नगवर ह्मणजे सर्पश्रेष्ठ. ३. हा शब्द श्लिष्ट आहे. याचे दोन अर्थ होतात. एक 'सर्प.' आणि दुसरा 'जार.'

रात्र-

! नी-

इंदु०— आज झालें आहे तरी काय असें हें? कोण पण ही थट्टा?

चंद्र०—घेऊन जा कसें या नंदनाला येथून! इकडे त्याला फिरकूं देऊं नका! तिला याची करमणूक हवी असेल, तर आतां होईल त्याजकडून करून घेईल! (नंदनाला सेवक घेऊन जातात.) हा गर्भ माझा नव्हे, त्या त्या दुष्ट सुधन्व्याचा आहे!

इंदु०—हें काय असलें भलभलतें बोलावें? कांहीं जिभेला हाड असावें कीं नाहीं! कीं आपली उचलली जीभ आणि लावली टाळ्याला! कोणी ऐकलें तर काय ह्मणेल?

चंद्र०—काय ह्मणणार आहेत? एवढेंच कीं नाहीं?

## श्लोक.

या राज्ञीचें रतिहुनि असे आगळें रूप साचें,
सर्वांगींही विलसुनि अहा! देहलावण्य नाचे;
या कांतीशीं सदृश असती चारुता मानवांची;
रूपें चित्तें अनुपम कृती वाटती हे विधीची!

अरेरे! मला हें ह्मणणें बरें कां वाटतें आहे? पण काय करूं?— सत्य अप्रिय असलें तरी वदलेंच पाहिजे! दुष्टे! तूं जारिणी आहेस!

इंदु०—देवारे देवा! दुसऱ्यानें कोणी असें ह्मटलें असतें, तर त्याच्या अधमपणास पारावार नव्हता! पण आपण हें ह्मणतां तेव्हां बोलणेंच खुंटलें! काय माझें आपण पाहिलें? हा आपणाला भ्रम झाला तरी कसा?

चंद्र०—मला भ्रम! भलतेंच! हा भ्रम माझा नव्हे, तुझा आहे! सुधन्वा हाच चंद्रकांत आहे, असा तुला ग भ्रम झाला!—अरे—पण तुला आतां "अग" कसें ह्मणावें? तूं जारिणी आहेस, इतकेंच नाहीं, तर माझा प्राण अपहरण करावा, असाही तुझा बेत होता! आणि त्या सत्यव्रताचें या कामांत तुला साहाय्य होतें! तुला ठाऊक नाहीं काय कीं आपण दुष्कर्म केलें आणि तें कोणाशीं ह्मणून? लाज वाटा गी, पण लाज सर्व गिळून टाकली आहे! अगदीं नीच लोक असतात त्यांना जी लाज असते ती तुला नाहीं! किती दुष्ट आचरण हें! बरें, ते पळून जाण्यालाही मदत तुझीच!

इंदु०—पाहिजे त्याची शपथ घेईन, मला हें ठाऊक नाहीं. हें केवळ कुभांड रचिलें आहे, असें जेव्हां आपणांस कळून येईल, तेव्हां बरें आपणाला किती वाईट वाटेल! त्यावेळीं हे शब्द परत घेतां येतील का? माझी चूक झाली, या ह्मणण्यानें या सर्वांचा परिहार होईल काय?

चंद्र०—माझी? आणि या कामांत, चूक? भलतेंच. पहा!

## श्लोक.

पूर्वेचा रवि तो करील उदया अस्ताचलाचे शिरीं?
जे तारे गगनांगणीं विलसती येतील ते भूवरी!
मर्यादा न कधीं त्यजी गहन जो सोडील तो वारिधी!
माझी उक्ति जरी गमे अनृतशी, कीं हो निराधार धी।

तुझा वधच करावा—पण नाहीं! तुला बंदींत टाकतों, ह्मणजे—

इंदु०—असो; मर्जी आपली! हल्लीं माझे ग्रहच फिरले आहेत. तोंपर्यंत निमुटपणें सर्व सहन केलें पाहिजे.—महाराज!

## श्लोक.

रुदन ये न मला अणिका परी,
सदय व्हा तरिही हृदयांतरीं!
असुखवन्हि मनीं बहु पेटला,
ह्मणुनि लोचननिर्झर आटला!

मी कांहीं ह्मणत नाहीं, आपणाला कसेंही

वाटो, देवाला डोळे आहेत! असो; प्रभूची मर्जी! आज्ञाबाहेर मी नाहीं!

**चंद्र०**—आपल्या कारागृहांत इला घेऊन जा, आणि रक्षकाला मीं बोलाविलें आहे ह्मणून सांग. (रक्षकास उद्देशून) कोण आहेरे बाहेर! (सरदार येतो.)

**सरदार**—जी महाराज!

**इंदु०**—महाराजांनीं मजजवळ दासींना तेवढ राहूं द्यावें. कारण या वेळीं दासींची मला गरज आहे, हें दिसतेंच आहे.—कांग तुह्मीं का उगीच रडतां? वेड्या नाहीं तर! रडायला नको कांहीं. कारागृहीं टाकिलें ह्मणून अपराध का केलासें होतें? अपराध घडला असता, तर गोष्ट निराळी होती.—अग! फिरून आपलेंच! उगी! आजचा हा प्रसंग कपाळ ईश्वरानें माझ्या बऱ्याकरितांच घडवून आणिला आहे असें समजा. महाराज! आपणाला दुःख होऊं नये, ह्मणून मी आपणाकडून किती जपत होतें, पण आतां माझा उपाय नाहीं.—दासींनो, चलाग तुह्मांला मजबरोबर येण्याला परवानगी आहे.

**चंद्र०**—हुं, चला. (इंदुमती आणि दासी जातात.)

**सर०**—महाराजांनीं कृपा करून आईसाहेबांस कारागृहीं टाकूं नये.

**संस्तावक**—महाराज! आपण काय करतां आहां याचा दूरवर विचार केला आहेना? नाहीं तर न्याय करितां अन्याय घडेल, आणि तसें झाल्यास आपणाला, राणीसाहेबांना, आणि बाळासाहेबांना तिघांनाही वाईट!

**सर०**—महाराज! माझी मनोदेवता तर मला सांगते कीं, आईसाहेब अगदीं शुद्ध आहेत. प्रभूंनीं जो दोषारोप केला आहे, तो अकारण आहे.

**संस्ता०**—सरकार! मी आपणास खचित सांगतों, आईसाहेब जर खोट्या ठरल्या, तर पृथ्वींत एकही साध्वी स्त्री सांपडे नाहीं. आणि मग पुरुषांनीं स्त्रिया अगदीं दृष्टीआड करतां कामा नये! सर्वांस कुलुपांत घालून ठेविलें पाहिजे.

**चंद्र०**—खबरदार अधिक बोलाल तर! तुह्मांला या कामांत कोणी बोलायला सांगितलें नाहीं!

**संस्ता०**—तर मग या पृथ्वीच्या पाठीवर औषधालासुद्धां साध्वी मिळणार नाहीं!—जगाचा प्रलय व्हायला मग कांहीं ... अवधि नको!

**चंद्र०**—माझ्या वचनावर तुमचा मुळींच विश्वास पटत नाहीं काय?

१ **सर०**—महाराज! आपल्या वचनावरचा विश्वास उडणें एकपरीं बरें, पण आमचा वचनावरचा उडूं नये! आपला संशय खरा न होईल, व राणीसाहेब खऱ्या ठरतील, तर आह्मांला केवढें समाधान वाटेल! मग महाराजांनीं आह्मांवर दूषण ठेविलें, तरी पुरवलें!

**चंद्र०**—तुमच्याशीं मला हुजत घालीत ... याचें काय काम? माझें मन सांगतें ... मी करणार! मला उपदेश सांगणें ... तुमचा अधिकार नव्हे! मी ऐकून ... ह्मणून, नाहीं तर—तुह्मांला ही गोष्ट ... विली, हा माझा मोठेपणा! तुह्मांला राज्र... खरी वाटत नसेल, किंवा खरी ... असून मुद्दाम ह्मणत असाल कीं ... ! नी-

आहे ह्मणून, तर तुह्मांला एकच गोष्ट सांगतों, मला कांहीं तुमचा उपदेश नको! यांत हित अहित जें कांहीं होईल, त्याचा मालक माझा मी!

[illegible]०—पण महाराज! ही गोष्ट इतकी प्रसिद्ध झाली नसती, आणि आपल्याच मनांत असती, तर बरें झालें असतें!

चंद्र०—पण असें कसें झालें असतें? मला वाटतें, **संस्तावक!** तुमचीं इतकीं वर्षे फुकट गेलीं! नाहीं तर जन्मतःच तुह्मांला ईश्वरानें अप्रबुद्ध केलें! कारण हें पहा,

**श्लोक.**

तो सत्यव्रत सोडुनी नगर हें गेला पळूनी अहो!
गेला भूप तयासवें न समजे पौरां असें कविहो?

दुसरें आणखी असें पहा कीं, सर्व लोकांनीं

[illegible] संबंध असे तिचा नृपातिशीं तो राहिला लोचनीं!
निर्मयाद निरर्गळ प्रसरला दावाग्नि जैसा वनीं!

तरी या कामांत उतावीळपणा करितां कामा नये, ह्मणून **श्रीशैलमल्लिकार्जुन** पर्वतावर आमचे कुलगुरु **आनंदनिधि** वास करितात, त्यांचा विचार घेण्याकरितांच **हारीतक** आणि **विद्यासागर** यांस पाठविलें आहे. या ब्राह्मणांचें कडकडीत व्रत सर्वांस माहीतच आहे, असत्याची शंकाही त्याविषयीं मनांत ध्यावयाला नको. कुलगुरूचा ते जो निदेश घेऊन येतील, त्याप्रमाणें पुढें करितां येईल. हें मीं चांगलें केलें ना?

[illegible]तर०—महाराजांनीं हा उत्तम पक्ष स्वीकारिला.

चंद्र०—माझ्या मनाची खातरी झाली आहे, व मला ज्या गोष्टी ठाऊक आहेत, त्याहून सबल प्रमाण मला नको आहे. पण पौरांची खातरी करण्याकरितां कुलगुरूचें

(१) प्रतिबंधरहित.

आज्ञापत्र मागविलें आहे. त्याखेरीज अप्रबुद्ध लोकांची संशयनिवृत्ति होणार नाहीं. तोंपर्यंत तिला आपणापाशीं राहूं न देणें एवढीच व्यवस्था पुरे आहे.—चला! ही गोष्ट ऐकून पौरजनांला फार वाईट वाटेल, तेव्हां त्यांचें समाधान केलें पाहिजे.

संस्ता०—(एकीकडे) आपण सांगितलेल्या गोष्टीनें त्यांचें समाधान होणार नाहीं. केवळ आपली निंदा मात्र होईल. सर्व नगर राणीच्या शुद्धाचरणाविषयीं साक्ष देईल।

(सर्व निघून जातात.)

---

## प्रवेश २. स्थल—तेंच—कारागृहाच्या जवळची एक खोली.

(यशोदाबाई आणि दोन दासी येतात.)

यशोदा०—जा ग! रक्षक आहेत का पहा, आणि असतील तर मीं बोलावलें आहे ह्मणून सांग. (दासी जाते.) देवा! काय या राणीची स्थिति! इंद्राच्या मेनकेला लाजविणारी ती कारागृहीं रहावी काय? (रक्षक आणि दासी येतात.) मी कोण आहें, हें तुला असेल ठाऊक?

रक्षक—हें काय विचारावें! महाराजांच्या धात्रीस आबालवृद्ध ओळखतो.

यशो०—मला बाईसाहेबांची गांठ घ्यायची आहे, तेव्हां त्या जेथें आहेत तेथें मला घेऊन चल!

रक्ष०—तेवढें मात्र माझ्या हातून व्हायचें नाहीं. महाराजांची मला ताकीद आहे कीं कोणालाही तिकडे जाऊं देऊं नये.

यशो०—देवारे देवा! साध्वीचा असा छळ व्हावाना! तिला कोणी भेटायला आलें तरी भेट होऊं नये! बरें, बाईसाहेबांची

नाहीं, त्यांच्या दासींची तर गांठ घ्यायला हरकत नाहींना?—एकीची तरी? उर्मीची?

**रक्ष०**—बाई! या दासींना एकीकडे जायला सांगा, ह्मणजे उर्मीला घेऊन येतों.

**यशो०**—बरें तर. घेऊन ये. दासींनो! तुह्मीं थोड्या बाहेर जा. (दासी जातात.)

**रक्ष०**—बाई! पण तुमचें जें कांहीं बोलणें व्हावयाचें, तें मजसमक्ष झालें पाहिजे.

**यशो०**—कांहीं हरकत नाहीं. तिला घेऊन ये. (रक्षक जातो.) काय खटपट ही खऱ्याला खोटें करण्याची! देवा! असा छल कोणाचाही होऊं नये.—

(रक्षक आणि उर्मी येतात.)

**यशो०**—कायग उर्मे! बाईसाहेब खुशाल आहेतना?

**उर्मी**—कसल्या खुशाल! ज्या स्थितींत रहावें लागतें तींत खुशालच आहेत! कोण त्यांवरला प्रसंग! पण बाई! मनाच्या पक्क्या खऱ्या! इतकें आभाळ फाटलें आहेना? पण वरपंगीं कांहीं दाखवीत नाहींत! मनांतल्या मनांत सर्व दुःख गिळून टाकतात! काल रात्रीं बाईसाहेब बाळंत झाल्या तुह्मांला समजलें का?

**यशो०**—मलाग कोण सांगणार? मुलगा झालाना?

**उर्मी**—नाहीं. मुलगी! कशी चांगली आहे पण! बांधाही किती चांगला! देवाच्या दयेनें तिला शंभर वर्षें आउक्ष असो! बाईसाहेब तिचे वरचेवर मुके घेतात, आणि ह्मणतात! "बाळे! तूं आणि मी सारखीच! तूं जशी निर्मळ, तशी पण मीही आहें."

**यशो०**—यांत कांहीं खोटें नाहीं. पण महाराजांना वेड लागलें आहे, त्यापुढें कोणाची बाई मात्रा चालणार आहे? पण असें उगीच राहून नाहीं चालायचें! त्यांना दोन गोष्टी समजाविल्या पाहिजेत, आणि त्याही माझ्यासारखीनेंच! आ[illegible] माझे काय फार दिवस उरले आहेत? पहातें या ह्मातारीचें कांहीं ऐकतील तर! त्यांना मी लहानाचें मोठें केलें, तेव्हां तोंडाची वाफ वांया जाईल, असेंच नाहीं होणार! पण पहावें. त्यांना निक्षून सांगतें कीं, आपणाला वेड लागलें ह्मणून!—मी कांहीं त्यांना भिणारी नाहीं, भिऊं कां पण मी? त्यांना डोई खांद्यावर नाचविलें, ती मी दुसऱ्याप्रमाणें भिणार नाहीं.—बरें, उर्मे! तूं बाईसाहेबांना जाऊन सांग मीं त्यांना फार फार पुसलें आहे ह्मणून. आणि हें बघ—त्यांना ह्मण, मुलगी माझ्या जवळ देत असाल, तर पहा. चिमुकल्या बाळाला नेईन राजेसाहेबांपाशीं, आणखी पाहीन त्यांचें मन वळवितां येईल तर! कोण जाणे त्या बाळाच्या गोड गोड लीला पाहून, त्यांचें मन द्रवलें तर! एक वेळ माझें बोलणें वांया जाईल, पण या निष्कपट आणि मुग्ध लीला त्यांच्या अंतःकरणाला पाझर फोडतीलच!

**उर्मी**—बाई! तुमचें मन मोठें उदार आहे. तुह्मीं होऊन हें काम अंगावर घेतां, तेव्हां यांत यश मिळेल हें सांगायलाच नको. हें काम करायला तुह्मांसारखी दुसरी कोण सांपडणार? तुह्मीं या जवळच्या खोलींत बसा. मी इतक्यांत बाईसाहेबांना तुमचें बेत सांगून येतें. बाईसाहेबांच्या मनांत हा विचार सकाळींच आला होता,

कोणाला सांगितलें, आणि त्यानें नाहीं ह्मटलें, तर आपलें बोलणें वांया जाणार ह्मणून बाई भ्याल्या !

सो०—आणखी बाईसाहेबांना असें सांग कीं, या देवानें मला तोंड दिलें आहे, तें बोलायला दिलें आहे. त्याप्रमाणें महाराजांना बोलेन. मला त्यांचें भय तर वाटतच नाहीं, पण या ह्मातारीला चांगलें कोठून बोलतां येणार ? पण पाहीन, आणि देवाच्या दयेनें काम करून येईन.

उर्मी—ईश्वर तुह्मांला साहाय्य देवो ! मी बाईसाहेबांना जाऊन सांगतें.—तोंपर्यंत तुह्मी या इकडल्या खोलींत बसा.

रक्ष०—राणीसाहेबांनीं जर मूल आपल्या स्वाधीन केलें, तर मीं तुह्मांला तें घेऊन जाऊं द्यावें कीं नाहीं कोण जाणे? तसें करण्यास महाराजांची आज्ञा पाहिजे.

यशो०—कसली तुला भीति वाटते ही। अरे बाबा ! एका कारागृहांतून नऊ महिन्यानीं ज्याची देवानें सुटका केली, त्याला दुसऱ्या कारागृहांत कोण बरें टाकणार ? त्या बाळानें कांहीं अपराध केला नाहीं! राजाचा राग राणीवर! त्यावर नाहीं !

रक्ष०—तुह्मीं ह्मणतां तें खरें.

यशो०—तूं कांहीं भिऊं नको. महाराज रागावलेच, तर मी आहें. तूं कांहीं काळजी करूं नको.

(सर्व जातात.)

---

**प्रवेश २. स्थळ तेंच—राजवाड्यांतील एक खोली.**

(चंद्रकांत, संस्तावक, सरदार आणि परिजन येतात.)

चंद्र०—(चिंताक्रांत) काय चमत्कार झाला हा !

**श्लोक.**

अहा ! निद्रा गेली त्यजुनि मजसी ती प्रियसखी !
दिवा रात्री येना ह्मणुनि बहु मी खिन्न असुखी!

पण मी वेडा नाहींका ? इतकें कां मनावर घ्यावें ?—पण नाहीं, असें कसें होईल ?

धरी जों प्राणांतें भुजगवर तो दुष्ट, मनुज
सुखा पावे कैसा ? हृदयसुख तें शत्रुवधजे[1] !

ह्मणून माझे शत्रु जोंपर्यंत जीवंत आहेत, तोंपर्यंत मलाही कसें सुख मिळेल !—एक शत्रु ती जारिणी ! दुसरा तो तिचा जार !—तोच माझ्या हातांतून निसटून जाऊन माझ्या कोपाच्या विषयापलीकडे आहे ! कांहीं हरकत नाहीं ! पण, ती तर दूर गेली नाहींना ! ती एकदा नाहींशी झाली असें कळलें, ह्मणजे माझी अर्धी चिंता दूर होईल !—कोण आहेरे तिकडे !

सेव०—(पुढें येऊन) जी महाराज ! मी आहें.

चंद्र०—नंदनाची प्रकृति आतां कशी आहेरे !

सेव०—काल रात्रीं त्यांना चांगली झोंप लागली होती ! आतां ताप गेलासा वाटतें.

चंद्र०—एवढा लहानना ! पण त्याला समजतें किती !! आपल्या आईला असें ह्मटलें, इतकें कळलें मात्र, तों

**श्लोक.**

चित्तीं चिंता नंदन वाही, वपु टाकी,
वाटे यानें हा जननीदोष नसे कीं;
टाकी साऱ्या बालपणींच्या तयिं लीळा,
सोडी निद्रा, खिन्न विषादें मनिं झाला !

किंवा,

**श्लोक.**

वपु विलुलित झालें, लोचना नीज येना,
असुखदहनें[2] जाळी म्लान चेतःप्रसूना[3].!

---

१. पृ. १२ टकाना २, टीप २ पहा. २. शत्रुवधापासून झालेलें. ३. दुःखरूप 'दहन' ह्म. अग्नि. ४. 'चेतः' ह्म. चित्त हेंच 'प्रसून' ह्म. फूल.

शिशुजनसुलभा[१] त्या टाकिल्या सर्व लीला!
नच निज जननीचा दोष वाटे तयाला!

आतां कोणी इकडे येऊं नका. जा आणि पुनः पहा त्याची प्रकृति कशी आहे ती. (सेवक जातो.) छे! छे! त्याविषयीं विचार करून कांहीं फायदा नाहीं. त्याचें शासन करावें, असें वाटतें. पण काय करूं? माझा कांहीं इलाज चालत नाहीं. त्याचें बल मोठें! त्याला सहायही मोठेंच! तेव्हां त्याचें नांवच सध्यां घेतां येत नाहीं! बरें असो! येईल कधीं तरी प्रसंग, तेव्हां पाहून घेतां येईल! सध्यां तर तिजवर सूड उगवून घ्यावा! **सत्यव्रत** आणि **सुधन्वा** हे माझा उपहास करून विनोद करून घेत असतील! माझें दुःख ती त्यांना थट्टा अं! दुष्टांनो! माझ्या तडाक्यांत असतां, तर तुमची खोडच जिरविली असती! बरें, ते नाहींत तर नाहींत, ही तर माझ्या ताब्यांत आहे! इचेंच अगोदर शासन करावें!

(यशोदा मुलीला घेऊन येते.)

**सेव०**—हां हां! बाई, आंत नाहीं जायचें!

**यशो०**—अरे बाबा! तुम्हीं मला मदत करावी, ती एकीकडेच! उलटें म्हणतां, आंत नाहीं जायचें! इतकेरे तुम्हीं महाराजांना काय भितां? बाईसाहेबांच्या प्राणांपुढें का महाराजांच्या रागाची मातब्बरी आहे?—गरीब बिचारी मुलगी! आणि काय तिजवर ही आग पाखडली आहे!

**संस्ता०**—यशोदाबाई! पुरे. किती बोलाल तरी?

**सेव०**—बाई! रात्रीं महाराजांना झोंप मुदलींच लागली नाहीं! म्हणून त्यांनीं सांगितलें आहे, कोणालाही आंत येऊं देऊं नको!

**यशो०**—इतकें मजवर रागावतां कां पण? कांहीं थोडे शांत व्हा! अरे बाबांनो! मी महाराजांना झोंप यावी म्हणून आलें आहें! झोंप घालविणारे हे तुम्हीं! त्यांनीं ऊं केलें, कीं लागले सुस्कारा टाकायला! चूं केलें कीं लागले इकडे तिकडे पळायला! हें बघा! मी कीं नाहीं त्यांना हिताच्या चार गोष्टी सांगायला आलें आहे. आणि त्याही खोट्या नाहींत, खऱ्या आहेत. त्या सांगून काय करणार म्हणून पुसाल तर इतकेंच. त्यांच्या डोक्यांत जें एक वेड भरलें आहे, आणि ज्याच्या योगानें त्यांचा डोळा लागत नाहीं, तें वेड काढून टाकणार!

**चंद्र०**—कसली गडबड आहेरे तिकडे?

**यशो०**—कांहीं नाहीं, महाराज! विचारीत होतें, महाराजांना काय औषध द्यावें म्हणून!

**चंद्र०**—कसलें औषध, आणि कसला विचार! या म्हातारीला बाहेर घालवून द्या कसे! संस्तावक! मीं तुम्हांला सांगितलें होतेंना, कीं कोणाला आंत येऊं देऊं नका म्हणून?

**संस्ता०**—महाराज! मी त्यांना अगोदरच सांगितलें कीं आंत येऊं नका, नाहीं तर महाराजांची मर्जी जाईल!

**चंद्र०**—तर मग ही कशी आली?

**यशो०**—मीं येईनच म्हटलें, तर माझा हा धरण्याची कोणाची छाती आहे? त्यांच्याकडे कांहीं दोष नाहीं. दोष असेल तर मजकडे असेल! महाराज! मी कशाकरितां आलें हें समजलें का? मी म्हणतें याक[illegible] नीट लक्ष द्या. मी आपणाला लहान[illegible] मोठें केलें, आणि आपल्या बाळ[illegible]! नी-

---

१. लहान मुलांस स्वाभाविक.

माझा सारा जन्म गेला. तेव्हां मी कांहीं आपणाला वाईट सांगेन, हें मनांत आणूं नका. ही **यशोदा** दुसऱ्यांप्रमाणें तोंड देखल्या बोलणारी नव्हेहो. खऱ्या गोष्टी सांगेल. मग त्या रुचोत किंवा न रुचोत. ऐकतांना? मी कोणाचा निरोप घेऊन आलें, समजलें का? बाईसाहेबांकडून!—अहारे ती माउली! माउली पण माउली!

**चंद्र०**—माउली! कोण माउली!

**यशो०**—आमच्या स्वामिणी, महाराजांची पत्नी **इंदुमती** बाईसाहेब! खोटी का माउली आहे ती! खरीच माउली! कोणीं ह्मटलें ती माउली नाहीं ह्मणून, तर मी लागलींच त्याचें शासन करीन. इतकेंच, मला दाढी मिशी नाहीं!

**चंद्र०**—इला द्या कसे बाहेर लावून!

**यशो०**—पाहतें बरें कोणाची प्राज्ञा आहे स्त्रीच्या अंगाशीं झोंबायला! मला कोणी बाहेर नको घालवून द्यायला. माझी मीच होऊन जाईन. पण ज्या कामाकरितां मी आलें तें करीन आणि मग जाईन. महाराज! त्या माउली बाळंत झाल्या आणि त्यांना हें कन्यारत्न झालें. पाहिलेंतका, हें त्यांनीं आपणाला समर्पण केलें आहे. (मुलीला चंद्रकांतापाशीं ठेवते.)

**चंद्र०**—जातेस कीं नाहीं येथून निघून! तूं राक्षसी आहेस!—द्या इला बाहेर घालवून निघ येथून! ए लुच्चे कुट्टिनी!

**यशो०**—महाराज! आपण काय बोलतां हें? कुंटणीचें काम कोणीं केलें? मी कुंटीण नव्हे. आपणाला मात्र खचित वेड लागलें. वेडे झालां, तेव्हां जें बोलाल तें शोभतेंच आहे.

**चंद्र०**—काय! सर्वच हरामखोर झालां काय? इला नाहींका कोणाच्यानें बाहेर हांकून देववत? हें जारिणीचें कारटें आहे. हें द्या कसें तिजजवळ. **संस्तावक!** तुह्मीं इतके अवलेला काय भितां? द्या द्या तें तिजजवळ!

**यशो०**—हें कन्यारत्न तसें नव्हे. महाराजांनीं जो अमंगळ शब्द त्यास लाविला, त्याप्रमाणें तें आहे असें ह्मणून त्याला हात लावण्याची कोणाची पुण्याई आहे ती पाहतें! हात जळून नाहीं जाणार?

**चंद्र०**—कायरे तुह्मीं असें स्त्रीला भितां?

**यशो०**—स्त्रीचें भय आपणाला असतें, तर आमची माउली कारागृहांत कां असती! आणि आपण तरी आपल्या पोटच्या पोरांना, आपलीं नव्हेत असें कसें ह्मटलें असतें?

**चंद्र०**—सारे गुलाम खोटे!

**संस्ता०**—महाराजांच्या पायांशपथ मी नाहीं खोटा!

**यशो०**—हे नाहींत खोटे, मीही नाहीं खोटी. येथें एक प्राणी मात्र खोटा आहे! तो कोणता, तर महाराज स्वतःच! खोटे कां नाहीं ह्मणूं त्यांना, कीं जे आपण स्वतःच्या आणि राणीसाहेबांच्या कुळांना व्यर्थ डाग लावितात? काय? **नंदन**, हें कन्यारत्न, हीं आपलीं नाहींत असें ह्मणतांना जीभ गळून कशी नाहीं पडत! हरहर! ही जिव्हेची धार तरवारीच्याही धारेहून तीक्ष्ण आहे! काय ह्मणावें तरी काय यांना, कीं जें वेड यांच्या माथ्यांत शिरलें,

वाचें.

तें कांहीं केल्यानें निघत नाहीं ! काय हा दुराग्रह !

**चंद्र०**—कसें तोंड चाललें आहे पहा या थेरडीचें. सर्व सोडून दिलें, आणि येथें मला आली त्रास द्यायला !—हें कारटें माझें नाहीं, त्या सुधन्व्याचें आहे. चल, जा येथून याला घेऊन, आणि त्याला आणि त्याच्या आईला दोघांनाही डोहांत नेऊन बुडव कशी !

**यशो०**—महाराज ! हें कन्यारत्न आपलें आहे ! आणि ह्मणतात तसेंना बापाप्रमाणेंच आहे. पाहिलेंतनाहो सरदार ! हें लहान आहे पण बापाची थेट प्रतिमा ! नाक, डोळे, तोंड, कपाळ, ही हनवटी, हे गाल, हे हात, हीं बोटें, नखें, सर्व महाराजांच्या सारखींच. हें पहा हंसणेंही त्यांच्या सारखेंच! देवा ! बाहेरून ही कन्या जशी महाराजांसारखी आहे, तशी आंतून मात्र नसावी अं! नाहीं तर इलाही आमच्या महाराजांप्रमाणें आपल्या पतीविषयीं संशय येईल!

**चंद्र०**—काय किटकीट लाविली आहे या थेरडीनें ! इचें तोंड नाहीं का कोणी बंद करीत ?

**संस्ता०**—महाराजांच्या सांगण्यानें जी ऐकत नाहीं, ती आमचें ऐकेल काय ?

**चंद्र०**—पुनः एकदा सांगतों द्या कशी इला घालवून !

**यशो०**—महाराजांच्या तेवढेंच आहे हातीं ! स्त्रीला घालवून देण्यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं.

**चंद्र०**—आतां जा, नाहीं तर तुला सुळावर द्यायला सांगेन.

**यशो०**—हं सांगा. मी थोडीच भित आहे ! सुळावर स्त्रीला चढविलें, तर आपणालाच हे काय ह्मणतील, याचा विचार करा ! मीं आपणाला नांवें ठेऊं नये. पण आपणच पहा, आमच्या बाईसाहेबांचा कसा छळ करीत आहां तो! त्यांच्या खोटेपणाविषयीं आपणाला काय बरें साक्ष मिळाली आहे ? आपली निराधार कल्पना इतकीच ना ? हें असें करतां, तेव्हां लोक काय ह्मणतील याचा विचार करा. हा नाहींका छळ ? हें असें करणें आपणाला शोभतें तरी? पहा हो! सर्व जन याकरितां आपला मनातल्या मनांत तरी धिक्कार करितील, हें पक्कें लक्षांत ठेवा !

**चंद्र०**—मी सांगतोंना मघांपासून कीं इला बाहेर घालवून द्या ह्मणून? काय पीडा माझ्या पाठीमागें लागली पहा ! ही ह्मणते मी छळ करित आहें. तिला ठाउक आहे कीं, मी कांहीं बोललें तरी माझ्या केसाला धक्का लागणार नाहीं, ह्मणून हें असें तोंड सुटलें आहे.—बाई ! कृपा कर आणि मला आतां सोड कशी !

**यशो०**—मी जातें. माझ्या अंगाला हात नाहीं लावतां कामाचा कोणीं, समजलें ? मी नको असेन तर जातें. महाराज ! या लेंकराकडे कांहीं बघा. हें आपलें आहे ! देवानें प्राणी जन्माला घातला आहे, तेव्हां त्याची तोच काळजी घेईल. आह्मी कोण घेणार ? इतके तुह्मी येथें अहांना, पण एकाच्याही हातांतून महाराजांचें बरें करवणार नाहीं. तुह्मां सर्वांमध्यें तोंडपुजेपणा भरला आहे! ठीक आहे. माझी मन ! नी-

रात्र-

राजांना कटकट झाली, तेव्हां मी जातें!
(जाते.)

**चंद्र०**—गेली एकदाची कटकट! संस्तावक! इला तुह्मीं सांगितलें इकडे यायला! तुमचं मोठें कोवळें अंतःकरण, नाहीं? घेऊन चला कसे या पोराला आणि मारून टाका! तुह्मींच याला ठार मारिलें पाहिजे! दुसऱ्यानें कोणीं नाहीं करतां कामाचें! उचला कसें, आणि घटकेच्या आंत मला सांगायला या कीं काम केलें ह्मणून, आणि कांहीं खूणहि बरोबर घेऊन या! नाहीं तर तुमचा प्राण राहील, असें समजूं नका. तुमच्या मनांत हें काम नसेल करायचें, आणि माझा राग पुरवत असेल, तर बोला तसें! ह्मणजे मीच या कारटीचें त्या फरशीवर डोकें ठेंचतो! चला घेऊन चला! तुह्मींच त्या यशोदाबाईला सांगितलें, महाराजांकडे जा ह्मणून!

**संस्ता०**—महाराज! मीं नाहीं सांगितलें! हेच साक्ष देतील. विचारावें पाहिजे तर महाराजांना!

**१ सर०**—महाराज! ह्या आल्या, त्यांत यांचा कांहीं दोष नाहीं.

**चंद्र०**—तुह्मी सारे खोटे आहां!

**सर०**—महाराजांनीं आमचें कांहीं तरी खरें मानावें. महाराजांची सेवा आह्मीं इमानानें करीत आहों. त्या सेवेकडे कांहीं तरी दृष्टि असावी. महाराजांच्या पायां पडतों, आमच्या सेवेकडे महाराजांनीं कांहीं लक्ष द्यावें, आणि हा बेत रहित करावा! महाराज! या अघोर कृत्यापासून कांहीं तरी अनर्थ ओढवेल. महाराजांनीं एवढी विनंती मान्य करावीच!

**चंद्र०**—अहा! माझी स्थिति कांहींच चमत्कारिक झाली आहे.

**श्लोक.**

वाटे मला न सहसा शिशुसी वधावें,
वाटे पुन्हां मजसि तें न जगीं रहावें;
ऐसें द्विधा मन करी न विनिश्चयातें,
ज्यांनीं विभिन्न घन जेंवि विरुद्धवातें.

काय हो संस्तावक! तुह्मांला या अर्भकाची मोठी दया येते, नाहीं? तर याला वांचवावें ह्मणून काय कराल?

**संस्ता०**—महाराज जें सांगतील, आणि जें माझ्या हातून होण्यासारखें असेल तें करीन! फार तर काय? महाराजांनीं ह्मटलें तर मी आपला जीव देईन, आणि या बालास वाचवीन.

**चंद्र०**—मी सांगेन तें तुमच्या हातून होण्यासारखें आहे! वहा माझ्या पायांची शपथ, की हें काम करीन.

**संस्ता०**—महाराजांच्या पायांशपथ हें काम करीन.

**चंद्र०**—पहा बरें. लक्षांत ठेवा. हें आतां केलेंच पाहिजे. नाहीं तर तुमचा प्राण जाईल. इतकेंच नाहीं, तर तुमचें घरदार चीजवस्त, सर्व कांहीं नाहींसें होईल. तुह्मीं असें करा.

**श्लोक.**

न्यावें बाळक हें त्वरित सहसा, देशांतरीं टाकिजे,
आलें येथ जसें अतर्कित, तसें तेथें तुह्मीं सोडिजे;
ज्यानें जन्म दिलें करील विधि तो त्याचें न का रक्षण?
आज्ञाभंग जरी घडेल समजा वांचाल नेकक्षण!

**संस्ता०**—महाराजांची आज्ञा शिरसा वंद्य आहे. पण यापेक्षां मृत्यूची शिक्षा सदयझाली असती. गरीब बिचारें बाल! निर्जनीं वनीं याचें कोण रक्षण करील? पण शकुंतानीं जसें मेनकात्मजेचें संरक्षण केलें, तसें याचेंही कोणी करील! कारण,

### श्लोक.

रक्षी अनाथा जगदेकनाथ,
होईल कैसा वनिं तत्प्रमाथ?
सद्बुद्धि देवो प्रभु हिंसकांना,
रक्षोन यावें मृग कीर मैना!

मीं पूर्व जन्मीं कोणतें पातक केलें होतें, कीं हा प्रसंग मजवर आला आहे! असो; ईश्वराची मर्जी! (त्या बाळाला घेऊन निघून जातो.)

चंद्र०—दुसऱ्याचें पोर आपलें ह्मणून मी कां वाढवूं?

१ सेवक—महाराज! हारीतक आणि विद्यासागर याजकडून दूत आला आहे. त्यानें सांगितलें कीं ते श्रीशैलाहून परतले. एक दोन दिवसांत येथें येऊन दाखल होतील.

१ सर०—महाराज! इतके लवकर येतील असें नव्हतें वाटलें!

चंद्र०—त्यांना आज जाऊन तेवीस दिवस झाले. तेव्हां लवकर आले, यांत संशय नाहीं. गुरुवर्य आनंदनिधींचा निदेश केव्हां येईल असें मला झालें आहे. गुरुवर्य सर्व संशयाची निवृत्ति करितील, आणि तत्व काय आहे तें सांगतील. सरदारहो! अधिकरणिकांस सांगा, कीं सत्रींच्या[1] अपराधाची चौकशी कर्तव्य आहे, तेव्हां न्यायसभेंत यावें. आमचा आरोप सर्वांस कळला आहे, तेव्हां न्यायही सर्वांसमक्ष होणें विहित आहे. ती जोंपर्यंत जिवंत आहे, तोंपर्यंत माझ्या जिवाला सुख नाहीं. मीं सांगितलें एवढें करा. जा कसे. आणि आंत कोणालाही येऊं देऊं नका. (सर्व जातात.)

१. त्याचा छद्म.

## अंक ३.

### प्रवेश १. स्थळ—सिंहलद्वीपांतील एका नगरींतील रथ्या.

(विद्यासागर आणि हारीतक येतात.)

विद्या०—खरेंच बोवा! आपण असलें रम्य-स्थळ यापूर्वीं कधींहि पाहिलें नव्हतें! काय त्याची शोभा वर्णावी!

### श्लोक.

गिरिवरशिखरें तीं भेदिती मेघमाला!
अतरुण तरुराजी शोभवी काननाला!
वितत[1] रव विसर्पें कंदरीं निर्झरांचा!
पवन सुरभि वाहे सांद्र तो केतकीचा!

हारी०—माझे तर

### श्लोक.

तृणांहीं काष्ठांहीं विरचित अशी पर्णकुटिका
मुनीची देखूनि नयन रमले!—पुण्य घटिका!
अहा! झाली दिव्या तप विचरुनी कांति मुनिची!
तयाच्या उत्कर्षें सतत धृति[2] होत अवनिची!

विद्या०—त्या आनंदनिधींची मूर्ति पाहून माझें मन तर निश्चळ झालें! त्यांच्या पहा

### श्लोक.

माथां शोभे भार पिंगा जटांचा
भस्में सारा चर्चिला देह सांचा;
हस्तीं लोला पुण्य रुद्राक्षमाळा;
कस्तूरीचा तो टिळा भव्य भाळा.

हारी०—गुरूंना महाराजांनीं सांगितलेलें वृत्त कळविलें, आणि त्यांनीं हें आज्ञापत्र दिलें आहे, आणि सांगितलें कीं, हें राजसभेंतच महाराजांस द्यावें. यांतील मजकूर काय असेल कोण जाणे! तो आमच्या आईसाहेबांना अनुकूल असा ठरावा एव-

१. पसरलेला. २. दाट. ३. रक्षण.

ढेंच माझें परमेश्वरापाशीं मागणें आहे! त्याप्रमाणें घडून आईसाहेबांवरील आरोप नाहींसा होईल, तर आमच्या या दीर्घ प्रवासाबद्दल आह्मांला एवढा सुद्धां खेद वाटणार नाहीं!

**विद्या०**—असो; काय गुरुजी करितील तें पहावें! पण खरेंच, महाराजांचें हें करणें मला नाहीं आवडत! व्यर्थ त्या माउलीचा छळ होत आहे!

**द्वारी०**—सोक्ष मोक्ष याचा आतां लवकरच होईल. गुरुजींनीं हें आज्ञापत्र मुद्रित करून दिलें आहे. त्यांचा निदेश असेल त्याप्रमाणें सर्व पुढें घडेल. **आनंदनिधि** त्रिकालज्ञ आहेत, तेव्हां सत्य काय असेल तेंच बाहेर पडेल! ईश्वर करो आणि याचें पर्यवसान राज्ञीस शुभावह होवो! चला आपणाला लवकर गेलें पाहिजे.

(जातात.)

---

**प्रवेश २. स्थळ—सिंहलद्वीप—न्यायसभा.**

(चंद्रकांत, सरदार, अधिकरणिक, परिवार आपआपल्या स्थानीं बसले आहेत.)

**चंद्र०**—अहो न्यायमूर्ति! हा व्यवहार चालवितांना आह्मांला फार वाईट वाटत आहे! कारण, यांत अपराधिनी आमची पत्नी आहे!—ही राजभार्या आणि राजकन्या आहे,—इजवर आमचें प्रेम आजवर फार असे,—इतकेंही असून ज्या अर्थीं आह्मी हा व्यवहार चालविणार, त्या अर्थीं तसेंच कारण असलें पाहिजे हें आपणालाच दिसून येईल! खरोखर ही निरुपायाची गोष्ट आहे.—राजानें उगीच छळ केला आहे, असा पौरांनीं मजवर दोषारोप करूं नये, ह्मणून या कार्यास मी प्रवृत्त झालों आहें! आपण न्यायमूर्ति आहां, तेव्हां यथान्याय आपण वर्तालच! या व्यवहारांत जें निष्पन्न होईल,—मग त्यांत राज्ञी सदोष ठरो कीं निर्दोष ठरो—तें आह्मांला मान्य आहे! आतां राज्ञीला घेऊन या!

**अधि०**—जारे वेत्रधरा! राज्ञीला न्यायसभेंत बोलाविलें आहे ह्मणून सांग, आणि त्यांना घेऊन ये.—पौरजनहो! शांत चित्तें असा!

(वेत्रधर जाऊन परत येतो. इंदुमती, रक्षक, यशोदा आणि दासी हीं येतात.)

**चंद्र०**—अहो! अधिकरणिक! व्यवहारपत्र वाचावयास सांगा!

**अधि०**—अहो कायस्थ! व्यवहारपत्र वाचा पाहूं.

**कायस्थ०**—(वाचतो.) "कार्यार्थी[१] **सिंहलद्वीपाधिपति चंद्रकांत** महाराज, यांचा वाद त्यांची पत्नी इंदुमती राज्ञी यांच्याशीं. व्यवहार हा कीं, इंदुमती राज्ञीनें **मद्रदेशा**धिप **सुधन्वा** राजा याशीं व्यभिचार केला; महाराजांचा ह्मणजे आपल्या पतीचा प्राण हरण करावा एतदर्थ **सत्यव्रतास** साहाय्य केलें; आणि हा हेतु कांहीं कारणांनीं बाहेर आला, तेव्हां त्यांनीं ह्मणजे **इंदुमती** राज्ञींनीं त्याचें जीवित रक्षावें या हेतूनें रातोरात त्यास पळून जावें असें सांगून त्याला साहाय्यही केलें; असे तीन आरोप यांजवर आहेत!"

**इंदु०**—

**पद.**

कां करितां छळहो माझा,
मीं केलें काय अगाई? ध्रु०
वांकडें न पडलें माझें

---

१, फिर्यादीचा सारांश.

तें पाऊल कधिंही बाई !
परि बोलों व्यर्थ कशाला,
विश्वास न माझे ठाई.
बोलेन जरी मी कांहीं, ह्मणतिल हें सत्यचि नाहीं.
मी लीन प्रभूच्या पाई ! १
आहे जरि ईश्वर साक्षी,
जरि आज न लोपे धर्म,
तरि भग्न मनोरथ होती
दुष्टांचे; स्फुरे वर्म.
सत्त्याचा लोप न होतो, जागें जागृत ईश असे तो,
तो आज न रक्षिल काई ? २
मीं खोटें कर्म कदापि
यापूर्वी केलें नाहीं.
हें असह्य मजला दुःख,
तनु सारी माझी दाही !
मी सिंहलपतिची भाजा, मी कलिंगभूपतनूजा,
बाल नंदनाची आई! ३
नृपसभेंत ओढुनि नेलें
राजानें धरुनी मातें,
हा लहान का अपमान
सांगाहो कुलवनितेतें?
या प्राणांस न मी मानीं, परि शीलधनातें हानि-
ह्याकरितां जळतें बाई! ४
राजाचें मजवर कैसें
तें निश्चल भारी प्रेम !
मद्राधिप आला तेव्हां
नच उरलें ह्याचें नाम !
जरि यांत असे मम दोष, मज जाळो देव सरोष.
दृढ भक्ती त्याचे ठाई! ५

चंद्र०—आधीं पाप करायाचें धाडस ज्याच्या हातून होतें, त्याच्या हातून तें केलें नाहीं असें खोटें सांगण्याचें धाडस होणार नाहीं, असें नाहीं. तेव्हां नुसतें नाहीं ह्मटल्यानें लोकांना खरें थोडेंच वाटणार आहे ?

इंदु०—माझें ह्मणणें खरें न वाटेल तर न वाटो! दुसऱ्यांचा दाखला मला कांहीं देऊं नये! मीं खरें सांगितलें!

चंद्र०—हें कांहीं खरें नाहीं!

इंदु०—खरें आहे तेंच मीं सांगितलें! बळेंच कोणी अंगीं दोष लावूं लागेल, तर मी कशी लावून घेईन? सुधन्वा राजाच्या संबंधानें मजवर बालंट घेतलें आहे, याला काय बरें आधार आहे? त्यांचें आदरातिथ्य केलें खरें; पण यांत कांहीं दोष आहे काय? आपल्या घरीं कोणी पाहुणा आला तर त्याची व्यवस्था ठेऊं नये का? ही व्यवस्था ठेविली तीही आपल्याच आज्ञेवरून ना? आपणच ना मला सांगितलें होतें कीं, त्यांचें कांहीं कमी पडूं देऊं नको? तसें जर मीं केलें नसतें, तर तिकडूनही मला दोष लाविला असता कीं, मीं सांगितलेलें ऐकलें नाहीं ह्मणून! आणि सुधन्वा राजा तरी काय ह्मणता? त्याचें आपलें बाळपणापासून प्रेम, आणि तो जर पुष्कळ दिवसांनीं आपल्या भेटीस आला, तर त्याचा समाचार घेतला, हा माझा दोष काय? आपणच विचार करून सांगा, आपण जो मजवर आरोप ठेवितां —शिव शिव, त्या पापाची कल्पना तरी माझ्या मनांत येईल काय? असें आपणाला वाटलें तरी कसें ?—कायहो करूं ? मला बोलवत नाहीं !—स्त्री—कुलांगना—आपल्या पतीविषयीं—कीं जो तिचें भूषण,—तिच्या सुखाचा एक हेतु—तिच्या कल्याणाचें धाम—अशाविषयीं असलें निंद्य कर्म मनांत तरी आणील काय?—मज कुलांगनेला असल्या दुर्वाच्य कृत्यांत आणि तो सत्यव्रत साहाय्य करील काय? हरहर ! नं

कोणीं तरी दुष्टानें त्याविरुद्ध कांहीं सांगून आपले कान भरले! खरेंच, सत्यव्रतासारखे खरे दुसरे कोणी सांपडणार नाहींत! आतां ते कोठें दिसत नाहींत हें खरें, तथापि ते कोठें, कसे व काय ह्मणून गेले हें मला तरी काय ठाऊक?

चंद्र०—काय ह्मणतोस, हें तुला ठाऊक नाहीं अं? तूं त्याला पळवून नाहींसना दिलें? तूं काय दुष्ट बेत केला होतास, हेंही नसेलच तुला ठाऊक? लोक खरें ह्मणतात तें!

श्लोक.

अमोघी संशयाचा, अविनयनगरी, स्थान हें साहसांचें,
दोषांचा संव जाणें, कपटशतमय क्षेत्र अप्रत्ययांचें;
ज्याचा कोणा कळेना असुरसुरनरां अंत, मायाकरंड,—
कोणीं हे निर्मिली स्त्री अमृतविषमयी, जी करी धर्मखंड?

इंदु०—महाराज! आपण कांहीं ह्मणा. मीं खरें सांगितलें! आपणाला मी नकोशी झालें आहें,—दूर करून टाकावी कशी! भलभलतें मनांत आणून उगीच दुसऱ्याला कांहीं गांजूं नये!

चंद्र०—भलभलतें तें काय? माझ्या मनांत येतें तें खरें होतें. मला वाटलें तूं कुकर्म केलेंस, त्याचें फळ तें कारटें झालें! अगोदरपासूनच लज्जा सोडली, तेव्हां खोट्याला थोडीच भिणारी आहेस? आतां आपल्या हातून झालेली गोष्ट नाहींस कबूल केली, तर नको करूं!—कर अथवा नको करूं, त्यांत कांहीं अर्थ नाहीं, त्या पोराला अरण्यांत टाकून दिलें!—त्याला तेथें माता ना पिता—याचा ही दोष पण तुजकडेसच!—त्याचें जसें शासन केलें, तसें तुझें ही करतों! ही उग्र न्यायदेवता आहे, इच्या हातून क्षमा व्हायची नाहीं! यमधर्माचें आतां स्मरण कर!

इंदु०—महाराज! इतकी मला पण भीति नको दाखवायला! मृत्यु ह्मणजे कांहीं मला बाऊ वाटत नाहीं! आतां मला वांचून तरी काय करायचें आहे? माझें या जगीं काय उरलें आहे?—माझ्या जीविताचें समाधान आणि भूषण जें आपलें प्रेम, त्याचें तर आतां नांवच नको घ्यायला! तें उडालें—नाहींसें झालें, यांत कांहीं संशय नाहीं! कां नाहींसें झालें, याचें मात्र कारण मला ठाऊक नाहीं!—बरें तें असो; माझें दुसरें समाधान माझ्या पोटचा गोळा—नंदनबाळ—त्याची आणि माझी ताडातोड केली! माझ्या वाऱ्याला त्याला फिरकूं देत नाहीं! तिसरें माझें समाधान—कीं ज्याच्या तोंडाकडे तरी पाहून मीं हे दिवस कसे तरी काढले असते,—तें माझें लहान बाळ—त्यानें तर नव्हताना कोणाचा कांहीं अपराध केला?—तें मुग्ध मुखानें माझें स्तन्य पीत होतें, त्यावेळीं कीं हो मजपासून त्याला तोडून नेलें!—आणि हायरे देवा! अरण्यांत टाकून दिलें!!! कशीरे देवा! तुला करुणा येत नाहीं? मी जारिणी ह्मणून प्रत्येक नगरांतून माझा डंका वाजविला! प्रसूत होऊन बारा दिवस झाले न झाले, तों उघड्या हवेंत मला ओढून आणिलें! रंकाचीही स्त्री असली, तरी दोन महिने खोलीबाहेर पडत नाहीं! आणि मज राजपत्नीला कांहीं अंगांत शक्ति आली नाहीं तरी या सभेंत सर्वांसमक्ष ओढून आणावें ना? महाराज! आपणच पहा कीं, वांचून मला कोणतें

सुख आहे कीं, त्याकरितां मी मृत्यूला भ्यावें? तेव्हां आपण जें मनांत योजिलें आहे, तें मला प्रियच आहे! पण माझें एवढें ऐका—जीवाची आशा धरून आपली प्रार्थना करितें असें नाहीं—कारण जीव हा मला तृणप्राय झाला आहे—पण मला अब्रूची चाड आहे! होतां होईल तों आपल्या नांवाला वृथा कलंक लावून घेणार नाहीं! नुसत्या आपल्या कल्पनांनीं हा मजवरचा आरोप सिद्ध होणार नाहीं, तो सिद्ध होण्याला नुसत्या कल्पनेपेक्षां बलवत्तर प्रमाणें पाहिजेत! तीं नसतां, जर ह्मणाल कीं, आरोप खरा आहे, तर मग न्याय नव्हे! अन्याय आहे!—अहो न्यायमूर्ति! माझा वाद **आनंदनिधी गुरु** करितील! त्यांचें जसें उत्तर येईल, त्याप्रमाणें मला सदोष किंवा निर्दोष ठरवा!

**सर०**—आईसाहेबांचें ह्मणणें अगदीं वावगें नाहीं. **हारीतक** आणि **विद्यासागर** आले असतील, त्यांना अधिकरणिकांनीं बोलवावें.

**अधि०**—वेत्रधारा! **हारीतक** आणि **विद्यासागर** यांना जाऊन सांग कीं, तुह्मांला न्यायसभेंत बोलाविलें आहे.

(वेत्रधर जातो.)

**इंदु०**—माझा पिता **कलिंग** देशाचा भूप, तो आज जिवंत असता, आणि आपल्या कन्येची अशी स्थिति पाहता, तर त्याला काय दुःख झालें असतें! पण तो आज नाहीं हें चांगलें आहे, नाहीं तर त्याच्या प्रज्वलित क्रोधाग्नीनें काय काय दग्ध झालें नसतें!

(हारीतक आणि विद्यासागर यांस घेऊन वेत्रधर येतो.)

**अधि०**—**हारीतक! विद्यासागर!** आपण न्यायसभेंत आलां आहां. सत्याधिदेवता स्मरून सर्व वृत्तांत सांगावें.

**हारी०**—अहो न्यायमूर्ति! सत्य निवेदन करितों. महाराजांची आज्ञा घेऊन आह्मीं **श्रीशैल** पर्वतावर गेलों. तेथें **आनंदनिधि** गुरूंचें दर्शन घेतलें. महाराजांनीं सांगितलेला मजकूर त्यांना कळविला. त्यांनीं तो ऐकून घेऊन कांहीं वेळ ध्यान केलें. नंतर आंतून जाऊन येऊन आह्मांस हें मुद्रित पत्र दिलें, आणि सांगितलें कीं "हें फोडूं नका, किंवा दुसऱ्या कोणाला दाखवूं नका. न्यायसभेंत राजाला नेऊन द्या." त्याप्रमाणें हें पत्र आणिलें आहे. महाराजांनीं घ्यावें.

**अधि०**—काय हो **विद्यासागर!** हा मजकूर खरा आहे?

**विद्या०**—खरा आहे महाराज!

**चंद्र०**—पत्र फोडावें आणि वाचावें.

**अधि०**—(वाचतो.) "स्वस्ति. **हारीतक** आणि **विद्यासागर** यांनीं कथित केलेला वृत्तां[illegible] श्रुत झाला. आमच्या ज्ञानचक्षूस जें वृत्त दिसतें, तें सांगतों.

### श्लोक.

साध्वी इंदुमती अगर्ह्यचरिता; निर्दोष मद्राधिप;
तो सत्यव्रत राजसेवक खरा; तूं वा नृपा निष्कप[illegible]
कन्या जी आचिर प्रसूत अनघा आहे तुझी सत्य[illegible]
लाभे ती जरि शोधिशी, तिजविणें नाहीं तुला र[illegible]

**सर०**—गुरु यथार्थद्रष्टे. खरे! पण शेव[illegible] या वाक्याचा अर्थ काय?

**इंदु०**—राखिली हो त्यांनीं माझी लाज! ([illegible] लवलासें दाखवून) हा बाई दुसरा [illegible]राज-अनर्थ सुचवितो!

**चंद्र०**—कायहो अधिकरणिक! पत्रांत [illegible]! नी-

होता, तोच तुह्मीं वाचला कीं पदरचा कांहीं जोडला?

अधि०—महाराज! येथें जेव्हढें आहे तेवढें वाचलें.

चंद्र०—"तिजविणें नाहीं तुला संतति"—ह्मणजे? हें सर्व खोटें आहे. गुरुजींनीं अनृत लिहिलें. तें कांहीं नाहीं. व्यवहार चालवा.

(पटाक्षेप करून सेवक येतो.)

सेवक—(भयानें) महाराज हो महाराज!

चंद्र०—बोल, झालें तरी काय?

सेवक—कसें बोलूं? महाराजांच्या कानांवर कसें घालूं? अहो महाराज! आई साहेबांना इकडे आणिलें हें कळलें मात्र, आणि "आई! आतां तुझी गत कशी होईल" असें ह्मणून धाकटया महाराजांनीं वाट धरिली!

चंद्र०—वाट धरिली ह्मणजे?

सेवक—ह्मणजे प्राण सोडिला!

चंद्र०—ईश्वर मजवर क्षोभला! मीं त्या सत्पुरुषाला खोटें ह्मटलें! मी खरा अपराधी!

इंदु०—हाय! हाय! (मूर्च्छा पावते.)

चंद्र०—अरे! हा काय दुसरा अनर्थ! आली प्रतीति—"तिजविणें नाहीं मला संतति!"

यशोदा—ही बातमी ऐकल्याबरोबर बाईसाहेबांना घेरी आली!—देवारे देवा! या जाईंदु... त वाटतें आह्मांला सोडून! पहाहो! वाहो!

चंद्र०—तिला आंत न्या. दुःख असह्य ...ामुळें तिला नुस्ती घेरी आली आहे ...ते! आतां होईल बरी.! अरेरे! मीं ...पल्या तर्कावर फार विश्वास ठेविला! ...! एकादी चांगली मात्रा द्या!

(यशोदा आणि दासी इंदुमतीला घेऊन जातात. अधिकराणिक वगैरे सर्व जातात. राजा आणि १ सरदार मात्र राहतात.)

चंद्र०—(आपणाशीं) देवा मी अन्यायी! खरा खरा अन्यायी! क्षमा कर! मी त्या सत्पुरुषाला खोटें ह्मटलें!—सुधन्वा राजाची मी क्षमा मागेन, आणि त्याशीं पुनः स्नेहभावानें वागेन!

### श्लोक.

मद्राच्या नृपतीशीं मी करीन मैत्री;
राणीची मनधरणी करीन रात्रीं;
गेला जो प्रियकर मित्र—आणवीन;
सुज्ञाचे गुण विसरेन मी कधीं न!

काय माझा हा मोह! या मोहांधकारानें माझें मन इतकें लिप्त झालें कीं मला कांहीं दिसेना! वाटलें प्रिय सुहृत् सुधन्वा राजा याचें प्राणापहरण करावें! हें निंद्य कर्म मीं सत्यव्रतास करायला सांगितलें! अनुग्रह, निग्रह इत्यादिकेंकरून त्याचें मन वळविण्याचा यत्न केला! विष देशील तर महत् पदास पावशील, असें सांगितलें! न देशील तर प्राणास मुकशील, अशी ही धमकी दिली! पण साधु तो साधु! त्यानें कांहीं माझें ऐकलें नाहीं! तर केलें काय?—

### श्लोक.

सदय हृदय ज्याचें, जो कुलीनावतंस
नृपतिस कळवी तो हेतु माझा नृशंस!
त्यजुनि गृहधनातें, मान, वित्तें, तयानें
असुख बहु वरीलें सुप्रसन्नें मनानें!

धन्य त्या सत्यव्रताची! अथवा त्यां पाप्यानें हें नांव घेऊन त्यास विटाळ कां लावावा? तो केवढा सत्पुरुष! मी केवढा अधम! कोठें त्याची धर्मावरची रति!

आणि कोठें माझी दुष्ट मति !

(यशोदा पुनः येते.)

यशो०—देवारे देवा ! हा काय अनर्थ मांडलास ! कसेंरे करूं ! अति झालें !

१ सर०—अहो यशोदाबाई ! अहो झालें तरी काय ?

यशो०—महाराज ! कायहो आपला हा मोह ! काय आपलीं हीं कृत्यें ! मी बोलतें, ह्मणून आपण मला पुनः धमकावणी द्याल कीं सुळावर देतां ?—पण महाराज ! आपण कांहीं करा, माझ्यानें बोलल्यावांचून राहवत नाहीं ! आपल्या या मोहापासून काय काय अनर्थ घडले आहेत पहा ! नुसता मोहच नाहीं, आपण क्रूर निर्दय तरी किती आहां ! आतां घ्या हीं मोहाचीं आणि क्रूरतेचीं फळें ! काय हे कुतर्क आणि काय हे भ्रम ! लहान पोरांना सुद्धां शोभणार नाहींत ! आणि आपल्या या वयाला शोभतात ! पहा पहा बरें! यापासून काय काय अनर्थ झाले आहेत ते ! ह्मणजे काळीजच फाटून जाईल, आणि वेड लागेल ! महाराज ! यापासून जीं जीं कृत्यें पूर्वीं झालीं, तीं आतांच्या पुढें कांहीं हो नाहींत ! ते केवळ पोरखेळ ह्मटलें तरी चालेल ! सुधन्वा राजा आणि सत्यव्रत हे एकदम येथून पळून गेले, यांचें पक्कें जरी कारण मला माहित नाहीं, तरी काय कारण झालें असेल, हें आह्मांला समजतें ! आपल्या जीवाला कांहीं तरी धक्का पोहोंचेल असें वाटल्यावांचून ते गेले नाहींत !—बरें सुधन्वा तर आपला बालमित्रना ? पण त्यावर असलें कुभांड रचावें ना ! बरें, तो सत्यव्रत पळून गेला!—त्याचा कांहीं अपराध नसतां, त्याचें घरदार सर्व कांहीं जप्त करावें ना ? इतकीं वर्षें इमानानें नोकरी केली, ती सर्व फुकट गेली अं ? आणि त्यावर आणि त्या राजावर भलतेंच तुफान रचावें ?—बरें हें असो, हें कांहींच नाहीं! त्या तुमच्या धाकट्या सोन्यासारख्या बाळाला दूर अरण्यांत नेऊन टाकून दिलें, तेथें त्याचें रक्षणही कोणी करणार नाहीं! असें कृत्य राक्षसाच्याही हातून झालें नसतें, त्याच्या सुद्धां अंतःकरणाला पाझर फुटला असता, आणि त्यानें तें बाळ वाचविलें असतें. तेंही असो. बरें आतां नंदन बाळाचा अंत झाला, त्याचें तरी कारण काय बरें ? इतका लहानगा, पण समज केवढा ! आपल्या लाडक्या आईचा आपला तातच छळ करीत आहे हें पाहून त्याचें काळीजच फुटलें, आणि त्यानें प्राण सोडला ! समजा, यांतही आपणाकडे फारसा दोष नाहीं ! पण आतांचा हा अनर्थ—हा हो कोणामुळें झाला ? देवारे देवा! हें तूं सर्व पाहतोस, आणि तुला कांहीं करुणा येत नाहीं ना ? आमची माउली मातुश्री बाईसाहेब त्याही निवर्तल्या !

१ सर०—यशोदाबाई! असलें भलतें स[illegible] बोलूं नका!

यशो०—मी खोटें कां सांगेन?—अहो प[illegible] तर शपथ घेतें! माझ्या बोलण्यावर विश्वास नसला किंवा शपथही खरी वाटत नसे[illegible] तर पाहिजे तर आंत जाऊन आ[illegible] डोळ्यांनीं बघा! पहा त्यांच्या तों रात्र-कशी कळा आली आहे ती! [illegible] घालवून द्याल, त्यांच्या ओठांचा [illegible] ! नी-

पुनः आणाल, त्यांच्या डोळ्यांचें पाणी पुनः आणून द्याल, देहाची उष्णता किंवा श्वासोच्छ्वास परत आणाल, तर मी तुमची जन्मोजन्मींची बटीक होईन !—पण अहो महाराज! या आपल्या सर्व पापांचें क्षालन पश्चात्तापानें व्हायचें नाहीं ! आता कितीही चांद्रायणादि पुण्यव्रतें करा, कितीही तपश्चर्या करा, कांहीं व्हायचें नाहीं! ग्रीष्मऋतूंत पंचाग्निसाधन करा, हेमंतांत पाण्यामध्यें बुडून रहा, वर्षाऋतूंत वारा पाऊस अंगावर घ्या, पण या हत्येचा दोष जाणार नाहीं!

**चंद्र०**—बोल! आणखी बोल ! जितकें बोलशील तितकें थोडेंच आहे! मीं केलेंच आहे असें, कीं सर्वांनीं मजवर कटूक्तींनीं प्रहार करावे!

**सर०**—यशोदाबाई! आतां अधिक बोलूं नका! कसेंही असो, तुह्मीं असें बोलणें या वेळीं उचित नाहीं!

**यशो०**—हो, मलाही आतां वाईट वाटतें कीं, मीं असें बोललें! कांहीं मीं करतें त्यावेळेस मला भान राहत नाहीं. पण पुढें मला फार वाईट वाटतें! आतां मला समजलें कीं, मवाशीं मी नाहीं तसें बोललें! खरेंच, महाराजांना तें फार लागलें!—असो; गेली गोष्ट ती गेली! गेल्याचा शोक करून काय फायदा ?—महाराज ! मज ह्मातारीचें काय मनावर घेतां ? काय वेडी मी ! ज्यांचा मीं विसर पाडावा, त्यांची पुनः पुनः आठवण काढून देतें ! खरेंच, माझी ही जीभ तोडून टाकली पाहिजे ! महाराज ! क्षमा करा!—मी आपली वेडी भावडी आहे. आ-झाला कीं नाहीं! आमच्या बाईसाहेब फार आवडत !—पण फिरून मी त्यांचें नांव काढतेंच !—आतां पुनः त्यांचें नांव काढायचें नाहीं ! त्यांच्या त्या मोठ्या बाळाचें नांव काढायचें नाहीं ! धाकटें तान्हें बाळ अरण्यांत टाकलें. त्याचेंही नांव काढायचें नाहीं !—आतां इतकेंच, कांहीं धीर धरा ! आपण टाकून दिलेलें बालक पुनरपि प्राप्त होईल ह्मणून गुरुजींनींच आपणाला आश्वासन दिलें आहे तेवढ्यावरच समाधान करून घ्या!

**चंद्र०**—मी कांहीं तुजवर रागावलों नाहीं. तूं जें कांहीं ह्मणालीस तें सर्व खरें आहे ! माझें शांतवन केलें असतेंस, त्यापेक्षां हेच तुझे कटु शब्द मला अधिक प्रिय आहेत ! बरें तें असो !—मला एकदा त्यांना पाहूं तरी दे !—त्या **नंदन**बाळाचें व तिचें एकदा शेवटलें दर्शन घेईन ! अघोर मी पातकी ! त्या दोघांचाही मीच अंत केला ! या जीवांत जीव आहे तोंपर्यंत त्यांचें विस्मरण या जनाला होणार नाहीं !—काय?—एका घटकेंत नव्हे,—एका क्षणांत असले दोन प्राणी नाहींतसे व्हावेना ! हरहर! या संसारांत काय अर्थ आहे? आतां माझें कोण राहिलें आहे? ज्यावर माझा सर्व प्राण तो **नंदन** गेला! जिला मीं व्यर्थ गांजिलें तीही सोडून गेली ! त्या बाळाला म्यां निर्दयपणानें अरण्यांत टाकून द्यायला सांगितलें ! तो **संस्नावक**-ही आजून आला नाहीं.—ती कन्या तरी मला लाभेल काय?—कसली लाभते.!—पण नाहीं !—गुरुजींनीं त्याच पत्रांत आश्वासन दिलें आहे कीं "लाभे ती जरि शोधि-

शी"—तेव्हां आतां शोध करविला पाहिजे, आणि त्या आशेवर काय ते दिवस का ढिले पाहिजेत!—चल बाई! त्यांना एकदा मला पाहूं दे! शोकानें माझें हृदय कसें विदीर्ण झालें आहे!—चल!—(जातात.)

---

**प्रवेश ३. मद्रदेश. समुद्रकांठचा ओसाड प्रदेश.**

(संस्तावक बालक घेऊन येतो. बरोबर एक कोळी आहे.)

**संस्ता०**—मग तुझी खातरी आहे तर, कीं आपलें तारूं मद्रदेशाच्या किनाऱ्यालाच लागलें?

**कोळी**—होय, माझी तर बोवा खात्री झाली. पण काय अमंगळ वेळ लागली आपणाला निघायला कोण जाणे. हा बघा वारा सुटला आहे. हें आभाळ पहा कसें ढगांनीं भरून गेलें आहे. मला तर बोवा! वाटतें कीं, आपण जें काम हातीं घेतलें आहे, तें चांगलें नाहीं, ह्मणूनच हा असा प्रसंग येऊं पाहतो आहे!

**संस्ता०**—ईश्वराची मर्जी असेल, तसें होईल! तूं जा तारवावर, आणि खबरदारीनें रहा. मी आलोंच बघ!

**कोळी**—लवकर आटपा बरें!—फार लांब नका जाऊं. वादळ येऊं लागतें आहे. सावजें ही येथें फार आहेत, असें मीं ऐकिलें आहे.

**संस्ता०**—तूं जा, मी आलोंच पहा.

**कोळी**—बरें झालें बोवा, आपला नाहीं हात या कामांत. (निघून जातो.)

**संस्ता०**—चल बाबा! आतां तुझी कशीरे अवस्था होईल! काय चमत्कार पहा! काल रात्रीं मला स्वप्न असें पडलें कीं आमच्या आईसाहेब मजकडे आल्या.—किती पण फिकट दिसत होत्या! त्या माउलीनें मजकडे पाहावें, आणि बोलायचा यत्न करावा, पण तोंडांतून शब्दच निघेना! शेवटीं कंठ मोकळा करून कांहीं वेळ रडल्या! अश्रूंनीं न्हाल्या! खरेंच त्यांचें तें दुःख मला पाहवेना. सरतेशेवटीं मोठ्या प्रयत्नानें मला ह्मणाल्या:—"अहो संस्तावक! तुमच्या मनांत नव्हतें, तरी तुह्मीं माझें तान्हुलें बाळ वनांत नेऊन टाकीन अशी शपथ घेतली आहे! ती खोटी करा असें मी नाहीं ह्मणत! तुह्मीं तरी काय कराल? दैवच मजवर फिरलें, ह्मणून महाराजांची बुद्धि फिरली! असो! आतां एवढें तरी करा! निर्जनीं वनीं जरी बाळाला टाकून द्याल, तरी त्याजजवळ कांहीं रत्नें आणि अमुकाचीं अमुक अशा एक लेख लिहून ठेवा! ह्मणजे रत्नें पाहून कोणाला दया येऊन माझ्या बाळाचें रक्षण होईल! आणि बाळ जगलें वांचलें तर लेखाच्या योगानें तरी ओळख पटेल!—असें होईल असें नाहीं; पण न जाणो ईश्वराची माया आहे! या लेखावर माझ्या बाळाचें नांवही लिहा! या कन्यका टाकून दिलें आहे, ह्मणून तिचें नांव मी मुक्तावली ठेविलें आहे! ही मुक्तावली पुनः कोठून माझ्या दृष्टीस पडणार!—काय—हो संस्तावक! तुह्मांला काय ह्मणावें? आतां तेची आणि बाळाची ताडातोड तुह्मीं केली. तुमची आणि तुमच्या मुलांचीही अशीच ताडातोड होईल!"—असें ह्मणून नाहींशा झाल्या. त्याबरोबर मी दचकून [illegible]! नी-

झालों. कांहीं वेळ तर मला कांहीं सुचेना. हें स्वप्नच कीं काय हें कांहीं कळेना. आणि मग खातरी करून घेतली कीं हें स्वप्नच ! पण हें काय बरें असलें चमत्कारिक स्वप्न ? असें संगतवार स्वप्न मला कधीं पडलें नव्हतें! आजपर्यंत स्वप्नांत कांहीं अर्थ नाहीं असें मला वाटत असे. पण काय असेल तें असो; राणी साहेबांनीं स्वप्नांत मला सांगितलें आहे तसें करच असें माझें मनच मला सांगतें.—हरहर ! राणीसाहेबांचा अंत तर नसेलना झाला ? झालाच असावा. कारण आमचे संतप्त महाराज त्यांना इतके दिवस राहूं देतील हें थोडेंच आहे!—बरें, दुसरा हा एक चमत्कार नव्हे कीं माझें तारूं मद्रदेशाच्या किनाऱ्यासच लागलें ? आमच्या महाराजांचा कोप ज्यावर फार आहे, त्याच्याच राज्यांत हें बाळ येऊन पडलें ! यांत खचित कांहीं ईश्वरी सूत्र आहे.—पण आह्मां मानवांना आज काय कळणार? या मुक्तावळीला या शालजोडींत गुंडाळून ठेवितों. ही एक रत्नांची पेटी ठेविली आहे, यांत तो सर्व वृत्तांत लिहिला आहे. कोणी जर येथें आलें तर या बाळाला पाहून त्याला दया येईल, आणि या पेटींतील रत्नांच्या लोभानें तो त्याचें रक्षण करील.—बाळा ! ईश्वर तुझें रक्षण करो.—हें पहा वादळ सुटलेंच! हरहर ! काय या बाळाची ही स्थिति ! राजकन्या असून ... असा प्रसंग यावा ना! इनें बरें कोणता अपराध केला आहे? मुक्तावली! तूं खरीच मुक्ता ! आह्मीं अवन्य कीं ... मुक्ताफळीस अंतरणार ! इकडे पाहून माझा जीव तीळ तीळ तुटतो! पण काय करूं? शपथ घेण्याची मला कां त्यावेळीं बुद्धि व्हावी !—असो; मी पातकी खरा!—बाळा ! जातों ! वारा अधिकच प्रबळ होऊं लागला ! असलें का गाणें गाऊन वारा तुला निजविणार !—कायहो काळेंभोर आकाश झालें हें !—हायहाय ! माझें हें कर्मही असेंच काळें आहे.——आं? पण ही डुरकावणी कोणाची ?—लवकर तारवावर जाईन तर बरें——अरेरे ! हा वाघ नव्हे, हा काळ आहे. मी कसचा याच्या हातांतून सुटतों. मातुश्री आई ! तुझें वचन खरें होणार ! मुलाबाळांची आणि माझी ताडातोड होणार ! तीं मला पुनः कोठून दिसणार ? हा आलाच माझ्या अंगावर चालून ! (वाघ पाठीमागें लागलेला असा पळून जातो.)

(एक वृद्ध गोपाळ येतो.)

गोपाळ—काय या कर्माला करावें? हीं आलीकडचीं पोरें फार उनाड निघालीं ! या असल्या वादळांत कोणी शिकार करायला येईल का ? यानीं पहा माझ्या दोन गाई लपवून पळविल्या ! बिचाऱ्यांची काय गत झाली असेल कोण जाणे. वाघाच्या मुखांत न पडोत ह्मणजे झालें. सांपडतील तर या खडकाच्या आड सांपडतील. नाहीं तर गेल्या.—पण हें रे काय! येथें हें कोणीं बरें बाळ आणून टाकलें?—फारच पण गोजिरवाणें अं! कोणा दुष्टाचें बरें हें कृत्य असावें? कां पण याला टाकलें असावें?—आईच्या किंवा बापाच्या मुळावर तर नसेलना ही आली ? ह्मणून इला टाकून दिलें आहे? पण कांहीं असो. दे-

वानें आपणाला दिली आपण उचलून घेवींच!—पण दम खा. वेड्याला विचारावें. तो काय ह्मणतो तें तर पाहूं!—वेड्या जवळच होता; त्याला हाक मारतों कसा! अरे वेड्या! वेड्या! ए!—(वेड्या येतो.)

वेड्या—ओ! ओ!

गोपाळ—अरे! आलास का? हें पाहिलेंस का? तुला बघ देवानें बहीण दिली!—पण असा भ्यालासा रे कां दिसतोस?—कांहीं तुला झालें कीं काय?

वेड्या—कांहीं नाहीं बाबा! तें बघा! मीं कीं नाहीं दोन मोठे प्रसंग पाहिले!—एक तो समुद्रांत आणि एक जमिनीवर! पण बाबा! समुद्र कसा ह्मणूं! हें वरचें आभाळ आणि खालचें पाणी एकच होऊन गेलें बाबा! आणखी काय अंधार गुडूप! डोळ्यांत बोट घातलें तरी दिसेना!

गोपाळ—तर मग तूं काय पाहिलेंस?

वेड्या—काय बाबा! तो समुद्र खवळला! आन् काय ओरडायला लागला! आन् काय खडकावर आदळूं लागला! पण बाबा! ही गोष्ट नव्हतों मी तुह्मांला सांगत! काय बाबा! ते गरीब नावाडी ओरडले, आणखी धायधाय रडले! माझ्या कानांत तो शब्द अजून गुणगुणतो आहे! ते एकदां दिसावे, एकदा दिसूं नयेत! त्याचें तें तारूं बाबा! असें वर खालीं व्हायला लागलें! एकदा वाटलें जातें आतां वर उडून! पण बघा गटदिशीं पाण्यांत कींहो बुडूनगेलें! आणखी त्याचा माग नाथूस!—हा एक प्रसंग. आणखी दुसरा तो हा जमिनीवरचा. काय पहा बाबा! त्या वाघानें त्याला ओढिलें आणखी तो भयांभयां ओरडूं लागला:—“सोडवारे सोडवा! अरे! मी संस्तावक आहें. मी सरदार आहें. मला सोडवारे सोडवा!”—पण तें तारूं कसें बघा बुडालें! ते लोक कसे ओरडले, आणि समुद्र तरी कसा ओरडला पण!—आणि तो बिचारा सरदार कसा ओरडला, आणि वाघ कसा ओरडला! पण वाघाचा शब्द त्यापुढें कांहींच नाहीं.

गोपाळ—अरे ही केव्हांची गोष्ट!

वेड्या—बाबा! ही आतांच झाली. अजून तें तारूं बुडालाही गेलें नसेल. आणखी वाघानें त्याला सगळा खाल्लाही नसेल.

गोपाळ—मी असतों तर त्या ह्मातार्‍याला सोडविलें असतें.

वेड्या—नाहीं बाबा! ह्या तारवांतील लोक वांचविले असते, तर बरें झालें असतें! एकाला वांचविण्यापेक्षां दहांना वाचविणें बरें!

गोपाळ—खरेंच रे वेड्या! असले प्रसंग फार वाईट! पण हें पाहिलेंस का?—वेड्या! तुला मरतांना लोक आढळले. पण मला पहा जन्मास आलेलें हें मूल सांपडलें. हें पहा!—ही शालजोडी बघ कशी चांगली आहे ती! हें कोणा तरी श्रीमंताचें बाळ आहे! आणि ही बघ पेटी! बघरे वेड्या! तींत काय आहे तें?—मला सांगितलें होतें एका जोशानें, कीं तुला द्रव्य सांपडेल ह्मणून! तेंच हें! बघ बघ बरें!

वेड्या—बाबा हो बाबा! आपलें नशीब उघडलें! यांत बघा! मोहरा, [illegible] रुपे आणि रत्नेंच! रत्न-

गोपाळ—जोशानें सांगितलें तें खरें. चल चल! घरीं जाऊं कसे. बेटे तूं नको! नी-

ही गोष्ट कोणाजवळ! चल ही पेटी आणखी हें बाळ लौकर घरीं घेऊन जाऊं! त्या गाई कोठें गेल्या आहेत त्यांचा शोध लावला पाहिजे! चल! चल!—

वेड्या—बाबा! तुह्मी एकटेच घरीं जा. मी गाई येतो घेऊन, आणि पाहतों तो वाघ गेला कीं नाहीं तो! तो गेला असेल, आणखी त्या सरदाराला सगळें खाल्लें नसेल, तर आपण त्याला मुठ माती देऊं! एकदा वाघाचें पोट भरलें, ह्मणजे मग तो कोणाच्या वाटेला जात नाहीं!

गोपाळ—बरें. तूं जा तर, मी घरीं जातों. राहिला असेल त्याचा कांहीं भाग, तर ये सांगायला!

वेड्या—बरें आहे बाबा! असेलच तर आपण दोघे मिळून त्याला मूठ माती देऊं.

गोपाळ—वेड्या! आज आपणाला चांगला दिवस उगवला. तर आपण कांहीं धर्म करूं आं! (जातात.)

---

## अंक ४.

### प्रवेश १.—स्थळ—मद्रदेश—गोपाळाची झोंपडी.

(गोपाळ येतो.)

गोपाळ—काय चमत्कार पहा! बोलतां बोलतां वेळ कशी निघून जाते ती! ही मुक्तावली मला सांपडून पुरीं बारा वर्षें होऊन गेलीं! खरेंच, ही कन्या मोठ्या कुळांत जन्मली असावी! तिचें तें सौंदर्य पाहून सर्व लोक कसे तिजकडे टकमक पाहतात! या वृद्धापकाळीं मला तिला पाहून मोठें समाधान वाटतें! पोटच्या पोराहूनसुद्धां माझी ममता तिजवर अधिक आहे! आणखी पोर तरी किती शहाणी कीं तिचें तें शहाणपण पाहून लोक नवलच करितात! मला ही मोठी काळजी लागली आहे कीं हिला चांगला नवरा कसा मिळेल? मी आज पुष्कळ ठिकाणीं शोध करितों आहे, परंतु माझ्या मनाला अजून कोणी येत नाहीं.—पण आपण काळजी कशाला करावी? देवानें कोठें तरी नेमून ठेवलाच असेल!—असो; होणार असेल तें होतेंच, पण मनुष्याला कोठें राहवतें? अलीकडे एक दोन महिने माझ्या घरीं तो गोविंदा येतो, तो बरा चांगला दिसतो! कधीं कधीं कामाला हातही लावितो! मला वाटतें तो आमच्या येथें येतो, याचें कारण हीच मुक्तावली! आणखी खरेंच या मुक्तावलीचा आणि त्याचा चांगला जोडा जमेल! उद्यां आमच्या वेड्यानें जवळच्या गौळ्यांना बोलाविलें आहे. आणखी ते कांहीं तरी खेळ करणार आहेत. मला ह्मातार्‍याला आतां काय करायचें आहे? खेळतना एकादे दिवशीं? आज त्या वेड्याची कोण धांदल उडाली आहे! झाडांना दोऱ्या बांधतो आहे, टिपऱ्याच जमा करितो आहे, आंब्याचीं पानें आणून तीं दारालाच लावतो आहे, आपला एक लहानसा मांडवच तयार करितो आहे! माझी सून झालेसार.—तिचीही खटपट सुरू आहे! आणखी मुक्तावलीला तरी किती आनंद झाला आहे! वेड्याचें तिजवर केवढें प्रेम! आणखी तिचेंही पण कमी नाहीं. एकदा हिचें लग्न झालें, ह्मणजे मग माझा

कोठेंही जीव गुंतणार नाहीं. पण देवाची मर्जी असेल तसें होईल ! —(जातो).

---

**प्र० २ स्थळ—मद्रदेश, सुधन्व्याच्या राजवाड्यांतील एक खोली.**

( सुधन्वा आणि सत्यव्रत येतात. )

सुध०—**सत्यव्रत** ! एवढें मात्र मी तुमचें ऐकणार नाहीं. याखेरीज पाहिजे तें मागा. मी नाहीं ह्मणणार नाहीं. मात्र हा आग्रह सोडून द्या. तुह्मांला ना ह्मणणें कसें जीवावर येतें, पण ना ह्मटलें नाहीं तर माझी काय अवस्था होईल, हें माझ्या जीवालाच ठाऊक !

सत्य०—महाराज! **सिंहलद्वीप** सोडल्याला आज मला बारा वर्षें झालीं. आजपर्यंत मी राहिलों खरा, पण आतां वाटूं लागलें आहे कीं, हीं हाडें आपल्या जन्मभूमींत जाऊन पडावीं. दुसरें—**चंद्रकांत** महाराजांचें मन आतां फिरलें आहे. त्यांना मोठा पश्चात्ताप झाला आहे. त्यांचीं किती वेळ आजपर्यंत पत्रें आलीं असतील कीं तूं परत ये ह्मणून? "कुटुंब निवर्तलें, **नंदन** निवर्तला, माझें समाधान करण्याला कोणी नाहीं," असें त्यांनीं लिहिलें आहे. पुष्कळदा आपली आज्ञा मागितली, पण आपण मला जाऊंच देत नाहीं. केव्हांही मीं विचारिलें, तरी 'इतक्यांत नाहीं' असें सांगतां, तेव्हां आतां काय करावें? खरेंच, आतां मला जाऊंद्याच!

सुध०—माझ्या इच्छेस्तव इतके दिवस राहिलां, तसे आणखी कांहीं दिवस रहा ! आतां जाऊन मागील सर्व उपकार मला विसरायला नका लावूं ! खरेंच, तुह्मांला जाऊं द्यावें, असें माझें मन घेतच नाहीं. आणखी असें कां ह्मणून विचाराल, तर पहा ! आजपर्यंत तुमच्या सारखा मला कोणी मंत्री मिळाला नव्हता. तुह्मीं आज बारा वर्षें माझें राज्य सुरळीत चालविलें. आतां आह्मांला सोडावें, हें मला कसें बरें वाटेल ? यापेक्षां तुह्मी मला मुळींच लाभलां नसतां, तर बरें होतें. पण दुष्प्राप्य रत्न एकदा हातीं आल्यावर कोण अभागी त्याचा त्याग करील ?—तें कांहीं नाहीं! **सत्यव्रत** ! तुह्मी जीं कामें अंगावर घेतलीं आहेत, तीं इतरांना झेंपण्यासारखीं नाहींत. तुमचीं तुह्मींच तीं केलीं पाहिजेत; आणि आजपर्यंत मी तुमचा पुष्कळ ऋणी आहें, तसा आणखीही होईन. खरेंच, तुमचे मजवर उपकार अनंत आहेत, ते मी जन्मोजन्मीं विसरणार नाहीं. फेडायची तर आशाच नको.—आतां त्या **सिंहलद्वीपाचें** तर नांवच काढूं नका. त्याचें नांव निघालें कीं आमच्या दादाची आठवण होते. खरेंच ते माझे दादा! त्यांना केल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला, आणि मी त्यांजपेक्षां धाकटा असूनही त्यांनीं माझी क्षमा कीं हो मागितली! हर हर! त्यांची अशी स्थिति व्हावीना! सखी विचारी! छळ तिला सोसला नाहीं, आणि त्यामुळें तिचा आणि त्या बाळा **नंदनाचा** अंत झाला. हर हर! मीच या अनर्थाला कारण झालों! मी जर तेथें गेलोंच नसतों, तर आज त्यांचें कुटुंब कसें सुखांत निमग्न असतें! देवा ! केवढा मी पातकी ! पण कां रात्र असो. **चंद्रकांत** महाराजांनीं आमच्या वहिनींचा त्याकाळीं जरी छळ केला, ! नी-

त्यांवर त्यांचें प्रेम किती होतें, हें आतां दिसून येतें! त्यांचे सरदार त्यांना पुष्कळ आग्रह करितात कीं, "महाराज! आपण विवाह करावा." पण त्यांचें एकच उत्तर "मला तशी आतां पुनः मिळणार नाहीं!" असें निःसीम प्रेम आपण नव्हतें पाहिलें! आमच्या दादांना काय तो एक आशातंतु राहिला आहे! त्यांच्या कुलगुरूंनीं त्यांना सांगितलें आहे कीं, जी कन्या नष्ट झाली आहे ती प्राप्त होईल. आणि कां नाहीं हें खरें होणार? साधूंची उक्ति कधींही अनृत होत नाहीं. पण तें असो.—आलीकडे कमलाक्ष एक दोन दिवसांत मला दिसला नाहीं. तुमची आणि त्याची गांठ पडली होती का? खरेंच, तो कसा निघेल याविषयीं मला मोठी चिंता आहे! कारण,

श्लोक.

निपुत्रिकातें बहु दुःख होतें,
तसेंच होतें मृतपुत्रकातें.
त्याहीपरी दुःख विशेष होतें
कुपुत्रकाच्या जनकास हो तें.

सत्य०—मींही दोन दिवसांत त्यांना पाहिलें नाहीं. ते काय करीत असतात हेंही मला ठाऊक नाहीं. इतकें मात्र माझ्या लक्षांत आलें आहे कीं, आतांशीं ते फारसे दरबारांत येत नाहींत, व पूर्वीच्या व्यवसायांतही त्यांचें लक्ष नाहीं!

सुध०—माझ्याही लक्षांत ही गोष्ट आली, आणि त्यामुळें मला मोठी चिंता उत्पन्न झाली आहे. तो कोणीकडे जातो, याचा शोध लावण्याकरितां मीं गुप्त चार पाठविले होते. चार हे आह्मा राजांचे चक्षु होत. कोठें काय होत, याचें इत्थंभूत वर्तमान ते आह्मांला सांगतात. या चारांकडून मला अशी खबर कळली आहे कीं, आमचा कमलाक्ष येथून तीन चार कोसांवर एक खेडें आहे, तेथें एका गौळ्याच्या घरीं अक्षयीं असतो. ह्मणतात हा गौळी पूर्वी निर्धन होता, पण आतां मोठा सधन झाला आहे. आणखी याच्याजवळ ही संपत्ति कोठून आली, हें कोणाला ठाऊक नाहीं!

सत्य०—महाराज! मींही या गौळ्याविषयीं असेंच ऐकिलें आहे. आणखी असेंही ह्मणतात कीं, याला एक कन्या आहे, तिचें लावण्य कांहीं अलौकिक आहे. अशा ठिकाणीं असलें रत्न संभवेल, असें नाहीं! पण कोणाला ठाऊक!

सुध०—हेंही मला चारांनीं सांगितलें आहे. तेव्हां गोष्ट पटली. याच कन्येला लुब्ध होऊन कमलाक्ष तिकडे जात असेल. तिजवर याचें प्रेम जडलें नसो ह्मणजे झालें. नाहीं तर अनर्थाला कारण होईल. माझ्या मनांत असें आलें आहे कीं, आपण जाऊन डोळ्यांनें हें बघावें. तुह्मींही मजबरोबर चला! आपण असें वेषांतर करूं कीं, आपणाला कोणींही ओळखणार नाहीं; आणखी तेथें जाऊन त्या गौळ्याला विचारूं. गौळी भोळे असतात, तेव्हां आपला कमलाक्ष तेथें कां जातो, याचें कारण आपणाला त्याजपासून सहज काढून घेतां येईल. या कामांत मला तुमचें साहाय्य असलें पाहिजे. समजलां?—आतां सिंहलद्वीपाचें पुनः नांव काढूं नका.

सत्य०—मी महाराजांबरोबर मोठ्या आनंदानें

येईन. पण स्वदेशीं जाण्याची इच्छा महाराजांनीं पुरवावीच!

सुच०—त्याचें मग पाहतां येईल. उदईक आपणाला या गौळ्याच्या घरीं गेलेंच पाहिजे. वेषांतर करून जायाचें अं! लक्षांत असूं द्या? (जातात.)

---

प्र० ३. स्थळ—तेंच. गोपाळाच्या खोपटीजवळील एक रस्ता.

(कुटिल गात गात येतो.)

कुटि०—

पद.

चल सखि! जाऊं कुंजवनीं ध्रु०
माधव मंत्रा घेउनि म॰॰थ, अवतरला अवनीं. १
अनिलसमीरित वनराजीची, शोभा आण मनीं. २
चित्रविचित्रा सकला भूमी, शोभे ही सुमनीं. ३
सहकारांना मक्तर फुटले, मधुकर करिति ध्वनी. ४
कुसुममनोहर मारुत वाहे, उत्सव होय जनीं. ५
शुक,पिक,मैना सुस्वर गाती, वाढे मोद मनीं. ६
आलापातें घेउनि कोकिल, रंजावि मधुर स्वनीं. ७
पूर्ति करुं या विलोचनाची, काय असे सदनीं? ८

राजपुत्र कमलाक्ष यांचा मी एकदा नोकर होतों. त्यावेळीं माझी काय चैन होती! उंच उंच पोशाख! खायला गोड गोड! पण आतां तें सर्व वारें फिरलें! भाकरीचा तुकडा मिळण्याची पंचाईत झाली आहे! पण ही स्वारी थोडीच माशा मारीत बसणारी आहे! एक मार्ग नाहीं, तर दुसरा! येथें हो काय कमी! लोकांजवळ कांहीं खायला असलें कीं तें आमचेंच! आह्मीं चोर मोठ्या उदार बुद्धीचे! आपपर आह्मांला माहित नाहीं! रात्र, आणि त्यांत आंवस, आह्मांला मोठी प्रिय! चंद्र आह्मांला मुळींच आवडत नाहीं, आणखी तो आमच्या कुळाचा शत्रु!—आमचा धंदा असातसा लहानसान नाहीं, फार मोठ्या योग्यतेचा! कोठें कोणाचें भांडें घराबाहेर पडो, कीं तें कांहीं त्याच्या पुनः दृष्टीस पडायचें नाहीं! कोठें धर्मशाळेंत कोणी आपली वस्त विसरो, कीं तीवर हक्क आमचा! कोठें एकाद्या बाईनें लुगडें वाळत घातलें, कीं तें या स्वारीनें नेलेंच! वा:! केवढे आह्मीं हुशार! मग आमचा हा रोजगार चालतोच कीं नाहीं! कोणावर चालतो ह्मणाल तर गाफल लोकांवर! आह्मीं मोठे ठक! कांहीं तरी युक्ति लढवून आपलें कार्य साधून घेणार! हा आमचा उद्योग आजकालचा नाहीं! बाळपणींचं या स्वारीचा पराक्रम लोकांना दिसून आला होता! तेव्हांच "कुटिल" हें नांव मिळविलें! हें लहानका बक्षीस! आमचे दुसरे भाऊबंद आहेत, ते वाटा मारितात. पण त्यांचा माझा प्रत्यक्ष संबंध नाहीं. त्यांचें चालतें तोंपर्यंत बरें आहे. पण जर का एकदा ते सोटेवाल्यांच्या तावडींत सांपडतील, तर मग सुळाशींच गांठ! दगा न कोणाचा सगा! नकोरे बाबा! आपणाला तो घातपात आणि तो सूळ! आह्मीं सांपडलोंच तर दोन चार दिवसांचा खोडा मिळेल! आतां आह्मी हें करतों हें पाप किंवा याचा आपला विचारच करूं नये का? कारण हा बेटा विचार चोरांना कांहीं कामाचा नाहीं. माझी पण काय शिक्षापी घटकेंत माझें सोंग निराळें! औं गा! मला कोण ओळखतो?—हो पहा रात्रीची एक शिकार आली!

! नी-

(वेड्या येतो.)

**वेड्या**—बघूं बरें.—चार विसा त्या! तेव्हां त्याचे दोन रुपये! हीण्याचा रुपया हा! घटकाभर खटव्याचे चार आणे ते! किती झाले! दोन रुपये, एक रुपया, आणि एक पावली! पण ती रकमच विसरलों—

**कुटिल**—(एकीकडे) हा लाग साधला तर मग आमची चंगळच!

**वेड्या**—नाहीं, आपणाला खडे घेतले पाहिजेत.—आमच्या ताईनें उद्यांकरितां काय बरें मला आणायला सांगितलें?—तीन शेर गूळ—हरभऱ्याची डाळ—तांदूळ.—पण आह्मांला तांदूळ कशाला पाहिजेत?—पण आपणाला ही कोणीं पंचाईत सांगितली? बाबांनीं सांगितलें कीं, ताई सांगेल तें आणून दे. उद्यांची सर्व तयारी ती करणार आहे. तिनें बाकीची सर्व तयारी केली आहे!—पण मला थोडी रांगोळी आणली पाहिजे. इतकी मंडळी येणार, आणखी रांगोळी नको! आणखी थोडा गुलालही पाहिजे. पण मीं सगळेंच विसरलों. पानें आणतां येतील, पण तंबाखू! ती तर पुष्कळ पाहिजे!—ताईनें सांगितलेलें राहिलें—लवंगा, मोऱ्या, आणि हिंग. हें सर्व आणलें पाहिजे. काय याला लागेल कोणाला ठाऊक?

**कुटिल**—(जमिनीवर पडून) देवारे देवा! कोणी मला हात देईल का रे!

**वेड्या**—अरे, काय आहे रे?

**कुटिल**—[illegible] बाबा! थोडा मला हात दे रे.

**वेड्या**—अरे, [illegible] काय पण?

**कुटिल**—अहो त्यानें मला मार मार मारिलें. [illegible] कोण माझा पैसा हिसकाऊन घेतला! माझे कपडे चांगले होते, तेही घेतले! आणखी हे पहा कसले घाणेरडे कपडे मला दिले!

**वेड्या**—बरें पण, तुला कोणीं मारिलें?—भामट्या होता? का चोर होता?

**कुटिल**—चोरही होता, आणखी भामट्याही पण होता.

**वेड्या**—भामट्याच खरा. असले घाणेरडे कपडे दुसरे कोणाजवळ सांपडतील? चल, उठ, हा मी तुला हात देतों.

**कुटिल**—हळूच रे बाबा हळूच!

**वेड्या**—अरेरे! इतकें का तुला त्यानें मारिलें?

**कुटिल**—हळूच! हळूच! ही पहा माझी कंबरच मोडली! आणखी हात लचकला! अग आई! अग वया वया!

**वेड्या**—राहवतें ना उभें?

**कुटिल**—हळूच! हळूच! (त्याचा खिसा कातरतो.) बाबा! तुझें देव बरें करो!

**वेड्या**—तुला कांहीं पैसे पाहिजेत रे! पाहिजे असतील तर देतों.

**कुटिल**—नको रे बाबा! मला नकोत पैसे. पैसे घेऊन आणखी कोठें उपकार फेडूं? या पलीकडच्या खेड्यांत माझा मामा रहातो, तिकडे मी चाललों होतों. तेथें गेलों ह्मणजे मग मला कांहीं कमी नाहीं. तुमचे नकोत मला पैसे. छे! छे! लोकांचा पैसा कशाला मला पाहिजे?

**वेड्या**—तुला ठाऊक आहे का, कोणीं तुला लुटलें तें?

**कुटिल**—हो हो! ठाऊक आहे तर! तो गुलाम इकडून तिकडे भटकत फिरतो, आणखी एकटें दुकटें पाहिलें कीं सोडीतच नाहीं!

तो त्या राजपुत्राच्या तैनातींत होता, आणि मग त्यानें कोणते गुण उधळले कोणाला ठाऊक? पण त्याला गचांडी देऊन लाथा बुक्या मारून राजवाड्यांतून हांकून दिलें!

वेड्या—गुण तसेच असतील, ह्मणून हांकून दिलें! नाहींतर कशाला असलें पाहिजेना? फुकट कोण कुणाला हांकून देईल?

कुटिल—तो मला चांगला माहित आहे.—कांहीं दिवस गारुडी बनला होता. मग पुढें लोहाराचे हाताखालीं राहिला. तेथून निघाला तो हे दशावतारी येतात कीं नाहीं यांच्या टोळींत मिसळला. आणि आतां आपला पक्का भामट्या बनला आहे.—त्याला कायसें "कुटिल कुटिल" ह्मणतात. नांव तरी मोठें विलक्षणच! मला अजून त्या नांवाचें राहून राहून हंसू येतें.

वेड्या—हातत्याच्यारे! त्याला का तूं भ्यालास? तो भामट्या खराच!—यात्रेंत जातो. देवळात जातो, आणखी कांहीं हाताला लागलें तर बघतो. याचें नांव मीं ऐकलें आहे, पण त्याला अजून डोळ्यांनीं कसें तें बघितलें नाहीं.

कुटिल—तोच तो लुच्चा! त्यानेंच मला लुटलें आणि मारलें!

वेड्या—अरे! काय मर्दा! त्याला का तूं भ्यालास? असला भेंकड तर आपल्या इकडे कोणी नाहीं. थोडें यत्न केलें असतेंस तर तो पळून गेला असता! छत् मर्दा! अशाला का कोणी भितो?

कुटिल—मला कोठें पण ठाऊक होतें कीं तो भेंकड आहे? आणखी खरेंच पुसशील तर मला कीं नाहीं तें कांहीं ठाऊक नाहीं. मी ही आपला भेंकडच आहें. आणि तें त्याला ठाऊक होतें वाटतें.

वेड्या—आतां पण तुला बरें वाटतेंना? चालतां येईल का?

कुटिल—हो, आतां येईल. तुह्मीं जा आपल्या कामाला. मी आतां हळू हळू आपल्या चुलत्याकडे जातों!

वेड्या—मी येऊं का तुजबरोबर?

कुटिल—नको नको! तुह्मीं जा!

वेड्या—बरें तर मग. उद्यां आमच्या येथें बारस आहे. त्याकरितां मला सामान घ्यायला जायचें आहे, तिकडे मी जातों. नीट जपून जा बरें!

कुटिल—बरें बाबा! (वेड्या जातो.) सामान घ्यायला जातोस, पण खिशांत काय आहे?—बरें आहे हें एक दुसरें संधान लागलें. उद्यां यांच्या येथें मंडळी जमेल, तेथें आपणाला गेलेंच पाहिजे.—जाईन, आणखी तेथें जर नाहीं लाग लागला, तर नांवच बदलून ठेवीन!

---

**प्रवेश ४. स्थळ—गोपाळाचें घर.**

(कमलाक्ष आणि मुक्तावळी येतात.)

कम०—सुंदरी!

**श्लोक.**

वसन हें तुजला बहु शोभवी,
अमळ रत्न कसें वद गोपवी?
अवतरे विधु अंबर सोडुनी,
झळकतो वदनीं गमतें मनीं.

आणखी आज खंडोबाची काठी मि ... रात्र- ... ! नी-

१. उत्पन्न करी.

ण्याकरितां हे जे गोप आले आहेत, ते मला गोप वाटत नाहींत ! तर—

**श्लोक.**

स्वर्गीं असे दुर्लभ अप्सरांना
हें जाणुनी गर्व नसे जयांना
वाटे सुरांचे गण ते अमूप,
आले पहायास तुझें सुरूप.

**मुक्ता०**—भलतेंच कांहीं तरी बोलायचें ! पण आपणाला कसें नांव ठेवावें ? माझी तशी योग्यता नाहीं. पण हें असलें काय मेलें करावें ? मला ही भरगची शालू आणखी जरीकांठी चोळी आणून दिली, आणखी हट्टच घेतला कीं तूं नेसच ! आणखी आपण मात्र एकाद्या साधारण गौळ्याचा वेश घेतला, याला काय ह्मणावें ? आपली योग्यता कोठें आणि हा वेष कोठें ?—आणखी मला उंच वस्त्रें शोभत नसून हीं दिलीं ! हें काय बरें ? आज मला लोक काय बरें ह्मणतील !—बरें पण, आपण मात्र असल्याच वेषानें इतर मंडळींत येणार ! वाहवा ! मी नाहीं ऐकायची ! आपण यापेक्षां चांगला पोशाक केला पाहिजे !—खरेंच, आपला हा असला पोशाक पाहून मला कसेंसेंच वाटतें !

**कम०**—पण मला आवडतो ना ? तुला कां वाईट वाटावें ? पण तें असो. मला तर असें वाटतें कीं, त्या दिवशीं मृगानें मला येथें आणिलें नाहीं, तर माझ्या सुकृतानेंच ! कारण—निर्य !

**श्लोक.**

मधुर असती या भूलोकीं[१] पदार्थ अनेकसे;
नयनविषयीं[२] येतां चेत:प्रसादहि[३] होतसे,
तरि नयनीं ही वामांगी त्यां जयीं अवलोकिली,
सुकृतघटिका[१] ती या जन्मीं गमे मज एकली !

**मुक्ता०**—मला बाई ! हें सुचिन्ह दिसत नाहीं. आपली योग्यता कोठें ? आपण जो विचार मनांत आणिला आहे, तो मला नाहीं वाटत घडून येईलसा ! आपणाला नाहीं कसली भीति ! पण मला तर आहे ना ! हें बघा, आपण जसे अकस्मात् येथें आलां, तसेच महाराज येथें आले तर मग ?—मला कीं नाहीं बरी गत दिसत नाहीं. ते आले ह्मणजे आपणाला काय ह्मणतील ? मला काय ह्मणतील ?—आणखी ही असली शालू—कीं जी मला शोभत नाहीं—ती नेसून मला मान तरी वर करवेल बरें ?—खरेंच, हा नाद आपण सोडून द्या कसा !

**कम०**—काय ? वेडी तर नाहींस ! असलें भलतें सलतें नको मनांत आणूं गडे ! यापासून आपलें चांगलेंच होईल. हा गोपाचा वेष तुला आवडत नाहीं, होय ? बरें तर. याचें काम झालें ह्मणजे टाकून देईन. तुझ्या बाबाचें वचन घेई तोंपर्यंत काय तो याचा स्वीकार केला आहे. तेवढें कार्य झालें ह्मणजे मग मी राजपुत्र आहें, असें सांगायला कांहीं हरकत नाहीं. स्त्री मिळविण्याकरितां युक्ति प्रयुक्ति कराव्या लागतात. **सुभद्रेचें** हरण करण्याकरितां **अर्जुनानें** नव्हता का यतीचा वेष धारण केला ? त्या पेक्षां तर हा वेष बरा ना ? **कृष्णानें** नाहीं का युक्तीनें **कुंडिनपुरांतून रुक्मिणीचें** हरण केलें ? तसें पण मी तुझें हरण नाहीं करणार ! तुझ्या पित्याचा

१. भूलोक. २. डोळ्यांसमोर. ३. चित्ताची प्रसन्नता.

१. पुण्याची घटिका.

रुकार घेईन, आणि मग तुझा आणि माझा विवाह होईल !

मुक्ता०—विवाहाचें कशाला नांव काढतां? आपल्या मनांतून जरी असलें, तरी महाराजांना ती गोष्ट कशी रुचेल? गौळ्याच्या पोरीशीं ते आपणाला लग्न कसें लावूं देतील ? त्यांनीं नाहीं ह्मटलें, ह्मणजे आपलें कांहीं चालणार नाहीं, आणि मग आपणाला माझा नाद सोडून द्यावा लागेल ! असें झालें ह्मणजे मग मी आपणालाही मुकलें आणखी जीवालाही मुकलें. एवढ्याकरितां अगोदरच सांगतें कीं हा नाद सोडून द्या.

कम०—प्रिये ! भलत्याच शंका मनांत आणून आजचा सुदिन दुर्दिन नको गडे करूं ! काय सांगूं ?

श्लोक.

हा दास सुंदरि ! तुझा; न [1]अलीक जाणें;
ये [2]अंतराय जरि तात तया न [3]भिणें.
ये विघ्नसंघ जरि, हो प्रतिकूल दैव,
राहील हा [4]मदनुराग असा सदैव !

तुला माझ्या ताताची भीति वाटते, पण हें बघ!

श्लोक.

मत्प्रिया जरि मिळेल न मातें,
काज काय मजला मग तातें ?
जोंवरी मन असे मदधीन,
तों धरो तव गुणीं रति कां न ?

एवढ्याकरितां ह्मणतों कीं, असल्या भलत्याच कल्पना मनांत आणून विरस करूं नको ! हे पहा बोलावलेले गोप येऊं

१. मिथ्या. २. अडथळा. ३. भिणें. ४. माझी प्रीति.

लागले ! अशा वेळीं हें असलें खिन्न वदन नाहीं कामाचें ! प्रिये ! यावेळीं असेंच कां बरें समजेनास, कीं,

श्लोक.

मोठी आस धरूनियां दिवस जो येवो असें इच्छितों,
अर्पी कंकणयुक्त हस्त तव हा जेव्हां उपाध्याय तो,
जेव्हां मंगल वेदमंत्र पठती उच्च स्वरें ब्राह्मण,
होशी राजवधू जयीं नृपकुळीं, तो आज पुण्यक्षण !

मुक्ता०—अंबाबाई करील, तर असा सुदिन येईल आपणाला !

(गोपाल, गोपांचा वेष घेतलेले सुधन्वा आणि सत्यव्रत, वेड्या, म्हाळसा, आणि इतर गोप व गोपी येतात.)

कम०—हे पहा गोप आलेच. तुझ्या घरीं आले आहेत, तेव्हां यांचा चांगला आदर सत्कार कर, आणि आज जिकडे तिकडे आनंदच आनंद होऊं दे!

गोपाल—हें काय ग असें मुक्तावली ! मुली ! बरें, आपल्या येथें कोणी चार चौघे आले, तर त्यांची व्यवस्था नाहीं का तुह्मीं ठेवूं ? तुह्मीं आतांच्या पोरी अयदीं झालां! ती होती, तेव्हां सर्व काम करीत होती, झाडीत होती, सारवीत होती, भांडीं घांशीत होती, स्वयंपाक करीत होती, गद्दीत होती, पाय धुवायला पाणी देत होती, कोणी पई पाहुणा आला तर या बसा ह्मणत होती,—नाहीं तर तुह्मीं ! जशा कांहीं राजाच्या पट्टराण्या ! हें काय असें ! चला. हे पहा आपल्या येथें अनोळखी गृहस्थ आले आहेत, यांचा आदर सत्कार करा ! काय रे वेड्या ! तूंही जिकडे जातोस तिकडेच! आतां रात्रं जर नाहीं पाहिलें, तर मी म्हात
ां ! नी-

कारे पहावे! अरे! तुमचे हे दिवस आहेत. माझ्या काय गेल्या गोंवऱ्या नदीवर! चला, या सर्वांचा आदर सत्कार करा! कांठीची पूजा करायची आहेना—तर द्या यांना फुलें. मनापासून पूजा करा बरें, ह्मणजे खंडोबा तुमचें कल्याण करील. ऐकलें कारे ए? समजलांतना नीट? नाहीं तर पहा आपले अळंटळं कराल; तें चांगलें नाहीं.

वेश्या—(सुधन्व्यास) आपण बसावें येथें. आणखी (सत्यव्रतास) आपणही पण बसावें. आमचे बाबा आतां वृद्ध झाले आहेत, तेव्हां आमचा हा पोरवडा आपणासारख्या वृद्धांना आवडेल कीं नाहीं कोण जाणे? ताई! तूं मघांशीं फुलें ठेवलीं आहेत तीं दे ग यांना!

मुक्ता०—हीं घ्यावीं जुईचीं आणि पारिजातकाचीं फुलें. हीं कीं नाहीं मोठीं सुकुमार आहेत! लौकर कोमेजतात!

सुध०—मुली! आमच्या वयाला अनुरूप अशींच तूं आह्मांला हीं पांढरीं पुष्पें दिलीं! यांचें सौंदर्य जसें क्षणिक आहे, तसेंच आमचें जीवितही क्षणिकच आहे!

मुक्ता०—आपणाला रंगी बेरंगी फुलें आवडणार नाहींत, ह्मणून हीं पांढरीं फुलें दिलीं. आणखी खरें पुसाल तर मलाही पण हीं असलीं रंगी बेरंगी फुलें आवडत नाहींत!

सुध०—हं—पण असें कां बरें मुली?

मुक्ता०—कारण ह्या असल्या फुलांचा वरकांती रंग पाहून घ्यावा! त्यांना फारसा सुगंध नसतो!

—(एकीकडे) एकूण वरकांतीच्या गुणांस लुब्ध होत नाहीं! अंतर्गुणांच्या योगानें हिचें मानस रममाण होतें! चमत्कार खरा, कीं गोपाची कन्या आणि इतकी शहाणी!

मुक्ता०—हीं मोगऱ्याचीं आणि शेवतीचीं फुलें आपण घ्यावीं! (सत्यव्रतास उद्देशून) हींही आपल्या वयाला अनुरूप आहेत! पाहिजे तर हीं निशिगंधाचीं घ्या! नाहीं तर बकुलीचीं घ्या!

सत्य०—पहिलीं दिलीं तितकीं पुरत. अधिक नकोत. (एकीकडे) खरेंच, ही लावण्याची खाणी या कुळांत कशी निपजावी? उगीच नाहीं आमच्या धाकट्या महाराजांचें चित्त येथें रमलें!

मुक्ता०—(कमलाक्षास उद्देशून) आपणाला बरें कोणतीं फुलें द्यावीं? आपणाला देण्यासाठीं आज मजजवळ नाहींतच! हा वसंतकाळ असता तर आपणाला योग्य अशींच सुमनें दिलीं असतीं.—

कम०—मला फारशीं सुमनें नकोत! एकच दिलें ह्मणजे पुरे आहे!

मुक्ता०—(हळूच) आणि तें कोणतें?

कम०—(हळूच) तें असें उपवनांत होत नाहीं, तें तुझ्या हृदयारामांत विकास पावतें.

मुक्ता०—(हळूच) हें काय बाई बोलणें! तें सुमन आतां मजपाशीं राहिलें आहे कोठें! तें तर केव्हांच नेलें!

कम०—(हळूच) नेलें कीं दिलें?

मुक्ता०—(हळूच) कांहीं का ह्मणाना? मजजवळ नाहीं हें खरें!

कम०—(हळूच) बरें तर मग, हा बकुलीच्या सुमनांचा हार त्वां केला आहे तोच तोंपर्यंत मी आपल्या गळयांत घालतों.

मुक्ता०—(हळूच) तोंपर्यंत ह्मणजे?

**कम०—**

पद.

तोंवरि हार सखे सांचा
कंठीं घालिन बकुलीचा. (ध्रु.)
गोष्टी कथितां एकांतीं
प्रणयें झळके मुखकांति !
ठेउनि विश्वासातें मजवरि घेतां विश्रांति,
जोंवरि अर्पिशि मम कंठीं तो हार न बाहूचा. (तों०)

**मुक्ता०**—तो दिवस येईल कीं नाहीं कोण जाणे. पण सध्यां आपण आनंद मानून घेत आहां, हेंच पाहून मला आनंद होतो. खरेंच, माझें मन जरी सांगतें कीं ही भलतीच आशा धरूं नको, तरी काय असेल तें असो, आपणाकडे पाहिलें ह्मणजे अगदीं व्यर्थ आशा आहे असें वाटत नाहीं. तुह्मींच नाहींका परवां मला सांगितलें कीं, दृढ निश्चयाचें बळ विलक्षण आहे? कितीही विघ्नें मध्यें आलीं तरी तीं सर्व ह्याच्या योगानें दुरावतात. बरें, तें असो. पण काय चमत्कार असेल तो असो. आज माझ्या मनाची कीं नाहीं स्थिति कशीचशी झाली आहे !

**कम०**—चमत्कारिक ती कसली ! राजमुकुटांत ज्यानें वास करावा अशा रत्नाला जर एखाद्या कोनाकोपऱ्यांत टाकून दिलें, कीं जेथें त्याला कोणी पहातही नाहीं, तर त्याला वाईट वाटेल, हें सांगायला का पाहिजे आहे? तसेंच हे प्रिये ! ज्या त्वां राजमंदिरास विभूषित करावें, त्या तुला एकीकडे राहून या गोपकन्यकासमाजांत कसें समाधान वाटेल ?

**मुक्ता०**—उगीच आपलें मला हरभऱ्याच्या झाडावर चढवायचें ! ही मी आपली जातें. किती वेळ आपण बोलत आहां तरी? हे काय ह्मणतील तरी ?

**कम०**—कांहीं नाहीं ह्मणत. पण आज कीं नाहीं प्रिये ! सर्व अवस्थांमध्यें तुझ्या रूपाची चारुता दिसून येते! जी जी कृति करितेस, ती मागचीला मागें टाकते !

सवई.

बोल तुझे अति गोड सखे, मज वाटतसे, विरमोत न ते!
कोकिल यासम काय करीलहि गान वसंतसुहृद्दयिते !
चालशि तूं जरि,हंस तुझी मदखेलगती अनुकारि कशी!
सर्वहि मानसहारि! कृती तव काय नसे प्रिय सांग मशी?

**मुक्ता०**—असें भलतें सलतें ह्मणूं नये ! मी का रंभा का मेनका, कीं आपण असली स्तुति करावी ? मला हिणवावें, असा तर नसेलना आपला भाव ? पण मी चुकलें. आपल्या सारखे थोर पुरुष गरीबाला हिणवीत नाहींत. तेव्हां इतकेंच ह्मणायचें कीं कामिजनाला आपल्या प्रियवस्तूचे दोष दिसत नाहींत.

**कम०**—एकूण कामिजन अंध असतो ? छे! त्याची दृष्टि फार तीक्ष्ण असते. खरा मर्मज्ञ कामिजन होय. इतरांस जें सौंदर्य समजत नाहीं, व ज्याची त्यांस पारख नाहीं, असें सौंदर्य त्यासच दिसतें.—बरें, तें असो. चल ! आपण चक्रवाकमिथुनाप्रमाणें एकत्र विहार करूं !

**मुक्ता०**—चक्रवाकांचें नांव नका काढूं ! तें नांव घेतलें ह्मणजे पोटांत धस्स होतें.

**कम०**—तें का बरें ?

**मुक्ता०**—सूर्य अस्तास गेला ह्मणजे त्यांचा विरह होतो, आणि मग दोघेंही रात्रभर विलाप करीत असतात.

**सुध०**—( स्वतःशीं ) काय चमत्कार पहा ! नीच कुळांत मी

श्लोक.

न पूर्वी अशी गोमटी देखियेली !
कशी नीच वंशांत जन्मास आली ?
कृती, रूप, सारें इचें दाविताहे
जगीं धन्य ऐशा कुलीं जन्मली हे !

**सत्य०**—तो तिच्या कानांत कांहीं गोष्ट सांगतो आहे, तेव्हां तिची मुखचर्या पहा कशी खुलत आहे ! हें पाणी कांहीं निराळेंच आहे! ही गोपकन्या दुसरी राधा नसेलना ?

**वेड्या**—चलारे गड्यांनो ! आपण टिपऱ्या खेळूं. आतां उगीच वेळ घालवूं नये. चला.

( गोप आणि गोपांगना टिपऱ्यांचा रास खेळतात. )

**सुध०**—( गोपाळास उद्देशून ) काय हो बाबा ! तुमच्या कन्येच्या जवळ खेळत आहे, तो तरणा मुलगा कोणाचाहो ?

**गोपा०**—याला " गोविंदा " असें ह्मणतात. त्यानें मला सांगितलें आहे कीं " माझें गोधन फार मोठें आहे. मी कांहीं त्याविषयीं कोणाला विचारिलें नाहीं. पण माझी खातरी आहे कीं तो कधींही खोटी गोष्ट सांगणार नाहीं. त्याचें प्रेम माझ्या कन्येवर बसलें आहे. मीं पुष्कळदा पाहिलें आहे कीं, ती कांहीं काम करीत असली, कीं त्यानें एकसारखें तिजकडे पाहत बसावें, आणि आनंद मानून घ्यावा. माझ्या कन्येचेंही प्रेम त्याजवर आहेसें वाटतें. खरेंच पहातां, तू कोणाचें प्रेम कोणावर अधिक आहे हे मला कांहीं सांगतां येणार नाहीं. मला तर वाटतें दोघांचेंही प्रेम एकाकार झालें आहे.

**सत्य०**—तिला टिपऱ्या चांगल्या खेळतां येतात.

**गोपा०**—अहो ! तिला काय चांगलें येत नाहीं ? सर्व कांहीं तिला करितां येतें. आपली कन्या ह्मणून मी तिची वाखाणणी करितों असें नाहीं. जोडा मोठा चांगला आहे. जमलें तर लग्नांत गोविंदाला मी अशी करणी करीन कीं तशी त्यानें स्वप्नांतही पाहिली नसेल.

( गोपाळाचा सेवक येतो. )

**सेवक**—महाराज ! बाहेर एक कोमटी आला आहे, तो काय पण चांगला गातो ! त्याच्या गाण्यापुढें आपला पोवा एकीकडेच ठेवला पाहिजे. त्याचें गाणें इतकें गोड आहे कीं त्याच्या भोंवती सगळे लोक जमले आहेत.

**वेड्या**—वाः ! ही तर दुसरी एक मौज आली ! जा जा त्याला लौकर घेऊन ये. आपणाला तर बोवा लावणी न् पदें फार आवडतात. त्याचा गोड गाणीं येतात का ?

**सेवक**—येतात ह्मणजे ! सर्व कांहीं येतात. सर्वांना आवडतील अशीं तो गाणीं ह्मणतो. त्याजवळ विकायच्या वस्तु आहेत, त्यांवर तर त्यानें किती गाणीं रचलीं आहेत ! बायकांचीं गाणीं ह्मणतो, लावणी ह्मणतो ! पण त्यांत कांहीं घाणेरडें नाहीं. हा मोठाच चमत्कार ! तें श्रावणाचें गाणें त्यानें ह्मटलें तें किती पण गोड ! मी तर तें ऐकून रडायलाच लागलों ! तसेंच तें सुलोचनेचें !

**सुध०**—तर मग हा कोमटी विलक्षणच आहे.

**वेड्या**—तूं तर त्याची मोठीच वाखाणणी करितोस. पण कोमटी आहे ह्मणतोस, तर त्याजवळ कांहीं विकायच्या वस्तु आहेत का ?

**सेव०**—हे काय पुसावें महाराज ! सर्व प्रका-

रच्या वस्तु त्याजवळ आहेत. कांगद्याचे खण आहेत; गुंड्या आहेत; रांगोळी आहेत; तबकें, अपकरे, आरसे, झाऱ्या, डब्या, हस्तिदंती फण्या—सर्व कांहीं आहे. एक एका वस्तूवर त्यानें गाणेंच रचलें आहे.

**वेड्या**—मग जाच तर, आणि त्याला येथें घेऊन ये, आणि सांग कीं, गात गात ये ह्मणून!

**मुक्ता०**—भाऊ! त्याला सांग अं? भलतें सलतें येथें कांहीं गाऊं नको ह्मणून?

**वेड्या**—ताई! हे कोमटी असलें भलतें सलतें नाहींहो गात. त्यांचें गाणें कधीं तूं ऐकलें नाहींस? बघ तर आतां, कसें गातात तें!

**मुक्ता०**—असेल चांगलें तर ऐकेन, नाहीं तर मी आपली दुसरीकडे जाईन.

( कुटिल गात येतो. )

कटाव.

घ्याहो घ्याहो या बहु सुंदर वस्तु, कशास धरितां किंतू?
पूजेकरितां लहान थाटी, नैवेद्याचा तेशी व टा,
स्नान निरंजन, घंटा मोठी, ओवाळाया ही हलकाती
पीणें होते इच्छापूर्ति; कमळदळांच देवाकरितां
लहान मोठें येतें करितां उदबत्तीचें घर हें साचें,
अति गमतीचें, बहु मोलाचें; सुंदर दिसतें तबक फळांचें,
कसे यांत हे परोपरीचे, वेल काढिले गुच्छ सुमनांचे;
पाहिजेत हीं जरि बायांला, जुन्या पुराण्या त्या कुणाच्यांना,
बासन सोडुनि काढयाला, उशिर जाणें, परताच यावें,
आवडते ते पदार्थ घ्यावे; ना तरि त्यांनीं हट्ट करुनी,
रुसुन बसुनी, लगबग करुनी, चार पांच त हान पतीला,
मागुनि घ्यावे मजला द्यावे, मग पुरवाने सकलहि अपुले हेतु
घ्याहो घ्याहो या सुंदर वस्तू० १.

**वेड्या**—मीं आपल्या ताईला बिलोरी बांगड्या द्यायचें कबूल केलें आहे, तसाच हा डबाही द्यायचें कबूल केलें आहे. नाहीं तर मीं कांहीं विकत घेतलें नसतें, आणि मग तुला तसेंच जावें लागतें.

**ह्माळ०**—जेव्हां तेव्हां आपलें धन्यांना मिळतें. मेली माझी पाळी कधींच नाहीं यायची? त्यांना द्यायचें तरी किती पण?

**वेड्या**—मी तिला देतों, ह्मणून तुला कां वाईट वाटतें? ती लहान आहे. तिची हौस पुरविली पाहिजे.

**ह्माळ०**—हं. पुरवा त्यांचीच हौस! मेलें एकादे वेळेस मागितलें तरी येथें थोडेंच देणें होत आहे!

**वेड्या**—काल त्या लुच्चानें माझा खिसा कातरला ह्मणून सांगितलेंना? नाहीं तर आज तुझीही हौस पुरविली असती. पण ही वेडी कशी पहा तूं! आपल्या येथें इतकी मंडळी जमली, आणखी त्यांच्या देखत अशी तूं हट्ट घेऊन बसणार का? ह्मणायचेंच होतें तर दुसरी एकादी नव्हती का वेळ? का सर्व गांवभर दांडोरा पिटविला पाहिजे? हें एकपरी बरें झालें कीं, सध्यां इकडे कोणाचें लक्ष नाहीं.—बाबा आणखी हें काय बरें बोलताहेत? पण तें असो. आतां तरी तोंडातून ब्र काढूं नको. चल जा कशी येथून! तुला काय पाहिजे तें सांग, उद्यां घेऊन देईन!

**ह्माळ०**—मी नाहीं ऐकायची! मला आतां दिलेंच पाहिजे. आतां कोमटी अनायासें आला आहे तो फिरून का येणार आहे?

**वेड्या**—बायका मोठ्या हट्टी असतात, त्यांच्या पुढें पुरुषांना हातच टेंकावे लागतात.—बरें कायरे ए कोमटी! तुजजवळ काय काय आहे? दाखीव पाहूं?

**कुटि०**—ही पहा हस्तिदंती फणी आहे. इचे दाते पहा कसे नामी कातलेले आहेत!

**झाळ०**—हं! ही मला पाहिजेच. नाहीं तर काय मेल्या लांकडाच्या फणीनें अक्षयीं केंस विचरावे?

**कुटि०**—हा कुंकवाचा करंडा! यांत आरसा आहे! मेण ठेवण्याची डबी! आणखी या बाजूला शेंदूर ठेवण्याकरितां घर केलें आहे!

**झाळ०**—हा तर पाहिजेच. पहा एका करंड्यांत बायकांचें सगळें सामान राहतें! कसा चांगला आहे पण हा!

**कुटि०**—या पहा गौरीच्या गळ्यांत घालण्याकरितां केलेल्या माळा!

**झाळ०**—अग बाई! किती चांगल्या आहेत या? याही पण घ्या.

**वेड्या**—तुझें काय जातें दाखवायला? पण आह्मांला काहीं पाहिलें पाहिजेना? चल या आणखी जिनसांचें काय घेशील? एक सांग.

**कुटि०**—कांहीं फार नाहीं महाराज! सारे दोन होन!

**वेड्या**—अरे, पण तुला चांगलीं गाणीं येतात ह्मणून ऐकलें, तसेंलें एकादें ह्मण पाहूं.

**कुटि०**—बरें, तर ह्मणतों. या गाण्यांत कृष्णाचा आणखी सत्यभामेचा संवाद आहे.

गाणें.

रुसलिस भामे! मजवरि अजि कां उत्तर दे गे मला,
दुरुक्तें कोण तुला बोलला? (धृ०)
तव वदनेंदू म्लानत्वानें कैसा हा पावला?
कबरीपाश कसा सुटला?
नेत्र किती आरक्त तुझे जाहले!
हा थरथर अधरोष्ठ सखे का हले?
उच्छ्वास तुझा दावी मन कोपलें,
तुजला पाहुनि कष्टी ऐशी, हा जन गहिंवरला,
दुरुक्तें कोण तुला बोलला? १.
ऐसे पुसानी वदते भामा "श्रीहरि! तूं ठक मला,
प्रणयरे सांग कसा लोपला?
मोहक वचनीं साधा भोळा हा जन विश्वासिला,
यांतरे काय निधी लाभला?
तुजवरी ठकारे न विश्वास योग्य तो,
कोण तुला कापट्य असें शिकवितो?
तव मिष्टपणा हा मान कशी कांपितो?
जारे! येथुनि दुःखावरती देशी डागच मला,
ह्मणुनि हा तुजवरि जन कोपला २.

**वेड्या**—हें गाणें मोठें चांगलें आहे. अशींच दुसरीं तुला येतात?

**कुटिल**—अशीं पुष्कळ येतात.

**वेड्या**—तर चल मग आपण एकीकडे जाऊं. तूं ह्मण आणि मी ऐकत बसेन. आमचे बाबा या नवीन आलेल्या गृहस्थांशीं अद्याप बोलतच आहेत. तेव्हां त्यांना आपण त्रास देऊं नये! चल. आणखी मघां दाखिवलेल्या वस्तुही घेतां येतील. चला! (झाळ्सेस) तूंही आंत चल, तुझाही हट्ट पुरवलाच पाहिजे.

**कुटिल**—(एकीकडे) या हट्टातच काय मला प्राप्ति मिळायची ती! (गातो.)

गाणें.

करंडा कुंकवाचा, फारच खासा सांचा,
घ्याहो या बायांनो! १.
पुजेचें साहित्य, जरि कां लागे नित्य,
पुसा या कोमट्याला. २.
आरसा भिंगाचा, वेणिफणि करायचा,
पाहिजे तरि घ्याहो! ३.
मुलांचीं खेळणीं, हातिं खुळखुळ रिंगणीं,
मुलांना द्याना कां? ४.
दामाजि चाकर, करितोचि कारभार,
झाला कां सांगाना? ५.
उशीर काशाला? ऑणॉलवकर् डॅमॉजीला,
इच्छा मी पुरवीतों! ६.

(वेड्या झाळसा आणि कुटिल जातात.)

(सेवक येतो.)

**सेवक**—महाराज ! गोंधळयांना आतां बोलावूं का ? ते ललीत मोठें चांगलें करितात.

**गोपाळ**—एवढा वेळ थोडा का गोंधळ झाला ? आतां कांहीं नको. हे आमचे पाव्हणे कंटाळले असतील.

**सुध०**—आह्मांला हो कसला कंटाळा ? नुसतें पहायचें. होऊंद्या तर ललीत !

**सेवक**—कसें पण चांगलें करितात ललीत ! राजवाड्यांत रामनवमीच्या उत्साहांत यांनीं पुष्कळदा ललीत केलें आहे, आणि महाराजांपासून इनामें घेतलीं आहेत.

**गोपा०**—उगीच वटवट कशाला करितोस ? घेऊन ये. यांना आवडतें आहे, मग माझें काय जातें ?

( सेवक जातो आणि गोंधळयांना घेऊन येतो. ललीत होतें. सुधन्वा आणि गोपाळ यांचें एकीकडे भाषण चालतें. )

**सुध०**—बाबा ! हें तुह्मांला पुढें कळून येईल. ( एकीकडे ) कमलाक्षाची प्रीति इजवर फार तर नाहींना बसली ?—बसलीसें वाटतें !—छे ! हें उपयोगी नाहीं ! त्याला इजपासून दूर केलें पाहिजे. हा वृद्ध गोप भोळसर—यानें सर्व मजकूर सांगितला ! ( कमलाक्षाकडे पाहून ) कसें काय ? तुह्मीं तर आपल्याच सुखांत निमग्न आहां ! तुमच्या प्रियेवांचून तुह्मांला दुसरें कांहींच दिसत नाहीं ! तुमचा सर्व आनंद काय तो ती होऊन बसली आहे ! पण मला तर मोठा चमत्कार वाटतो ! कारण पहा तिला तुह्मीं कांहीं दागिने दिले नाहींत, किंवा तिला आवडत्या अशाही कांहींच वस्तु दिल्या नाहींत ! मघांशी तो कोमटी आला होता, त्यापासून तरी कांहीं चिजा घ्यायच्या होत्या ! पण त्याला तसेंच जाऊं दिलें ! समजा, तुमची प्रिया हट्ट घेऊन बसली, तर मग तिची समजूत कशी पाडाल ?—अर्थात् तिच्या प्रीतीची तुह्मांला गरज असेल तर हो !

**कम०**—अहो बाबा ! तुह्मीं ह्मणतां ही गोष्ट माझ्या प्रियेस लागू नाहीं. ही साधारण पोरींप्रमाणे कधीं हट्ट घेऊन बसणारी नव्हे. तिला या असल्या क्षुल्लक चिजांची आवड नाहीं. कारण काय ह्मणाल, तर

श्लोक.

जो पदार्थ तिजला प्रिय आहे,<br>
तो मदीय हृदयांतरिं राहे !<br>
तो जरी न अजुनी दिधलासे,<br>
योजिला तरिहि तत्पददासें !—

हें बघ प्रिये ! या वृद्ध बावांच्या देखत माझ्या मनांत काय आहे तें सांगतो. हे वृद्ध आहेत, तेव्हां यांना सर्व गोष्टींचा अनुभव आलाच असेल ! यांच्या वयाकडे पाहून मला यांस मान द्यावाच लागतो. तेव्हां यांच्या समोर खोटें बोलेन असें नाहीं !—

**सुध०**—हुं बोला ! ऐकूं तर द्या काय ह्मणणार तें ? पाहूं तुमच्या प्रियेला हें कसें आवडतें ?

**कम०**—हें पहा !

श्लोकार्ध.

हस्तिदंत गौर, कीं तुषारकांति, हे प्रिये !<br>
हा त्वदीय हस्त मी करीं धरीन निश्चयें !

**सुध०**—पण हा निश्चय अक्षयीं राहील याला प्रमाण काय ? हें सर्वांसमक्ष तुह्मीं सांगाल काय ? या आमच्या मित्रासमक्ष ?

कम०—अहो! प्रमाण कशाला पाहिजे? माझें वचन हेंच प्रमाण! असा ते भिये! प्रमाण पाहिजेच असेल, तर

शाकाचें श्लोक

साक्षि हे असोत वृद्ध, ... असो धरा,
सूर्यचंद्रतारकां विनीत जोडतां करा!

फार तर काय सांगूं? पण

श्लोक.

माझी होय जरी समुद्रवलया पत्नी समग्रा मही,
मातें वित्त तसा जरी धनद[1] दे तो आपुलें सर्वही;
विद्या गीष्पती[2] दे, सुलक्षधन दे मातें रतीचा पती,
यांहीं मी न तसा, जसा वदलियां होईन ईतें कृती!

सुध०—आतां कांहीं संशय उरला नाहीं!

सत्य०—ही खरी प्रीति!

गोपा०—पण माझे लाडके! तुझें काय ह्मणणें आहे?

मुक्ता०—बाबा! मलाहो काय पुसतां? आह्मांला पुरुषांप्रमाणें बोलून नाहीं दाखवितां येत!

गोपाल—हें एवढ्यावरून समजलें! कांहीं हरकत नाहीं! अहो जांवईबोवा! आतां जांवई ह्मणावला कांहीं हरकत नाहीं.—मुलगी फार चांगली आहे बरें! वागवून घ्या हिला!—(सुधन्वा आणि सत्यव्रत यांस उद्देशून) चला, तुह्मां समक्ष मी सांगतों कीं, यांना मी आपली कन्या देईन, आणि आंदणही पण देईन! मजजवळ कांहीं कमी नाहीं!

कम०—अहो, थोडें कां असेल? सद्गुणधन लहान नाहीं! असो—(मनात) या वृद्ध बोवाला ठाऊक नाहीं कीं मी राजपुत्र आहे!— उ.ड; बरं, तर आपला हा निश्चय कायम राहील ना?

गोपा०—राहील म्हणजे?—बरें मुली! इकडे ये अशी! बघूं कसा जोडा जमतो तो?

सुध०—थोडे दम खा वृद्धबोवा!—कायरे बाबा! तुझा पिता जिवंत आहेका?

कम०—हो, आहे! मग?

सुध०—आणि त्याला हें ठाऊक आहे काय?

कम०—नाहीं, आणि त्याला समजूंही द्यायचें नाहीं पण!

सुध०—असें कां बरें? लग्नाच्या कामांत आणि त्याचें मत घेऊं नये ह्मणजे? बरें तुझा बाप इतका का वृद्ध आहे कीं, त्याच्या बुद्धीला भ्रंश झाला आहे तो वेडे चाळे करायला लागला आहे? त्याचे कान गेले? डोळे गेले? त्याला कांहीं समजत नाहीं? अगदीं अंथरुणाला खिळला आहे? त्याला व्यवहारांतलें कांहीं गम्य नाहीं? — सारांश बाल्यावस्था त्यास पुनः प्राप्त झाली आहे काय?

कम०—छेः, तसें कांहीं नाहीं. त्यांच्या वयाच्या मानानें त्यांच्या अंगांत शक्ति पुष्कळ आहे.

सुध०—असें जर आहे, तर मग त्यांचा अपमान नाहीं का होत?— हें पहा. पुत्रानें बायको पसंत करावी हें खरें, पण ज्याची आपल्या पुत्राच्या कल्याणावर केवळ दृष्टि असते, त्या पित्याचा या कामांत रुकार असावा हेंही खरें!

कम०—हें खरें. पण तशींच कांहीं कारणें आहेत तीं कांहीं मला तुह्मांला सांगतां येत नाहींत. कारण कीं यावद्दल पित्याजवळ मला गोष्ट काढतां येत नाहीं.

सुध०—बाबा! असें नव्हे. वडिलांना विचारल्याशिवाय असें कांहीं करूं नये.

१. कुबेर. २. बृहस्पति.

**कम०**—पण मी नाहीं त्यांना ही गोष्ट कळविणार!

**सुध०**—छेरे! कळीवच!

**कम०**—ती गोष्ट कधींही व्हायची नाहीं!

**गोपाळ**—आणि असा कां बरें हा दुराग्रह जांवई बोवा? मला नव्हतें वाटलें कीं पित्याला विचारल्यावांचून आपण ही गोष्ट करालशी! मला तर वाटतें तुमच्या पित्याला ही गोष्ट कळविली तर वाईट नाहीं वाटणार! तुमची निवड त्यांना आवडेलच!

**कम०**—पण नाहीं त्यांना सांगायचें.—हा संबंध तुह्मी करणारना?

**सुध०**—पाहूं द्या बरें हा संबंध कोण कसा करतो तें? आह्मी तर हा संबंध तोडणार! (वेष टाकून) दुष्टा! तुला पुत्र करा ह्मणूं?—इतका नीच कीं माझा असें तुला कदापि ह्मणतां येत नाहीं!—ज्या तुझ्या हातीं राजदंड यावयाचा त्या तुला गुराख्यांची काठी आवडली अं?—अरे ह्मातार्‍या! तुला या वयांत हे असले ढंग सुचतात काय? तुला सुटीं चोंचे, पण अर्थ नाहीं! तूं थोड्या दिवसांचा सोबती आहेस!—परंतु हे तरुण मोहिनी! तुला माहीत असलें पाहिजे कीं, ज्याला तूं मोहिलें तो राजपुत्र होता ह्मणून?—

**गोपाळ**—हायरे कर्मा!

**सुध०**—मूर्खे! कुटिले! तुझें हें सुंदर मुख विरूप करून टाकतों पहा! कीं पुनः असलें कौटाळ करशील कीं नाहीं!—हे मूर्खा! या सुंदर कन्येची आशा सोड. तुझ्या हें पक्कें ध्यानांत असूं दे कीं, तुझ्या घ[illegible] तुला जाऊं देणार नाहीं. आणि जर का तुला याबद्दल वाईट वाटेल, तर लक्षांत ठेव कीं, तूं माझा नाहीस आणि मी तुझा नाहीं! आणि मग माझ्या मागें हें तुला राज्य राहूं देईन अशी आशा धरू नको! हे माझे शब्द लक्षांत ठेव. चल येथून!—ह्मातार्‍या! या वेळीं मला फार राग आला आहे, तरी तुझी गय करितों.—हे मोहिनी! एकाद्या गोपाला तूं चांगली शोभशील! खरेंच, तुझें हें सौंदर्य राजकुलालाही शोभणारें आहे—पण इतकेंच कीं—तूं गोपकन्या आहेस! असो—तूंही पक्कें समज कीं पुनः तूं जर आपल्या घरीं याला येऊं देशील, आणि याचें मन मोहूं पाहशील, तर मग तुझ्या सौंदर्याकडे पाहणार नाहीं! तूं स्त्री आहेस याचा विचार करणार नाहीं! आणि एकदम तुझा वध करीन! (जातो)

**मुक्ता०**—झालें! शेवटीं देवानें आपलें खरें केलें! मला कांहीं फारशी भीति वाटली नाहीं. एकदा दोनदां आलें होतें मनांत कीं बोलावें ह्मणू! ह्मणणार होतें, 'महाराज! चंद्र सर्वांवर सारखाच प्रकाशतो. राजवाड्यावरच तेवढा प्रकाश पाडतो, आणि गोपाच्या खोपटीवर पाडीत नाहीं, असें नाहीं'—(कमलाक्षास उद्देशून) आपण आतां आपल्या वाड्यांत जावें. मी नव्हतें ह्मणत कीं शेवटीं या थरावर येईल ह्मणून! आतां माझी एवढीच विनंती आहे कीं मजकरितां आपलें राज्य गमावूं नका. मी आतांपर्यंत राजाची सून मानून घेत होतें तेवढ्यानें माझी तृप्ति झाली. आतां तें राज्य नको आणि कांहीं नको. माझ्या गाईच मला आतां ह्मणावें झालें.—देवा! शेवटीं असें व्हावेंना!

**अल्प०**—काहो दुर्दैवा! हें कसें काय? तुमचें

काय ह्मणणें आहे? सांगा! नाहीं तर फुकट पेंचांत याल!

गोपाळ—मला कांहीं पुसूं नका! मला ठाऊक आहे तें बोलवत नाहीं! महाराज! (राजपुत्रास उद्देशून) या ऐंशीं वर्षांच्या ह्मातार्‍याच्या तोंडास काळोखी लागली! मनांत होतें कीं सुखांत डोळे मिटतील! —कुळांत कोणाचा नाहीं अंत झाला, तो माझा होणार! असो; प्रभूची इच्छा! —(मुक्तावलीस) हा कारटे! तुला ठाऊक असून तूं या राजपुत्रावर प्रेम ठेवलेंस अं?—झालें! आतां काय राहिलें? आतां जर देव डोळे झांकील तर मिळविली! (जातो.)

कम०—कांहो तुह्मांला इतकें कां वाईट वाटतें? मी असा डगमगणारा नाहीं. आज नाहीं उद्यां? असें समजूं नका कीं, महाराजांच्या बोलण्यानें माझें मन फिरेल!

श्लोक.

दृढ निश्चय सांच असे मम!
जरि फिरे, तरि मी अधमाधम!
जरि उंचहि पर्वत टाकला,
तरि न ओघ धरी पथ मागला!

या माझ्या प्रणयाला या ओघाचीच उपमा साजेल! पहा!

श्लोक.

येतां पर्वत आडवा क्षण जसा नद्योघ तो कुंठतो,
तैसा तातवचें मदीय मनिंचा प्रेमौघ हा थांबतो!
वेगें सागरसंगमार्थ गिरितें टाळूनि जाई जसा,
विघ्नांतें अवमानिल प्रणय हा प्राप्त्यर्थ ईच्छ्या तसा!

सत्य०—अहो आर्य! आपणास महाराजांचा स्वभाव पूर्णपणें अवगत आहे. आतां ते कोणाचेंही ऐकणार नाहींत! आणि आपण त्यांच्या जवळ या वेळीं रदबदली करायला जाऊंही नये! यावेळीं आपली भेट घेतील कीं नाहीं, याचा संशयच! तेव्हां त्यांची चित्तवृत्ति स्थिर होई तोंपर्यंत आपण त्यांच्या दर्शनास जाऊं नये हेंच उचित!

कम०—माझाही विचार तसाच आहे. आपण सत्यव्रत नव्हेका?

सत्य०—होय, मीच तो, आर्य!

मुक्ता०—मीं कितीदा बरें आपणाला सांगितलें होतें कीं याचा परिणाम हा असाच होईल ह्मणून? कितीदा ह्मटलें होतें कीं, 'मी राजाची सून कोठपर्यंत? दुसर्‍यांना कळलें नाहीं तोंवर!'

कम०—अजूनही कां नाहीं होणार? अजूनही तूं राजाची सून होशील! माझें वचन मोडेल हें तर बोलायलाच नको. कारण एकवेळ आकाश खालीं येईल, पण माझें वचन मोडणार नाहीं! तर हे प्रिये! अशी कष्टी होऊं नको! धीर धर!—बाबा! तुह्मीं मला राज्य ठेवणार नाहीं? कांहीं हरकत नाहीं! राज्य घेऊन माझी प्रिया जर मला अंतरते, तर नको तें मला तुमचें राज्य! माझी प्रियाच मला पाहिजे!

सत्य०—आर्य! कांहीं विचार करा!

कम०—अहो सत्यव्रत! यावेळीं आह्मांसारख्यांना विचार कोण शिकवितो हें ठाऊक आहे?

श्लोक.

विकलित जधिं होते सर्व ती चित्तवृत्ति,
अशरण न चले ही इंद्रियांची प्रवृत्ति,
युवतियुवजनातें काम दावी पथातें,
वरिति सकळ त्यातें टाकुनी संशयातें!

सत्य०—आर्या! हे अति झालें!

१. नदीचा प्रवाह.

कम०—अति ह्मणा कांहीं ह्मणा, आहे पण खरें! आपलें वचन मिथ्या होऊं देणार नाहीं तरच मी कमलाक्ष!—अहो सत्यव्रत! माझें पहा,

श्लोक.

न राज्याच्या लोभें,नचि विभवलोभें मन भुले!
धरा ठेवी पोटीं अतुल धन तेणें नच खुले!
समुद्रीं रत्नांचे विफल असती तेहि निकर,
प्रियेचा लाभे हा मज जरिहि तोषप्रद कर!

ह्मणून मी सांगतों एवढें करा. आपण ताताचे प्रिय करणारे आहां, आणि तातमहाराज आपणास बंधुप्रमाणें मानतात, तेव्हां इतकें करा कीं, मी येथून गेलों असें समजल्यावर त्यांचा कोपाग्नि प्रदीप्त होईल तो शांत करावा! मी येथून जाणारच! मी आहें आणि दैव आहे! पाहूं कसें काय होतें तें! मी आपणाला इतकें सांगतों, आणि महाराजांनाही आपण हें कळवावेंच कीं, "ज्या अर्थीं आपण आपल्या पुत्राचा आणि त्याच्या प्रियेचा विवाह होऊं देत नाहीं, त्या अर्थीं तिला घेऊन तो समुद्रमार्गें देशांतरीं गेला!" —आणि दैव या वेळीं मला कसें अनुकूल आहे पहा! एक तारूं आतां बंदरांत आलें आहे, त्यांत बसून आह्मी जाऊं. मी आतां कोठें जाणार हें सांगण्यापासून तुह्मांला कांहीं फायदा नाहीं, मग उगीच सांगावें तरी कशाला?

सत्य०—आर्य! आपण कोणाचें ऐकत नाहीं, हें कांहीं बरें नाहीं! आपण थोडे मोठे असतां, ह्मणजे मग दुसऱ्याला सांगायची जरूरी नसती! तर एवढें माझें ऐकावेंच!

कम०—सत्यव्रत! एव्हां नाहीं! पुढें एकादे दिवशीं ऐकेन!—प्रिये! तुला कांहीं सांगायचें आहे! इकडे ये पाहूं? (दोघे एकीकडे जातात.)

सत्य०—राजपुत्र दृढ निश्चयाचा दिसतो! तो येथून पळून जाणारच, तेव्हां आतां काय करावें? (विचार करून) हं ठीक आहे! ह्मणजे हा भलतीकडेस जाणार नाहीं! त्यालाही बरें वाटेल, आणि माझ्या मनांतील फार दिवसांचा हेतु—तोही सिद्धीस जाईल! माझ्या जन्मभूमीचें आणि दुःखानें पोळलेल्या पूर्व स्वामीचें दर्शन घेतां येईल!

कम०—अहो सत्यव्रत! आतां बोलायला मला अवधि नाहीं इतकें काम निकडीचें आहे, तेव्हां येतों! मीं सांगितलेलें तेवढें लक्षांत असूं द्या ह्मणजे झालें! (जाऊं लागतो.)

सत्य०—महाराज! माझी आपल्या तातावर भक्ति आहे, आणि त्यांचें थोडें बहुत मीं कार्य केलें, याविषयीं तुह्मीं ऐकिलेंच असेल!

कम०—खरेंच, तुमचे उपकार त्यांवर फार फार आहेत! ते स्मरतात, पण फेड करण्याकडे कांहीं लक्ष देत नाहींत!

सत्य०—बरें, आतां आपणाला जर वाटत असेल कीं माझी भक्ति महाराजांवर आहे,—आणि महाराजांवर आहे तर त्यांचे निकटसंबंधी आत्मज जे आपण त्यांवरही आहे,—तर माझी एवढी विनंती ऐकून तरी घ्यावी!—पण दूरवर विचार करून ठरविलेला आपला बेत फिरवितां येईल तर हो!—आपण येथून जातांच, तर मी सांगतों त्या-

१. समुदाय.

ठिकाणीं जा ! तेथें आपला चांगला आदरसत्कार होईल ! प्रियेला आपण सोडून जावें असें नाहीं ! तर

श्लोक.

घेउनि बाळी शीघ्र चलावें,
जाउनि तेथें स्वस्थ रहावें,
दाविन जो तो मार्ग धरावा,
हेतु मनींचा पूर्ण करावा !

इकडे मी स्वस्थ बसेन असें समजूं नका ! आपल्या तातांची चित्तवृत्ति प्रसन्न करण्याची तजवीज करीन ! त्यांना सांगेन कीं आपल्या सुतानें

श्लोकार्ध.

जी कन्या[1] वरिली मनें, तिजाविणें त्यातें न होई सुख !
नोहो[2] उद्वह[3] हा, अनर्थ तरि कीं राहे कुळासंमुख[4] !—

येणें करून

बाकीचें श्लोकार्ध.

यत्नें भूपतिचें करीन, समजा, बोधामृतें सांत्वन !
काळें आत्मसुतीं फिरेल जनकप्रेमौघ तो काय न ?

**कम०**—**सत्यव्रत** ! ही अघटित घटना दिसते ! होईल कशी ? तुह्मीं जर ही घडवून आणिली, तर तुह्मीं लोकोत्तर आहां असें ह्मटलें पाहिजे ! आणि मग तुह्मांवर पाहिजे तें काम सुखेंकरून सोंपवावें ! कांहीं हरकत नाहीं !

**सत्य०**—आपण कोठें जाणार याचा कांहीं विचार केला आहे काय ?

**कम०**—अद्यापपर्यंत तर नाहीं ! आणि विचार कसला करायचा आहे ? आह्मीं दैववादी झालों ! दैव दाखवील तो मार्ग धरायचा ! कारण पहा,

श्लोक.

दैवाची गति ती विचित्र असते, कोणासही नाकळे !
येई विघ्न जसें अतर्कित, तसें त्याच्या प्रभावें पळे !
जें जें कर्म करी मनुष्य अवघें तें दैवयोगें खरें !
येतां संकट याकिजे विधिवरी विश्वास सुज्ञें नरें !

**सत्य०**—असें करणें ठीक नाहीं ! मज्ह्मातार्‍याचें ऐका ! आपण आपला पळून जाण्याचा बेत रहित करीत नाहीं, तर असें तरी करा ! **सिंहलद्वीपास** जा ! या आमच्या बाईसाहेब झाल्याच आतां, तेव्हां यांना बाईसाहेब ह्मणण्यास हरकत नाहीं ! याकरितां आपण या आमच्या बाईसाहेबांना घेऊन **चंद्रकांत** महाराजांना भेटायला जा ! अर्थात् राजवधूप्रमाणें यांचा पेहेराव असला पाहिजे ! ह्मणजे भलताच संशय कोणी घेणार नाहीं. आपण **चंद्रकांत** महाराजांना भेटायला गेलां, ह्मणजे त्यांना किती ह्मणून आनंद होईल पण ? आपल्या प्रिय मित्राचा सुत आला हें हें पाहतांच, आपणाला

श्लोक.

गाढालिंगन तो करी नृप, शिरोवघ्राण घेई तसें,
नेत्रीं आणुनि अंबु, वृत्त इथलें सारें तुह्मांला पुसे,
“ घालावा अपराध सर्व उदरीं, कीजे क्षमा, भूपते ! ”
मित्राराधन वाटतें नृप करी बोलोनी ऐसें तुतें !

आपली ही वधू पाहून त्यांस हर्ष माईनासा होईल, इला बहुत आशिर्वाद देतील, आणि पुनः पुनः **सुधन्वा** महाराजांस कळवावें ह्मणून ते आपणाला असेंही ह्मणतील कीं,——

श्लोक.

“ मी दुष्ट साच, मजला अनुताप जाळी !
येणेंपरी मति फिरोनि न होय काळी !

---

१. सुंदर स्त्री. २. न होई. ३. विवाह. ४. कुळासमोर.

जें पूर्ववृत्त घडलें, विसराच सारें!
हो चित्तवृत्ति मुदिता प्रणयप्रसारें!"

**कम०**—अहो **सत्यव्रत**! हें सर्व खरें. पण त्यांनीं जर विचारिलें कीं, इकडे आपलें येणें कां झालें, तर मी काय सांगूं?

**सत्य०**—सांगा कीं, आपलें समाधान करावें, सांत्वन करावें, या हेतूनें महाराजांनीं मला पाठविलें आहे! आतां तेथें कसें वागावें, महाराजांनीं सांगितला ह्मणून त्यांना काय निरोप सांगावा,—तो असा पाहिजे कीं त्यांतील गोष्टी फक्त महाराजांना, त्यांना, कीं मला ठाऊक,—त्या सर्वांचें टिप्पण मी आपणाला करून देईन! त्यावरून कोणाच्या प्रसंगीं कसें बोलावें, कसें वागावें, इत्यादि आपणाला कळून येईल—कारण त्यांना संशय येतां नाहीं कामाचा! असेंच वाटलें पाहिजे कीं, हे महाराजांच्या सांगण्यावरून त्यांचें हृद्गतच सांगतात!

**कम०**—खरेंच, तुमचे मजवर फार उपकार आहेत! तुह्मी सांगतां यांत कांहीं सार आहे! हरकत नाहीं तसें करायला!

**सत्य०**—मी जो मार्ग आपणाला धरायला सांगतों, तो बरा आहे कीं नाहीं याचा आपणच विचार करा! आपण—

श्लोक.

नसे नौका नेली गहन जलधीच्या वहनियां!
नसे स्वप्नींही जो परिचित अशा काय विषयीं
मती केली जाया? अवचित कसें संकट न ये?
निवाराया त्यातें कवण? न बरें साहस, अये!

आपणाला वाटत असेल कीं संकटें दूर करण्याला मी समर्थ आहें, पण पहा!

१. देशास. २. (संबोधन) अहो.

श्लोक.

मोठ्या यत्नें जों एक करा दूर,
तों ठाकेही विघ्न दूजें समोर,
नाहीं कैसें ठावकें आपणातें
उत्पादीते आपदा आपदेतें?

आणखी हें लक्षांत ठेवा कीं, सुख सोडून असुखांत कधींही पडूं नये! कारण—

श्लोक.

प्रणयबंधन सांच गमे सुख!
प्रणयलोप असे विपदुन्मुख!
वदनकांति ह्मणीं विपदा हरी,
प्रणयभंग तसा मनिंचा करी!

**मुक्ता०**—"वदनकांति ह्मणीं विपदा हरी" हें असेल कदाचित् खरें! पण ती प्रणयभंग करील, हें खोटें! कितीही दुर्धर संकट येवो, प्रणयांत अंतर कधींही पडावयाचें नाहीं!

**सत्य०**—अहाहा! केवढें प्रबुद्ध हें भाषण! खचित! खचित! गोपालकुलांत असें रत्न दुर्लभ खरेंच!

**कम०**—**सत्यव्रत**! तुह्मांला मी काय सांगूं? आह्मीं मोठ्या कुळांत जन्मलोंना, पण ही आह्मांसही आपल्या प्रौढ भाषणांनीं खालीं पहायला लाविते!

**सत्य०**—यांना घरचें शिक्षण नाहीं, असें कोण ह्मणेल? असल्या घरीं आणि शिक्षण पण नव्हे, हें अंगचेंच वळण आहे! या दुसऱ्यांना शिकवितील!

**मुक्ता०**—असें ह्मणून आपण मला लाजवूं नये पण!

१. उत्पन्न करिते. संकटा (आपदे) पासून संकट उद्भवतें हें आपणास कसें ठाऊक नाहीं असा तात्पर्यार्थ. २. प्रणय=प्रीति. ३. विपदा (विपद्)-विपत्ति.

कम०—हे मनमोहिनी ! मुक्तावलि !—काय माझें भाग्य कीं असलें रत्न माझ्या हातीं लागलें आहे ! पण दैव पहा कसें विचित्र आहे ! असो! सत्यव्रत! तुह्मीं पूर्वी ताताचें संरक्षण केलें. आणि आतां माझें करितां! खरेंच, आमच्या कुलाचें तुह्मीं जीवनौषधि आहां !—तुह्मीं सांगतां हें सर्व खरें, पण मद्रदेशाच्या युवराजाचें जसें वैभव असावें तसें माझें नाहीं! तितका परिजनही मजजवळ नाहीं! तेव्हां राजपुत्र ह्मणून सिंहलद्वीपास जाऊं नये हेंच—

सत्य०—आर्य! पण त्याची काळजी आपण कां वहावी? आपणाला हें ठाऊक असेल कीं, माझी जन्मभूमि ती होय. तेथें माझे इष्ट, मित्र, आप्त, सोयरे सर्व आहेत. तेव्हां आपण तेथें गेलों ह्मणजे आपली राजपुत्राप्रमाणें सर्व व्यवस्था राहील. कांहीं शंका राहिली असेल, तर इकडे थोडे या! मी आपणाला कांहीं गोष्टी सांगतों, त्यांवरून ती सर्व दूर होईल !

(ते एकीकडे जाऊन कांहीं बोलतात.)

( कुटिल येतो. )

कुटिल—वाहवारे वाहवा ! या जगांत भोळसर लोक आहेत, ह्मणून आमची वृत्ति चालली आहे ! खरेंच, भोळेपण कांहीं अमोलिक चीज आहे ! आह्मीं कुटिल नसतों, तर खरोखर मूर्ख ठरलों असतों ! आज पहा आमची कशी चैन आहे ! माझें सर्व सामान खपून गेलें! चित्रें, आरसे, करंडे, फुलें, कातेणीं, गुंड्या,—होतें नव्हतें तें झाडून पार ! काय पण ते माझ्या भोंवतीं मिळाले ! एकादा भाकरीचा तुकडा टाकला ह्मणजे जसे चार रस्त्यांतले सर्व कुतरे जमा होतात, त्याप्रमाणें माझी गत झाली ! पण इतक्या गर्दीतही या स्वारीची दृष्टि सर्वांवर होती! कोणाच्या अंगावर काय आहे, कोठें काय पडलें आहे, कोणाजवळ काय आहे, हें सर्व लक्षांत ठेविलें, आणि वेळ आली तेव्हां साधून घेतलें ! आमचा तो गडी—वेड्या—भला खासा मनुष्य ! वेडाच खरा ! त्याला काय पण तीं गाणीं आवडलीं ! बसला ऐकत ! एकदा ह्मटलीं तरी तृप्ति झाली नाहीं, फिरफिरून ह्मणिवलीं ! आणखी मग काय विचारतां ! माझ्या भोंवतीं मुलांची, मुलींची, बायकांची, पुरुषांची, हीं एकच गर्दी जमली ! आणखी काय पण त्यांचे कान लागले तिकडे ! इकडे कांहीं करा, कोणाला समजतें आहे ! कोणाचा खिसा कातरून घे, कोणाच्या हातांतली पाटली काढून घे, कोणाचें गांठलें कातरून घे ! कांहीं कोणाला शुद्ध नाहीं ! सर्वांचें लक्ष त्या गाण्यांकडे ! एक ह्मणतो "वाः किती गोड गाणें !" दुसरा ह्मणतो "किती मधुर पण आवाज !" एक ह्मणते "मला कोणी हें गाणें शिकवील, तर बरें होईल !" दुसरी ह्मणते "खरेंच गडे, आपण याच्या कडून हें शिकून घेऊं" अशीं त्यांची भाषणें चाललीं होतीं ! आणखी मी आपला उद्योग स्वस्थपणें चालविलाच होता! थोड्या वेळांत सर्वांना बुचाडून घेतलें असतें, पण इतक्यांत तो ह्मातारा आला! ह्मणाला "या माझ्या पोरीनें माझा नाश केला ! कुठली तिला बुद्धि झाली-आणखी कशाला राजपुत्र आमच्या घरीं आला !" असा त्यानें आकांतच केला !

सासरसे माझ्या जाळ्यांत सांपडलेले सर्व पक्षी उडून गेले !

(सत्यव्रत, कमळाक्ष आणि मुक्तावळी हीं पुढें येतात.)

**सत्य०**—पण माझीं पत्रें आपण तेथें जातां तोंच पोंचतील ! तेव्हां हा संशय घ्यायला नको !

**कम०**—आणि तुमच्या पत्रांवरून चंद्रकांत महाराज जीं पत्रें देतील, तीं पाहून—

**सत्य०**—आपल्या तातांचें समाधान होईल !

**कम०**—आपण ह्मणतां तें होईलसें दिसतें आहे ! मग ईश्वर काय करील तें खरें !

**सत्य०**—(कुटिलाकडे दृष्टि जाऊन) हा कोण आहे बरें ? हा बरा सांपडला ! याच्या पासूनही आपणास कांहीं कार्य करून घेतां येईल ! तृणाचाही उपयोग होतो, मग याचा कां नाहीं होणार ?

**कुटिल**—(आपणाशीं) माझें जर बोलणें यांनीं ऐकिलें असेल, तर मग आजच आमची भरली !

**सत्य०**—कांरे बाबा ! असा भितोस कां ? लटलटां कां कांपतोस ? भिऊं नको ! तुला कांहीं कोणी मारीत नाहीं !

**कुटिल**—महाराज ! मी गरीब आहें !

**सत्य०**—खुशाल अस! तुझी गरिबी कांहीं कोणी घेत नाहीं ! पण गरीबीचीं चिन्हें मात्र तुजजवळून हिरावून घेतलीं पाहिजेत ! दे तर आपलीं वस्त्रें काढून, आणि हीं घे या तरूण पुरूषाच्या अंगावरचीं ! कारण विरण कांहीं विचारूं नको ! निमूटपणें दे ! त्यांत तुझें हितच आहे ! वाईट जाऊन चांगलीं मिळतात !

**कुटिल**—नका ! नका ! मला गरीबाला तीं कशाला ?—(एकीकडे) हं: मी तुह्मांला चांगलें जाणतों.

**सत्य०**—अरे ! आटोप भल्या माणसा ! यांनीं आपलीं वस्त्रें बहुतेक काढलीं सुद्धां.

**कुटिल**—तर मग मी आपलीं खरेंच काढूं का ! (एकीकडे) हं: यांतलें बिंग आलें ध्यानांत !

**कम०**—आटप ! आटप लवकर भल्या माणसा !

**कुटिल**—मी गरीब खरा, पण मला कसेंचसें वाटतें !

**सत्य०**—राहूं दे वाटणें एकीकडे ! दे कशीं काढून ! (कमलाक्ष आणि कुटिल एकमेकांचीं वस्त्रें नेसतात.) बाईसाहेब ! म्यांशीं मीं सांगितलें तें कांहीं खोटें होणार नाहीं ! —आपण एकादी आडोशाची जागा पहा, आणि साधा पोशाख करा ! नौकेंत बसेपर्यंत आपणाला कोणी ओळखूं नये एवढ्याकरितां डोक्यावरून तोंडावरून गुरगुटून चौघडी घ्या ! कारण न जाणों, कोणीं तुह्मांला नौकेवर जातांना बघितलें तर एकादा अनर्थ होईल !

**मुक्ता०**—एकून तुमचा कार्यभाग व्हायला माझेंही अंग पाहिजे ?— मला या वेळीं कांहीं सुचत नाहीं ! आपण वृद्ध आहां! मला कन्येप्रमाणें समजा आणि कल्याणाची वाट दाखवा!

**सत्य०**—त्याविषयीं आपण निःशंक असावें! —आटपलें का आपलें ?

**कम०**—आतां तात जरी आले, तरी मला ओळखणार नाहींत !

**सत्य०**—हें ठीक आहे! चला बाईसाहेब!—भल्यामाणसा! तूं जा आपल्या कामाला! आह्मीही जातों!

**कुटिल**—मीही जातों!

**कम०**—प्रिये! काय बरें आपण विसरलों? हें बघ तुला कांहीं थोडें सांगायचें आहे!
(तीं एकीकडे बोलतात.)

**सत्य०**—(एकीकडे) आतां यानंतर माझें काम हें कीं, महाराजांना जाऊन सांगावें हे पळून अमकीकडे जात आहेत ह्मणून! ह्मणजे मग महाराज त्यांना धरण्याकरितां त्यांच्या पाठोपाठ येथून जातील यांत संशय नाहीं! ते गेले, ह्मणजे त्यांच्याबरोबर आह्मीं आहोंच! तेव्हां **सिंहलद्वीपास** आयतेंच पुन: जाणें होणार! माझी ती जन्मभूमि, तिचें पुन: दर्शन घ्यावें अशी माझी केवढी उत्कट इच्छा आहे! विरही पुरुषाचीही प्रियेच्या दर्शनार्थ इतकी उत्कट इच्छा नसेल!

**कम०**—सत्यव्रत! आह्मीं नौकेवर बसायला जातों!

**सत्य०**—जितके लवकर जाल, तितके बरें? ईश्वर तुमचें कल्याण करो!
(कमलाक्ष, मुक्तावली आणि सत्यव्रत हीं जातात.)

**कुटिल**—हं: हं: हें प्रकरण आलें लक्षांत! कुटिल मोठा पक्का आहे! आह्मीं चौरपुत्र भामटे! आमचे कान तिखट! आमची दृष्टि घारीसारखी! हातचलाखी तर पुसूंच नका! नाकही आमचें मोठें तिखट! कोठें काय होतें, कोठें काय चालतें, याचा सुगावा आह्मीं नाकानें लावतों! आमच्या सारख्या धूर्त लोकांची वेळ ही! आज आमची चंगळ आहे! तिकडे ती प्राप्ति झाली! वाटेंत हीं उंच वस्त्रें मिळालीं! वाटतें, यंदा ग्रह मला चांगले आले आहेत, ह्मणून असलें हस्तलाघव करण्याला कांहीं हरकत दिसत नाहीं! जावें तिकडे काम फत्तेच! बरें, आह्मीं भामटे, आह्मीं कपट करतों! पण आजचा हा चमत्कार पहा! राजपुत्रही या कामांत शिरला! बापाला न कळत स्वारी पळून चालली आहे! आणखी एक लचांडही पाठीमागें लावून घेतलें आहे! महाराजांच्या कानावर ही गोष्ट घातली, तर राजपुत्राशीं कपट केल्यासारखें होईल! आणि कपट करणें हा तर आमचा धंदाच! तेव्हां ही गोष्ट महाराजांना कळवावी!—पण नाहीं! ही गोष्ट त्यांच्या कानांवर न घातली, तर अधिक कपट केल्यासारखें होईल. तेव्हां ही गोष्ट कोणाला कळूंच देऊं नये, हेंच उत्तम! आणखी त्यांतच आमचा बाणा! अरे! पण दम खा—हे कोण आले!
(गोपाळ आणि वेड्या येतात.) हं आणखी एक शिकार! काय बोवा मोठा चमत्कार! कोठेंही जा, रस्त्यांत जा, आळींत जा, देवळांत जा, यात्रेंत जा, शेतांत जा, या धंद्यांत प्रवीण आहे त्याला काम मिळतेंच!

**वेड्या**— आतां काय ह्मणावें! बावा! एवढें महाराजांना सांगा कीं, ही कांहीं माझ्या पोटची नाहीं! सांपडली ती वाढविली आहे!

**गोपाल**—अरे पण माझें ऐकतोसका?

**वेड्या**—बावा, पण माझें अगोदर ऐकून घ्या.

**गोपाल**—बरें, तुझें होऊंदे आधीं!

**वेड्या**—आतां बघा, ही कांहीं तुमच्या पोटची नाहीं, तेव्हां तिनें जो अपराध केला, तो तुह्मीं केला नाहीं; आणि तुह्मीं अपराध केला नाहीं, ह्मणून महाराज तुह्मांला दंड करणार नाहींत! तुह्मांला ती सांपडली तेव्हां जें कांहीं तिच्याजवळ होतें तें त्यांना दाखवा—सर्व दाखवा, तिच्या अंगावर कांहीं

डागिने आहेत, ते असूं द्या. ते दाखविण्याची जरुरी नाहीं. एवढें करा, ह्मणजे महाराजांचा आपणांवरचा राग नाहींसा होईल, यांत संशय नाहीं !

**गोपाळ**—हो ! हो ! बरें सांगितलें. हें सर्व महाराजांना जाऊन सांगेन; आणि त्यांच्या पुत्रानें जें जें केलें तें तेंही सांगेन !—काय बेटा राजपुत्र ! याला खरें कसें ह्मणावें बरें ? आपल्या बापालाही फसविणार होता, आणि मलाही फसविणार होता ! मला आणि महाराजांचा व्याही करणार होता !

**वेड्या**—व्याही नाहीं झाला, तें बरें झालें ! नाहीं तर त्याचें प्रायश्चित्त केवढें घ्यावें लागतें कोण जाणें ?

**कुटिल**—(एकीकडे) ठीक आहे! हे आमचेच !

**गोपाळ**—बरें तर मग, चला आपण महाराजांकडे जाऊं, आणि या पेटींत जें कांहीं आहे, तें त्यांना दाखवूं, ह्मणजे त्यांना नवलच वाटेल !

**कुटिल**—(एकीकडे) हे महाराजांकडे चालले, तेव्हां आमच्या जुन्या धनीसाहेबांच्या जाण्याला कांहीं यापासून एकादा आडथळा तर नाहींना येणार!

**वेड्या**—महाराज वाड्यांत असोत ह्मणजे झालें.

**कुटिल**—(एकीकडे) खरें वागण्याचा आमचा धर्म नाहीं, पण प्रसंगीं खरेंही वागावें लागतें!— पण कोमट्याचा वेश घेतला होता तेव्हांच्या मोठमोठ्या मिशा काढून टाकल्या पाहिजेत!—(खोट्या मिशा काढून टाकून खिशांत घालतो.) अरे कायरे ! कोणीकडे तुह्मी चाललांरे ए गांवढळ !

**गोपाळ**—वाड्याकडे चाललों, जमादार !

**कुटिल**—आणखी तेथें कशाला जातां ? काय काम ? कोणाची भेट घेणार ? या पेटींत काय आहे ? तुह्मी राहतां कोठें ? तुमचें नांव काय ? वर्ष कितवें ? जात ? धंदा ? लवकर सांगा पाहूं ?

**वेड्या**—आह्मी आपले गरीब आहों.

**कुटिल**—तुह्मी गरीब कसले ? गलीम आहों ! लबाडी कराल तर येणार नाहीं कामाला! वाणी लोक लबाड असतात पण त्यांचीही लबाडी आह्मांपाशीं चालत नाहीं !

**वेड्या**—लबाडी पकडून द्या, मग तरी बोला !

**गोपाळ**—तुह्मी जमादार आहां वाटतें ?

**कुटिल**—आमची खुषी असो अगर नसो, आमच्या भोगाला आलें आहे खरें जमादार व्हायचें! आणि तुह्मांला नाहींका दिसत, मी जमादार आहेसा ? माझें चालणें नाहींका जमादारासारखें ? जमादाराची ऐट नाहीं का आमच्यापाशीं ? जमादाराप्रमाणें आह्मी नाहीं का तुह्मांला धुत्कारीत ? तुमचें काम काय आहे हें तुह्मांला विचारिलें ह्मणून वाटतें होय मी जमादार नाहीं? पण लक्षांत असूं द्या मी नखशिखांत जमादार आहें ! आणि माझ्या हातीं आहे तुमचें काम वाटेला लावायचें किंवा दिरंगाईवर टाकायचें !—ह्मणून ह्मणतों, सांगा तुमचें काय काम आहे तें ?

**गोपाळ**—माझें काम महाराजांशीं आहे जमादार !

**कुटिल**—आणखी तुमचे वकील कोठें आहेत?

**गोपाळ**—वकील ह्मणजे ?

**वेड्या**—बाबा ! दरबारांत इनामाला वकील ह्मणत असतील! सांगा आपणापाशीं इनाम बिनाम कांहीं नाहीं!

**गोपाळ**—आमच्याजवळ कांहींहो नाहीं इनाम द्यायला !

**कुटिल**—(एकीकडे) किती बरें भोळे लोक हे ! आमचें भाग्य कीं, आह्मीं इतके शहाणे ! आह्मीं असेच भोळे असतों, तर आह्मांलाही असेंच फसविलें असतें! बरें, असो, यांना उगीच त्रास देऊं नये!

**वेड्या**—हा दरबारांतला मोठा वजनदार जमादार असेल.

**गोपाळ**—याचीं वस्त्रें तर उंची आहेत, पण तीं नेसला आहे कसा?

**वेड्या**—यांतच खुबी आहे! साधें राहावें असें याला कशावरून वाटत नसेल? खरेंच बाबा ! हा मोठा वजनदार असला पाहिजे! त्याच्या मिशांला पीळ पाहिलाका कसा आहे तो?

**कुटिल**—बरें हा बटवाहो कसला ? यांत काय आहे? तशीच ही पेटी?

**गोपाळ**—हा बटवा, आणि ही पेटी यांविषयीं जो प्रकार आहे, तो फक्त महाराजांना कळविण्यासारखा आहे, आणि महाराजांची भेट होईल, तर त्यांना मी तो सर्व कळवीन !

**कुटिल**—ह्मातारेबोवा ! तुह्मीं उगींच इतक्या लांब आलां !

**गोपाळ**—कां बरें ?

**कुटिल**—महाराज वाड्यांत नाहींत ! त्यांचें पित्त खवळलें ह्मणून ते नौकेंत बसून गेले आहेत! तुह्मीं ऐकलें असेल त्यांचें पित्त इतकें का खवळलें तें ?

**गोपाळ**—हो! ठाऊक आहे! राजपुत्राच्या मनांत एका गौळ्याच्या मुलीशीं लग्न लावायचें होतें ह्मणून !

**कुटिल**—त्या गौळ्याला जर अजून पकडलें नसेल, आणि त्याला आपला जीव नकोसा झाला नसेल, तर त्यानें पळावें ! नाहीं तर बरी गत नाहीं ! त्याला असे मार मारतील कीं होता कीं नव्हता !

**वेड्या**—खरेंच का ?

**कुटिल**—यातनांचे नवे नवे प्रकार काढून, त्याचा छळ करितील ! आणि त्याचाच नाहीं—त्याचे आप्त, सोयरे, सर्वांचा अशा तऱ्हेनें वध होईल ! इतक्यांचा वध करणें वाईट खरें, पण केलाच पाहिजे ! गुलाम थेरडा गौळी गाई राखणारा, आणि त्यानें महाराजांशीं संबंध लावूं पहावा ! कोणी ह्मणतात, त्याला हत्तीच्या पायीं देतील! पण मला वाटतें ही शिक्षा फारच हलकी आहे ? काय? राजपद गौळवाड्यांत आणून ठेवायचें ! देहांतशिक्षेचे जितके जितके कडक प्रकार सांपडतील, तेवढे सारे असल्या अपराधाला कांहीं नाहींत !

**वेड्या**—या ह्मातान्याला मुलगा आहे, ह्मणून तुह्मीं ऐकिलें आहे होय जमादार ? आणखी असला तर त्याचें काय करणार ?

**कुटिल**—हो ! हो ! त्याला मुलगा आहे तर ! त्याला उभा चिरणार ! उन्हांत उभे करून डोकीवर धोंडा देणार ! मिरच्यांची धुरी देणार ! राखेचे तोबरे त्याच्या तोंडापुढें धरणार ! आणि शेवटीं लोखंडाची सळई तांबडी लाल करून ती त्याच्या डोळ्यांत घालणार !—पण या दुष्ट कृतघ्न बेइमानी हरामखोर दगलबाजांची गोष्ट कशाला काढावी ? त्यांचा एवढा अपराध, तेव्हां ही शिक्षा त्यांना कांहींच नाहीं ! तेव्हां त्यांचें आतां नांवच घेऊं नये ! तुह्मीं

मला भले साळसूद दिसतां, तेव्हां सांगा बरें तुमचें महाराजांशीं काय काम आहे तें! आमच्या मेहनतीकडे जर थोडें लक्ष द्याल, तर महाराजांची भेट तुह्मांला करून देईन! तुमच्या तर्फे चार शब्द बोलेन, आणि मग तुमचें नशीब! बघा, विचार करा!

वेड्या—बाबा! याचें वजन मोठें असेल असें वाटतें!—हं होऊं द्या! जुळवा याच्याशीं संधान! बटव्यांतल्या थोड्या मोहरा द्या! त्यांना अधिकार असतो, ते कोणाचें ऐकत नाहींत, पण पैसा त्यांना ऐकवितो! या दामाजीपंतापुढें सर्व हात टेंकतात!—पिशवींत छगच्छग करा! मूठ दाबा! नाहीं तर बघा हत्तीच्या पायीं देणार! नाहीं तर उभे चिरणार!

गोपाळ—जमादार! आमचें एवढें काम हातीं घ्याल, तर हें घ्या थोडें इनाम! आणखी इतकेंच पुढें देऊं! तोंपर्यंत पाहिजे तर हा तुमच्या जवळ असूं द्या!

कुटिल—पुढें? ह्मणजे काम झालें ह्मणजे?

गोपाळ—होय!

कुटिल—द्या तर अर्धें इनाम आधीं!—या कामांत तुझाही संबंध आहे?

वेड्या—हो आहे थोडासा! पण मला नाहींना उभा चिरणार?

कुटिल—तुला नाहीं उभा चिरणार! त्या गौळ्याच्या मुलाला—त्या गुलामाला—चांगली शिक्षा दिली पाहिजे!

वेड्या—बाबा! तुह्मीं धीर धरा! आपण महाराजांची गांठ घेऊं! त्याना ही सर्व हकीकत कळवूं! त्यांना सांगूं, ही आपली मुलगी नाहीं आणि माझी बहीण नाहीं! हें जर आपण न सांगूं तर मग आपली पुरी भरली!—जमादार! या वृद्ध बावांनीं तुह्मांला जेवढें इनाम देण्याचें कबूल केलें आहे, तेवढें मी देईन. पण तें काम झाल्यावर! मी पळून जाणार नाहीं! तेथपर्यंत तुह्मीं मला सोडूं नका! मग तर झालेंना?

कुटिल—माझा तुह्मांवर आहे भरंवसा! तुह्मीं माझ्या पुढें व्हा! नीट समुद्राची वाट धरा आणि उजव्या हातचा रस्ता धरा! मी हा तुमच्या पाठोपाठ आलोंच!

वेड्या—बरें झालें, हे जमादार आपणाला सांपडले! नाहीं तर आपली काय बरें दशा झाली असती!

गोपाळ—चल त्यानें सांगितलें तिकडे जाऊं! दैवानें त्याला पाठवून दिलें! (गोपाळ आणि वेड्या जातात.)

कुटिल—माझ्या मनांत जरी आलें कीं खरेपणानें वागावें, तरी माझें दैव तसें कोठें मला वागूं देतें? माझें भक्ष्य आपलें चालून येतें! आतां काय ह्मणावें? हें पहा! या प्रकरणांत दोहींकडून मला लग्गा साधणार! एकीकडून तर साधलाच, आणि आतां मी आपले पूर्वधनी जे राजपुत्र त्यांचें बरें करणार तेव्हां तिकडूनही साधणारच! कसा आणि काय हें कोणीं सांगावें? आपलें काम करावें, ह्मणजे झालें. उघडायचें असेल तर उघडेल नशीब! नाहीं तर आपलें आहेच हें सोंग! आतां या दोघां भोळ्यांना राजपुत्राकडे नेतों आणि तारवावर नेऊन सोडतो. राजपुत्राला वाटलें यांना ठेवण्यांत कांहीं हंशील नाहीं, यांच्या फिर्यादीशीं माझा संबंध नाहीं, तर देतील सोडून! देतना माझें काय जातें? "तुला या कामांत कोणीं हात

घालायला सांगितला? लुच्चा कोठला?" ह्मणून दक्षिणा मिळाली, तरी तिला काय मी भितों आहें? हा आजचा कालचा लुच्चा नव्हें, जन्माचाच आहें. आपणाला कोठें त्याची लाज आहे? ती सारी गुंडाळून ठेविली आहे. पण समजा त्यांच्या फिर्यादीशीं राजपुत्राचा कांहीं संबंध आहे, आणि यांस राजाकडे जाऊन दिलें तर त्यांत राजपुत्राचें हित आहे, मग? आंपलें दैव नाहीं का उघडणार? तेव्हां यांस आपण राजपुत्राकडे घेऊन जावें हेंच बरें. (जातो.)

## अंक ५.

**प्रवेश १.—स्थळ—सिंहलद्वीप.—राजवाडा.**

(चंद्रकांत, विद्यासागर, हारीतक, यशोदा आणि परिवार येतात.)

**विद्या०**—महाराज! आतां दुःख किती करावें? आपण पहा:—

श्लोक.

तप विचेरिलें वर्षें बारा मुनीपरि संतत;
नच अघ असें, दाहीना जें असें कठिण व्रत;
अघ न उरलें पश्चात्तापें; जडे सुकृतोकर;
ह्मणुनि न करा दुःखा, जोडीं नृपा सदया! कर!

**चंद्र०**—छे! असें कसें होईल?

श्लोक.

वसे हृदयमंदिरीं प्रणयमूर्ति ती जोंवरी,
कसा विसर तोंवरी मम पडेल चित्तांतरीं?
कुठें मधुर बोल ते? विनय तो? उदारत्व तें?
कुठें अकरुणत्व हें? मन सदा मला टोंचतें!

पहा! तिचा अंत झाल्यानें माझी कशी स्थिति झाली आहे?

श्लोक.

अति विप्रिय सांच जाहलें
हृदयीं दारुण शल्य हें सलें,
वधिली ससुता निजांगना;
गवसे शांति वदा कशी मना?

**यशो०**—आपण खरें ह्मणतां महाराज! असली माउली पुन्हां मिळायची नाहीं. वाटतें, सर्व स्त्रियांचे अंगीं जेवढें चांगुलपण आहे तेवढें एके ठिकाणीं मिळविलें तर मूर्ति कशी बनेल हें पहावें, ह्मणूनच ब्रह्मदेवानें तिला निर्मिलें होतें! आपण दुसरी करूं ह्मणाल, तर जिचा आपण वध केला तशी मिळेल तरी?

**चंद्र०**—नाहीं मिळणार खरेंच! ह्मणून निश्चयच कीं दुसरा संबंध करायचा नाहीं! तिचा वध केला!—केला—खराच केला! पण जरी वध केला, तरी तसें कोणीं ह्मटलें ह्मणजे हृदय शतधा विदीर्ण होतें! याकरितां असें वरचेवर ह्मणूं नका!

**विद्या०**—वरचेवर नव्हे, मुळींच ह्मणूं नका! यशोदाबाई! दुसरें कांहीं नाहीं का तुह्मांला बोलतां येत? प्रसंग पाहून बोलत असावें! अशावेळीं महाराजांना हिताच्या चार गोष्टी सांगाव्या, त्यांत तुमचेंही समाधान आहे!

**यशो०**—समजलें तुमच्या बोलण्याचा रोंख! महाराजांनीं पुनः लग्न करावें, अशी तुमची इच्छा?

**हारी०**—आणि तुमचीही अशीच कां नसावी? महाराजांच्या पोटीं संतान उरलें नाहीं, तेव्हां कसें? प्रजाजनांकडे पहा, त्यांच्या कुळाकडे पहा! गादीला वारस नसला तर किती अनर्थ उद्भवतील, याचा विचार

---

१. आचरण केलें. २. पातक. ३. पुण्याची खाण.

करा! आमच्या आईसाहेब निवर्तल्या! त्या पुण्यशील—पण आतां असा शोक करून किंवा महाराजांनीं द्वितीय संबंध न करून त्या परत येणार आहेत बरें? हा शोक कमी होण्याचा मार्ग, महाराजांच्या चित्तवृत्तीच्या समाधानाचा मार्ग, प्रजाजनांवर संकटें येतील तीं टाळण्याचा मार्ग, आणि एकंदरींत सर्वांचें कल्याण होण्याचा मार्ग, जर द्वितीय संबंध केल्यानें खुला होत आहे, तर त्याला तुमचीच कां आडकाठी असावी? तुह्मींच महाराजांना याबद्दल चार गोष्टी सांगाव्या, त्या तर एकीकडेच राहिल्या! उलट महाराजांच्या मनांत एकादी गोष्ट असेल, तर तिच्या आड येतां, याला काय ह्मणावें!

**यशो०**—गेली, तशी का दुसरी आतां मिळेल? आणखी असें बघा, गुरूजींचें काय ह्मणणें आहे बरें कीं हरवलेली कन्या जर सांपडणार नाहीं, तर महाराजांना दुसरें संतान लाभणार नाहीं! आतां कन्या कोठून सांपडणार? तिचा आणि त्या संस्तावकाचा एकेच वेळीं अंत झाला असावा! नाहीं तर तो परत येताना काय? ती कन्या जर सांपडणार नाहीं, तर महाराजांनीं पुन्हां लग्न तरी करण्यांत काय बरें अर्थ? पोटीं संतान होऊन तें मेलेलें पहाण्यापेक्षां, न झालेलें बरें नाहीं काय? बरें, कन्या दैवयोगें करून वांचलीच असेल, आणि पुढें मागें तिचा शोध लागेल, तर मग संतान आहेच! त्याकडेच लक्ष द्यावें आणि महाराजांनीं स्वस्थ असावें? महाराज! हे आपणाला पुन: लग्न करायला लावून दु:ख पहायला लावणार! तसें आपण करूं नये. उगीच विषाची परीक्षा कां घ्यावी? माझ्या तर मनाची खातरी आहे कीं महाराजांची कन्या अजूनही सांपडेल!

**चंद्र०**—यशोदाबाई! तुह्मीं सांगतां तें अगदीं वावगें नाहीं! तुमचें तिजवर तसेंच प्रेम होतें! आणि तीही तशीच होती! तुमचें जर त्यावेळीं मी ऐकतों, तर आज असा कां प्रसंग आला असता? माझी प्रिया जिवंत असती, माझा पुत्र गेला नसता, कन्या ही घरींच असती, आणि माझ्या सुखाला पारावार नसता! पण त्याचें आत काय?—खरेंच असें निष्कपट प्रेम पुन: कोठें सांपडणार? (‘वसे त्हृदयमंदिरीं’ इ० श्लोक पुन: ह्मणतो.)

**यशो०**—खरेंच, असली माउली या त्रिभुवनांत सांपडणार नाहीं!

**चंद्र०**—नाहीं खरीच! ह्मणूनच दुसरी करायची नाहीं! कारण मीं जर दुसरी केली, आणि तिच्यासारखी नसतांना तिजशीं जर मी चांगला वागलों, तर माझें मनच मला नाहीं का खाणार, कीं पूर्वींची चांगली असून तिचा मीं छळ केला, आणि इशीं प्रेमाचें वर्तन ठेवतों?

**यशो०**—असें मन खाईल यांत कांहीं संशय नाहीं, आणि मीही आपणाला ह्मणेन "आतांच कां बरें असें वर्तन? आणि आमच्या पहिल्या बाईसाहेबांचाच कां तसा छळ केला?"

**चंद्र०**—तुह्मी कांहीं भिऊं नका, मी दुसरें लग्न करीत नाहीं! आणि तुह्मांला छळ करण्याचा प्रसंग येऊं देतही नाहीं!

**यशो०**—मग मी सांगेपर्यंत आपण दुसरें नाहीं ना लग्न करणार?

चंद्र०—नाहीं ! न करणेंच चांगलें !

यशो०—ऐकिलेंतनाहो ! महाराजांचा निश्चय झाला कीं पुनः लग्न ह्मणून करायचें नाहीं, केलेंच तर—

विद्या०—किती पण बोलाल यशोदाबाई !

यशो०—इंदुमतीसारखी दुसरी मी आणून देईन तेव्हांच!—

विद्या०—पुरे करा आतां !

यशो०—आणि महाराजांनीं लग्न करण्याचा निश्चय केलाच—आणि तुह्मीं त्यांना लग्न करायला लावालच,—तर बायको बघायचें काम मजकडे टाकाहो! मी अशी पाहीन कीं, आपणा सर्वांस वाटेल कीं या आमच्या बाईसाहेब इंदुमतीच कीं काय?

चंद्र०—यशोदाबाई ! तुह्मीं सांगाल तेव्हां लग्न करीन ! मग तर झालेंना ?

यशो०—ह्मणजे जेव्हां आमच्या बाईसाहेब जिवंत होतील, तेव्हां !

( प्रतिहारी येतो. )

प्रति०—महाराज ! बाहेर एक सुधन्वा महाराजांचे पुत्र कमलाक्ष यांजकडून दूत आला आहे. त्याच्या मनांत महाराजांचें दर्शन घ्यावें असें आहे.

चंद्र०—येऊं दे तर त्याला आंत .(प्रतिहारी जाऊन दूतास घेऊन येतो.)

प्रति०—असें यावें ! हे महाराज येथें बसले आहेत !

दूत—महाराजांचा विजय असो ! मद्रदेशाधिप सुधन्वा महाराजांचे पुत्र कमलाक्ष यांनीं मला अशी आज्ञा केली आहे कीं " आह्मीं आपल्या पत्नीसह आपल्या दर्शनाकरितां आलों आहों असें चंद्रकांत महाराजांना जाऊन सांग ". त्याप्रमाणें महाराजांस सांगण्याकरितां आलों आहें !

चंद्र०—एकाएकींच यांचें येणें कां झालें बरें ! सुधन्वा महाराज असे येत नाहींत, तरी जरूरीचें काम असेल किंवा कांहीं संकट प्राप्त झालें असेल ह्मणून तर नसतीलना हे असे आले ? बरोबर मंडळी किती आहे ?

दूत—थोडीशीच आहे.

चंद्र०—आपल्या पत्नीसह आले आहेत, नाहीं कां ?

दूत—होय. त्यांच्या पत्नीसारखी सुंदर स्त्री या त्रिभुवनांत सांपडणार नाहीं !

यशो०—त्रिभुवनांत सांपडणार नाहीं ? एकूण आमच्या इंदुमती बाईसाहेब गेल्या, आणि या आल्या !

दूत—मी उगींच स्तुति कशाला करूं? आतां डोळ्यांनींच पहाल!

चंद्र०—विद्यासागर ! तुह्मीं कांहीं सरदार घेऊन त्यांस सामोरे जा, आणि त्यांना घेऊन या ! आमच्या प्रिय सुहृदाचे हे पुत्र (विद्यासागर, सरदार, दूत आणि प्रतिहारी जातात.) पण हा चमत्कार नव्हे काय; कीं यांनीं पूर्वीं कांहींच कळवूं नये ?

यशो०—आज आमचे धाकटे महाराज जिवंत असते, तर ते यांच्या बरोबरीचे असते. त्या दोघां मध्यें एका महिन्याचें सुद्धां अंतर नव्हतें ! तें आमचें रत्न गमावलें ! देवाची मर्जी !

चंद्र०—यशोदाबाई ! ती गोष्ट नकाहो काढूं ! कारण जो पूर्वीं

ठाणें.

श्लोक.

तनयमरणजनितशोकवन्हि सांच पेटला,
करुनि ह्रदय दृढहि जो असे गिळूनि टाकिला,
वचेनपवन[1] हा तुझा पुन्हा तयासें[2] धूपवी
नृपतिसुतागमनघृतें तो प्रदीप्त तापवी !

हे आले पहा !

(विद्यासागर, कमलाक्ष, मुक्तावळी, आणि परिवार येतात.)

**चंद्र**०—ये मला प्रेमालिंगन दे! वा:! आमच्या प्रिय सुहृदाची प्रतिकृतिच! आज जर मी वीस वर्षांचा असतों, तर मला वाटलें असतें कीं माझे जिवलग मित्रच आले! इतकें पित्यापुत्रांमध्यें सादृश्य आहे! रूप तसेंच, आणि गतिही तशीच?—हें घर तुमचेंच आहे! आपली ही पत्नीना! जोडा विधीनें उत्तम योजिला! माझें अपत्यद्वय असेंच आणि एवढेंच असतें! आणि तुह्मीं जसे नेत्रोत्सव करणारे आहां, तसें तेंही असतें! तेंही गेलें, आणि त्या बरोबर तुझ्या ताताचा सहवास आणि सख्य हीं-ही गेलीं! माझाच अपराध! दैवाला काय बोल लावावा! असो; इतकें दुःख जरी झालें आहे, तरी एकदा पुन: आपल्या प्रियकर मित्राला डोळे भरून पहावें, एवढी आशा आहे!

**कम**०—ताताच्याच आज्ञेनें मीं आपल्या दर्शनास आलों आहें. त्यांनीं बंधुप्रेमानें आपणांस कुशलवृत्त पुसलें आहे. आलीकडे जरेची छाया दिसूं लागली आहे आणि त्यांची प्रकृतिही थोडी अस्वस्थ आहे. नाहीं तर तेच स्वत: आपल्या भेटीस येणार होते! त्यांनीं मला आपणास सांगायला सांगितलें आहे कीं "माझें जरी येणें होत नाहीं, तरी सुतमुखें सुखदु:खाच्या गोष्टी कळवाव्या!—आपलें प्रेम आजचें नाहीं, तेव्हां अंतर पडेल अशी शंकाही मनांत धरूं नये!"

**चंद्र**०—खरेंच, त्यांचें प्रेम मजवर विशेष! आणि मीं त्याची फेड अशी करावी! बाळा! तुला पाहून, माझ्या पूर्व आचरणाचें स्मरण होऊन ह्रदय खळबळून जातें! मी असा कृतघ्न, आणि माझे सुहृद असे सदय! त्यांनीं माझें सांत्वन करण्याकरितां आपला प्रियकर पुत्र विस्तीर्ण जलधीच्या पार पाठविला! आणि त्याबरोबर आपली स्नुषाही पाठविली!—आलां, बरें झालें! पण या कोमल अबलेला महासागरावरील प्रवासाचीं संकटें कां भोगावयास लाविलें!

**कम**०—महाराज! मी सौराष्ट्र देशीं श्वशुरगृहीं गेलों होतों, तेथून इकडे आलों!

**चंद्र**०—एकूण हेमकांत महाराजांचें हें कन्यारत्न! ठीकच आहे!

**कम**०—होय, त्यांचेंच! त्यांची अनुज्ञा घे[ऊन] परत निघालों, आणि ताताच्या आज्ञेनें महाराजांच्या दर्शनास आलों ! आपल्या राज्यांत येण्याचेपूर्वींच आमचा बहुतेक परिवार मद्र देशास पाठवून दिला. आणि अगदीं निवडक मंडळी घेऊन इकडे आलों. आह्मीं सौराष्ट्राहून येथपर्यंत गुप्त-रूप येऊन पोहोंचलों, हें महाराजांस कळविण्याकरितां असें करणें जरूर पडलें!

**चंद्र**०—हा मजवर तुझ्या ताताचा मोठा अनुग्रहच आहे. ईश्वर करो आणि तुमचें कल्याण करो. तुझा तात फार सज्जन—त्या सत्पुरुषाविषयीं मीं पाप चिंतिलें. त्याचें

---

१. भाषणरूप वारा. २. या शोकाग्नीस.

फल ईश्वरानें दिलें!—माझें संतान उरलें नाहीं! तुझा तात पुण्यशील ह्मणून त्याच्यासारखा त्याला ईश्वरानें पुत्र दिला. शिव शिव! माझीं दोन्हीं अपत्यें जिवंत असतीं तर मजसारिखा सुखी कोण असता? माझीं दोन्हीं अपत्यें तुमच्या सारखींच मनोहर असतीं! असो; प्रभूची इच्छा!

( प्रतिहारी येतो. )

**प्रति०**—महाराज! **सुधन्वा** महाराजांकडून आपलें दर्शन घेण्याकरितां दूत आला आहे; यावर महाराजांची आज्ञा प्रमाण!

**चंद्र०**—काय! **सुधन्वा** महाराजांकडून! जा त्यास लवकर घेऊन ये.

**प्रति०**—आज्ञा, महाराज! ( असें ह्मणून त्याला घेऊन येतो. )

**दूत**—महाराज! **सुधन्वा** महाराजांनीं मला अशी आज्ञा केली आहे कीं "अरे **मैत्रेया**! **चंद्रकांत** महाराजांचें दर्शन घेऊन, त्यांस कळीव कीं, मी आपल्या भेटीस आलों आहें! माझा पुत्र **कमलाक्ष** आपली योग्यता विसरून, मज ताताला उचित मान द्यायचा तो टाकून, माझी आज्ञा उल्लंघून, आणि माझ्या सर्व आशांचा भंग करून, एक गोपकन्या घेऊन पळून गेला आहे! तो आपणाकडे आला आहे, असें समजतें, तर त्यास आपण धरून ठेवावें."

**चंद्र०**—अरे पण, **सुधन्वा** महाराज कोठें आहेत?

**दूत**—याच नगरींत आले आहेत; आणि त्यांनींच मला आपणाकडे पाठविलें! माझा संदेश ऐकून महाराजांस चमत्कार वाटेल, हें साहजिक आहे! आमचे महाराज आपल्या पुत्राला धरावें ह्मणून आपणाकडे स्वतःच येण्यास निघाले, तों वाटनें याच बाईचा बाप आणि भाऊ त्यांच्या दृष्टीस पडले! हेही वाटतें राजपुत्राबरोबर आपला देश सोडून इकडे आले!

**कम०**—एकूण **सत्यव्रता**नें विश्वासघात केला अं! त्याच्या प्रामाणिकपणाला, आणि खरेपणाला आजपर्यंत कळंक लागला नव्हता!

**दूत**—ते महाराजांच्या बरोबरच आले आहेत!

**चंद्र०**—कोण? **सत्यव्रत**?

**दूत**—होय महाराज! त्यांचें माझें आतांच भाषण झालें. ते त्या गरीब लोकांना कांहींसे प्रश्न करीत होते; तेव्हां ते किती पण घाबरले! ते पायां पडले, त्यांनीं आणा शपथा वाहिल्या, तोंडांत धूळ घालून घेतली! महाराजांना मोठाच चमत्कार वाटलासा दिसला; आणि "खरें सांगा, नाहीं तर सुळीं देईन" असें ह्मणाले!

**मुक्ता०**—हायरे कर्मा! देवा, माझ्या ताताचा कां तूं छळ करितोस!—मी वेडी, ह्मणून या नादीं लागलें! माझें मन मला पूर्वीपासूनच सांगत होतें हे कांहीं घडून येणार नाहीं! तें आलें प्रत्ययास!

**चंद्र०**—तुमचा विवाह झाला आहे कीं नाहीं?

**कम०**—नाहीं. होईल तेव्हां खरा! मीच अभागी! बिचाऱ्यांचा मजकरितां उगीच छळ होत आहे!

**चंद्र०**—काय हो! ही राजकन्या नव्हे काय?

**कम०**—राजवधू कांहीं राजकन्येहून कमी नाहीं! आणि माझा इजशीं एकदा विवाह झाला ह्मणजे ही राजवधूच आहे!

**चंद्र०**—तो "एकदा" चा प्रसंग येतो कीं नाहीं याचा संशयच! अरे बाबा! आप-

ल्या ताताची आज्ञा मानावी, हा तुझा धर्म, आणि तो तूं कसा विसरलास? तूं ज्या कन्येवर प्रेम ठेविलेंस ती सौंदर्यानें तुला अनुरूप आहे, तशीच कुळानें अनुरूप असती, तर मग नांव ठेवण्याला कारण नव्हतें!

कम०—( एकीकडे ) प्रिये! धीर धर! दैव आणि तात हीं दोन्ही जरी हात धुवून पाठीमागें लागलीं, तरी माझ्या वचनांत आणि प्रेमांत अंतर पडेल, हें बोलायलाच नको. महाराज! माझ्या वयाचे आपण असाल, तेव्हां आपणाला काय वाटत होतें, हें मनांत आणा; आणि प्रीतीचा भंग करणें किती क्रूर आहे याचाही विचार करा, आणि मग मला अनुकूल असे चार शब्द महाराजांपाशीं बोलावेसे वाटतील तर बोला! आपल्या ह्मणण्यास त्यांच्यानें ना ह्मणवणार नाहीं!

चंद्र०—तुह्मीं ह्मणतां तें मलाही खरें वाटतें, व मी त्याप्रमाणें बोलेन! याउपर तुमचें नशीब! ( आपणाशीं ) या कन्येकडे पहात असतां माझ्या चित्ताची कांहीं विलक्षण स्थिति झाली आहे! वाटतें ही कन्या निरंतर आपणा जवळच ठेवून घ्यावी! पण ही आपणाला कशानें मिळणार? अथवा कां मिळणार नाहीं? ते आयते आलेच आहेत, त्यांच्या जवळून ही मागून घ्यावी! त्यांना तरी ठेवून काय करायची आहे?

यशो०—महाराज! या कन्येकडे आपण फारसें पहातां? आमच्या बाईसाहेबांकडे तरी इतक्या प्रेमदृष्टीनें पाहत होतां काय?

चंद्र०—काय सगूं यशोदाबाई! या कन्येकडे पाहून तिची मला आठवण होते! मघांपासून मी विचार करितों आहे. तिजसारखीच ही नाहीं बरें दिसत? खरेंच, सुधन्वा महाराजांपासून मी इला मागून घेईन, आणि प्रियेसारखीच ही आहे, ह्मणून इला मी आपली कन्याच ह्मणेन! बा कमलाक्षा!—तुझें प्रेम इजवर बसलें, हें कांहीं वावगें नाहीं! तरी पण सर्व गोष्टींचा विचार केला पाहिजे! आणि मग मला जें योग्य दिसेल तें करीन! तुझें कल्याण व्हावें, अशी आमची इच्छा! तुझें मन दुखवावें असें नाहीं! पण भलतेंचही करितां येणार नाहीं! चल! तुझ्या ताताकडे जाऊं, आणि पाहूं मग कसें काय पुढें करायचें तें.—(स्वतःशीं) काय असेल तें असो, या कन्येकडे माझें प्रेम फार ओढवतें! आणि असें कां बरें?—(उजवा डोळा लवल्यासारखें दाखवून) कांहीं तरी प्रिय होणार आहे, असें दिसतें! पण चिरदृष्ट मित्रलाभावांचून दुसरें तें प्रिय कोण होणार? (जातात.)

---

### प्र०२. स्थळ.—तेंच. राजवाड्या समोरील रस्ता.

( कुटिल आणि एक गृहस्थ येतात. )

कुटिल—काय हो, त्या ह्मातार्‍यानें आपली सर्व गोष्ट सांगितली, त्या वेळीं तुह्मीं तेथें होतां काय?

१ गृहस्थ—पेटी उघडली तेव्हां होतों मी पेटी कशी सांपडली ह्मणून सर्व मजकूर त्या ह्मातार्‍या गौळ्यानें सांगितला! तेव्हां आह्मां सर्वांना बाहेर जायला सांगितलें, पण तेवढ्यांत मीं त्या गौळ्याच्या तोंडचे एवढे शब्द ऐकले "मला हें मूल सांपडलें".

कुटिल—पुढें काय झालें, हें तुह्मांस ठाऊक असेल तर सांगा! सर्व मजकूर केव्हां ऐकेन असें झालें आहे.

१ गृ०—मला सर्व मजकूर ठाऊक नाहीं. थोडाबहुत कांहीं कळला आहे, तेवढा सांगितला. महाराजांच्या आणि **सत्यव्रता**च्या मुद्रेत जो फरक पडला, त्यावरून तर मला वाटतें, कांहीं तरी विलक्षण प्रकार आहे! ते एकमेकांकडे तटस्थ पहात उभे राहिले! ते बोलत जरी नव्हते, तरी त्यांचें मौनच त्यांचें हृद्गत सांगत होतें! त्यांची मुद्रा. चेष्टा हीं सर्व वाणीचें काम करीत होतीं! त्यांच्या वृत्तीवरून तर असें वाटलें कीं यांना आज काय एक मोठा निधि सांपडला, कीं एकादा यांचा निधि हरवला! ते आश्चर्यसमुद्रांत अगदीं बुडून गेले होते! पण हें आश्चर्य कशाचें, सुखाचें कीं दुःखाचें, हें सर्व मजकूर कळण्यापूर्वीं नुसतें पहिल्यानें सांगतां येण्यासारखें नव्हतें! इतकें खरें कीं एक अतिशय सुख असेल, नाहीं तर अतिशय दुःख असेल!

( दुसरा एक गृहस्थ येतो. )

हे आमचे **मरुत्सेन** आले. यांना सर्व मजकूर कळला असेल! कायहो **मरुत्सेन**? कसें काय वर्तमान?

२ गृ०—अहो काय पुसतां? आनंदच आनंद! महाराजांच्या गुरुजींचें वचन प्रत्ययास आलें! त्यांची कन्या सांपडली! असें कांहीं आश्चर्य लोकांस वाटत आहे कीं तें कांहीं सांगतां पुरवत नाहीं.

( तिसरा एक गृहस्थ येतो. )

१ गृ०—अहो! हे तर **यशोदाबाई**च्या घरचेच! यांना जास्ती ठाऊक असेल!—कायहो! लोक ह्मणतात तें खरें का, कीं महाराजांची कन्या सांपडली ह्मणून? गोष्ट इतकी चमत्कारिक दिसते कीं खरी असेल असें एकदम वाटत नाहीं!

३ गृ०—अहो! अगदीं खरी आहे! त्याला प्रत्यंतरें पुष्कळ मिळालीं! तीं सर्व ऐकलीं तर तुह्मीही ह्मणाल कीं संशय घेण्याला अगदीं जागा नाहीं! **इंदुमती** बाईसाहेबांची शालजोडी—मुलीच्या कपाळावरील रत्नजडीत पिंपळवन—**संस्तावका**च्या हातचा लेख!—आमच्या बाईसाहेबांच्या शरीराप्रमाणें त्या कन्येच्या शरीराची ठेवण, आणि त्यांच्या सारखीच मुद्रा,—या कन्येचें मनाचें औदार्य कीं जें हलक्या कुळांत कधींच सांपडायचें नाहीं,—या आणखी दुसऱ्या पुष्कळ प्रत्यंतरांवरून सर्वांची खात्री झाली आहे कीं ही महाराजांचीच कन्या ह्मणून! बरें, दोघां महाराजांची भेट झाली, त्या वेळीं तुह्मीं तेथें होतां काय?

२ गृ०—नाहीं!

३ गृ०—तर मग पहायचें तें तुह्मीं कांहींच पाहिलें नाहीं! तो प्रसंग पाहिलाच पाहिजे होता; सांगून त्याची कल्पना होणें नाहीं! आनंदाचे उमाळे एका पाठीमागून एक येऊं लागले; आणि ते पोटांत न मातां नेत्रांच्या द्वारें बाहेर वाहूं लागले! आनंदाच्या भरांत ते तटस्थ राहत, वाटे ते इश्वराचें ध्यान करीत आहेत! त्यांची त्या वेळची मुद्रा इतकी प्रेमभरित होती कीं, ती पाहून सर्व सद्गदित झाले! आपली कन्या सांपडली या आनंदांत निमग्न असतांनाच बाईसाहेबांची आठवण होऊन

आमच्या महाराजांनीं त्याबद्दल मोठा शोक करावा ! मग सुधन्वा महाराजांपाशीं पदर पसरावा ! ह्मणावें माझा अपराध पोटांत घाला ! नंतर आपल्या जांवईबोवांला प्रेमालिंगन देऊन त्यांचें शिर हुंगावें! नंतर पुन: आपल्या कन्येला पोटाशीं धरून तिला कडकडून भेटावें ! नंतर त्या वृद्ध गोपालाचे उपकार स्मरावे ! हे तरी वृद्ध बोवा तो सर्व आनंदाचा प्रकार पाहून जुन्या खोडाप्रमाणें तटस्थच उभे होते ! खरेंच, असला प्रसंग पूर्वीं कधीं पाहिला नाहीं, किंवा ऐकिला नाहीं ! त्याचें वर्णन करण्याला वाणी समर्थ नाहीं!

१ गृ०—बरें, ज्यानें या कन्येला येथून नेलें, त्या संस्थावकाचीहो काय वाट ?

२ गृ०—तोही एक दैविक चमत्कारच ! त्याला वाघानें खाऊन टाकिलें. असें तो गोपाळाचा मुलगा सांगतो ! तो कांहीं खोटें बोलेलसा दिसत नाहीं ! आणखी शिवाय त्यानें त्याच्या हातांतली आंगठीही दाखविली !

१ गृ०—बरें, तो ज्या नांवेंतून बसून गेला होता, व त्याजबरोबर जे नाविक होते, त्यांचें कसें काय ?

३ गृ०—ती नांव त्याचवेळीं समुद्रांत बुडाली, आणि तीबरोबर सर्व नाविकही बुडून मेले, हें त्याच गोळ्यानें आपल्या डोळ्यांनीं पाहिलें ! एकंदरींत कन्येचा त्याग करण्यांत जेवढ्यांचें ह्मणून अंग होतें, तेवढे सर्व ही राजकन्या या गोपाळाला सांपडली त्या वेळींच नाहींसे झाले ! ईश्वराच्या घरचा न्याय ! पण त्यावेळीं आमच्या यशोदाबाईची काय स्थिति झाली ह्मणून सांगावी! गुरुजींचें वचन खरें झालें ह्मणून त्यांस जो आनंद झाला, तो कोठवर वर्णावा ! राजकन्येला तिनें मांडीवर घ्यावें, तिला कुरवाळावें, तिचे घे घे मुके घ्यावे, आणि कांहीं तिला पुन: दूर होऊं देणार नाहीं अशा बुद्धीनें तिला पोटाशीं घट्ट धरावें !

१ गृ०—एकूण हा प्रयोग पहायला राजेरजवाडेच पाहिजे होते ! कारण राजांनींच तो प्रयोग करून दाखविला !

३ गृ०—पण या सर्व प्रयोगांत एक स्थळ तर फारच मनोवेधक झालें. आणि त्यावेळीं तर आमच्या डोळ्यांतून टपटपां अश्रु पडले ! ते केव्हां ? महाराज बाईसाहेबांचा अंत कसा झाला हें मन मोकळें करून मोठ्या शोकाच्या आवेशानें सांगायला लागले, तेव्हांची त्या राजकन्येची स्थिति पहायची होती ! बिचारी सर्व वृत्त कान देऊन ऐकत होती ! चित्तवृत्तींत जो जो फरक पडे, तो तो तिच्या मुखकमा[illegible] रेखलेला दिसे ! आणि शेवटचा जेव्हां प्रकार सांगितला, तेव्हां " हायरे देवा ! " एवढींच अक्षरें तोंडावाटे काढून तिनें भुईवर आंग टाकिलें ! त्यासरसे सर्व ढळढळां रडूं लागले ! ज्यांचें हृदय दगडासारखें कठीण, ते सुद्धां द्रवले ! कांहीं मूर्छित झाले ! कांहीं तेथल्या तेथेंच मटकन खालीं बसले !—इतकें दुःख सर्वांना झालें ! ज्यांनीं ज्यांनीं तो प्रसंग पाहिला [illegible]ता, त्यांचीही अशीच अवस्था झाली असती !

१ गृ०—बरें, महाराज राजवाड्यांत परत गेले का ?

३ गृ०—नाहीं. राजकन्येला समजलें कीं, यशोदाबाईजवळ आपल्या आईच्या सार-

रखीच एक पुतळी आहे, ती पुतळी बरींच वर्षें भिवाजी सुतार घडीत होता, आणि ती नुक्तीच तयार झाली आहे. काय तरी पण त्या भिवाजीची कारागिरी! तो जर अमर असता, आणि आपल्या कृतींत त्यास प्राण घालतां येता, तर ब्रह्मदेवाला त्यानें विश्रांति दिली असती! इतकें याच्या आणि ब्रह्मदेवाच्या कृतींत सादृश्य आहे। ही जी इंदुमती बाईसाहेबांची यानें पुतळी केली आहे, ती इतकी त्यांच्या सारखी झाली आहे ह्मणतात, कीं आपण कांहीं बोललों तर ती आतां बोलेलच असें वाटावें! ही पुतळी पहावी ह्मणून मोठ्या प्रेमानें सर्व तिकडे गेले आहेत, आणि आजचा दिवस तेथेंच राहतील असें वाटतें!

२ गृह०—यशोदाबाईचें तेथें कांहीं तरी गूढ आहे, असें मला वाटतें. कारण पहा, इंदुमती बाईसाहेब निवर्तल्यापासून त्या वाड्यांत दररोज दोनदा तीनदा त्या जात असतात! चलतां का? आपण तिकडेच जाऊं आणि आनंदाचा वाटा घेऊं!

१ गृह०—जाण्याला परवानगी मिळाल्यावर कोण बरें तेथें जाणार नाहीं? प्रत्येक निमिषांत तेथें नवीन नवीन चमत्कार दृष्टीस पडतील! आपण तेथें न गेलों तर पाहण्याचें तें तसेंच राहील! चला!

(तिघे गृहस्थ जातात.)

कुटिल—आमच्या मागच्या वर्तनांत जर फाटा नसता, तर आज आमचें नशीब उघडलें असतें. पहा! या ह्मातार्‍याला आणि त्याच्या मुलाला मी राजपुत्राच्या नावेकडे लावून दिलें! त्याला सांगितलें कीं, याजवळ कसलीशी पेटी आहे, व तींत कांहीं तरी गूढ आहे! पण आमचे राजपुत्र काय? आपल्या प्रियेच्या नादांतच गुंग! तिला समुद्र लागला, यांनाही लागला, व लौकर कांहीं दोघांचीही प्रकृति बरी झाली नाहीं, ह्मणून हें गूढ तसेंच राहिलें! पण आपणाला काय त्याचें? आपणाला जरी हें गूढ कळलें असतें, तरी आमच्या गुणांशीं त्याचा मेळ न बसता! (गोपाळ आणि वेड्या येतात.) हें बघा. ज्यांचें मीं न कळत बरें केलें, ते आले! यांचें दैव उघडलें नाहीं, तोंच यांच्यामध्यें किती फरक पडला तो पहा!

गोपाल—अरे वेड्या! आपण आतां मोठे झालों? आपण जरी गर्भश्रीमंत नाहीं, तरी तुह्मीं मुलें आतां गर्भश्रीमंत होतील!

वेड्या—(कुटिलास उद्देशून) कसें काय? तूंचना परवां मला ह्मणाला होतास कीं तुह्मीं मोठ्या कुळांतले नाहीं? हं, पाहिलासका हा अंगरखा, हें पागोटें, हें धोतर, हा दुपेटा? हें पाहून आतां ह्मणशीलका मी मोठा नाहीं ह्मणून? ह्मण बरें पाहूं मी नाहींसा? ह्मण पण पाहूं कसें ह्मणतोस तें?

कुटिल—छे! छे! तुह्मीं आतां मोठ्या कुळांतले—कोण तुह्मांला आतां मोठे नाहीं ह्मणेल?

वेड्या—हं, आतां कसा आलास शुद्धीवर? चार घटका झाल्या आह्मीं मोठ्या कुळांतले झालों!

गोपाल—झालों खरेंच वेड्या?

वेड्या—बाबा! पण मी पूर्वीं झालों!—कारण बाबांच्या अगोदर मला राजपुत्रानें आलिंगन देऊन भाऊ असें ह्मटलें! आणि

मग मोठ्या महाराजांनीं बाबाला भाऊ ह्मटलें, आणि मग माझा भाऊ जो राजपुत्र, आणि माझी बहीण जी राजकन्या, त्यांनीं बाबाला बाबा असें ह्मटलें ? आणि मग आनंदाच्या भरांत आमच्या डोळ्यांला पाणी आलें ! मोठेपणांत आनंदाचीं आसवें हीं पाहिलींच !

**गोपाळ**—अरे एवढ्यानेंच काय झालें ? आणखीही आनंदाचे दिवस तुला दिसतील !

**वेड्या**—वाः, न दिसतील तर मग चमत्कार !

**कुटिल**—अहो महाराज ! आपले अपराध मज गरीबाकडून कांहीं झाले असतील, तर त्यांची क्षमा असावी, आणि आमचे धनीसाहेब राजपुत्र यांजपाशीं माझ्या वतीनें चार शब्द बोलावे, एवढी माझी प्रार्थना आहे !

**गोपाळ**—अरे वेड्या ! हा ह्मणतो तसें कर ! कारण आपण मोठे झालों, त्यासारखें आपण आपलें मन मोठें केलें पाहिजे अं !

**वेड्या**—तर मग आपलें वर्तन तूं सुधारशील काय?

**कुटिल**—होय महाराज !

**वेड्या**—चल तर मग. तूं माझा मित्र ! मी राजपुत्राला शपथ घेऊन सांगेन तुझ्या सारखा प्रामाणिक कोणी नाहीं ह्मणून !

**कुटिल**—सांगा, पण शपथ घेऊं नका !

**वेड्या**—आणि कां बरें शपथ घेऊं नये ? मी नाहीं का आतां मोठा झालों ! आणि मोठे झाले ह्मणजे शपथा पाहिजे तशा घ्यावा, त्यांना कोण काय ह्मणणार आहे ?

**गोपाळ**—कायरे वेड्या ! खोटी गोष्ट असली, तरी शपथ घ्यावी कायरे ?

**वेड्या**—अहो बाबा ! आपल्या मित्राकरितां पाहिजे तें करावें, असें मोठे ह्मणतात. तेव्हां त्याप्रमाणें आपणाला नको का वागायला ?—चल तूं. मी राजपुत्राला जाऊन सांगेन कीं हा मोठा हुशार आहे, आणि खरा आहे ! मला ठाऊक आहे पण—तूं हुशारही नाहींस आणि खराही पण नाहींस ! खरें, तूं हुशार असतात तर बरें होतें.

**कुटिल**—मी आपल्या कामांत हुशार राहीन !

**वेड्या**—रहाच तर मग ! ऐकलें का ? आमचे सोयरे—राजे आणि राजपुत्र—हे राणीची पुतळी पहायला चालले आहेत. चला आपणही तिकडेच जाऊं! ( जातात. )

---

**प्रवेश ३. स्थळ—तेंच. यशोदाबाईच्या वाड्यांतील दिवाणखाना.**

( चंद्रकांत, सुधन्वा, कमलाक्ष, मुक्तावली, सत्यव्रत, यशोदा, सरदार आणि परिवार येतात.)

**चंद्रकांत**—यशोदाबाई! तुमचे उपकार मी कोठवर स्मरूं ? तुह्मीं माझें कितीदा शां[illegible] करावें ?

**यशो०**—माझे कसले उपकार ? माझ्या हातून आपली पुष्कळदा आगळीक झाली असेल, तरी महाराजांचें कल्याण व्हावें, एवढी[illegible] माझी इच्छा जाणून आपण क्षमा केली, हेंच फार आहे ! आमच्या सारख्या सेवकांनीं आपणावर उपकार कसले करा[illegible]चे ? आमचा धर्मच हा कीं आप[illegible]या सेवेंत आह्मीं तत्पर असावें ! अस[illegible] पण या गरीब यशोदेच्या घरीं आपण आपले व्याही, जामात, आणि कन्या, यांस घेऊन पायधूळ झाडली, हाच मजवर मोठा उपकार झाला ! हा मी कोठें फेडूं ?

**चंद्र०**—उपकार कसला ? हा खरोखर आह्मी तुह्मांला त्रास देत आहों ! पण हें पहा ! ज्याकरितां आह्मी येथें आलों, तें काम आमचें झालें नाहीं ! तिची पुतळी पाहण्याकरितां आह्मी आलों ! आह्मीं इकडून तिकडे, तिकडून इकडे फिरलों, व दुसऱ्या पुष्कळ तसबिरी पाहिल्या ! पण पुतळी आह्मांला कोठें ठेवलेली दृष्टीस पडली नाहीं, तेवढी लौकर दाखवा ! ही आमची **मुक्तावली** ती पाहण्याला फार उत्कंठित झाली आहे !

**यशो०**—आमच्या बाईसाहेब जिवंत असतांना, त्यांची सर कोणाला तरी येत होतीका ? मग त्या निवर्तल्यावर त्यांच्या पुतळीची सर तरी दुसऱ्या पुतळ्यांना किंवा तसबिरींना येईल बरें ? आपण पुष्कळ तसबिरी पाहिल्या असतील, पुतळ्या पाहिल्या असतील, पण असलें चित्र पूर्वी कधीं पाहिलें नसेल ! इतकी ही पुतळी चांगली आहे ! ह्मणून इला मीं एकीकडेच ठेविलें आहे! चला या मजबरोबर! मी ती आपणाला दाखवितें! जिवंत प्राणी गाढ निद्रेंत असतां मेल्यासारखा भासतो, त्याच्या उलट कारागिरांची कृति असते! त्यांच्या कसबाच्या योगानें निर्जीव पदार्थ सजीवाप्रमाणें वाटतो! हें खरें कीं खोटें हें आपल्या डोळ्यांनीं पहावें! (एका खोलीच्या दारावर टांगलेला पडदा एकीकडे सारते. आंत पुतळी एका चौरंगावर उभी आहेशी दिसते.) आहेना चांगली ? आपण बोलत नाहीं, एवढ्यावरूनच चांगली आहे, आणि आपणाला आवडली असें मी समजतें! पण हें असें नाहीं! आपण तोंडानें ह्मटलें पाहिजे! पुतळी बाईसाहेबांसारखी कांहीं तरी उतरली आहे काय?

**चंद्र०**—हें काय सांगावें?

श्लोक.

अहा ! रुचिर ही कृती अनुकरी[1] प्रियेला खरी,  
कशी तिजपरी उभी अचल पादपीठावरी[2] !  
करी निजमुखें स्वयें मम जरी उपालंभना[3],  
गमे अमृत सिंचुनी उठविली मदीयांगना !

अथवा, ही पुतळी माझी निर्भर्त्सना करीत नाहीं, यांतच प्रियेचें अनुकरण अधिक करिते! कारण,

श्लोक.

केली विप्रकृता[4] जरी प्रियसखी, रुष्टा न ती जाहली;  
कोपानें वदली न ती कटुवचें[5]; शांता सदा राहिली;  
वाटे भर्तृमन प्रसन्न करिजे कैसें सतींनीच, हा  
दावावा पथ कामिनींस ह्मणुनी केली विधीनें अहा !

पण कांहो **यशोदाबाई**! या पुतळीवर जरेची छाया दिसते, तशी प्रियसखीवर नव्हती! हेंहो कसें ?

**सुध०**—नव्हती खरीच!

**यशो०**—हेंच तर कारागिराचें कसब! आज आमच्या बाईसाहेब जिवंत असत्या, तर कशा दिसत्या, हें मनांत आणून त्यानें ही मूर्ति घडली!

**चंद्र०**—अशीच, पण जर ती आज असती, तर मला केवढें समाधान होतें! पण तिची ही प्रतिकृति पाहून माझें हृदय शतधा विदीर्ण होतें!

---

१. अनुकरण करी. २. उभें रहाण्याच्या स्थानावर. ३. निंदा. ४. अप्रिय केलेली, जिचा अपमान केला आहे अशी. ५. कटु भाषणानें.

श्लोक.

हृदय-नयन-हारी ही स्थिती मत्प्रियेची,
तनु-गत असु[1] होते तेंवि भासेचि सांची !
जनककरगृहीता आपली मत्करीं ही
प्रणयविकसिताहीं[2] शोभली लोचनाहीं !

खरेंच, माझी मला लाज वाटते, कीं इतका मीं तिचा छळ करून जिवंत राहिलों आहें! ही पाषाणमय मूर्ति माझी निर्भर्त्सना करिते ! ह्मणते "अरे प्रिया! मज पाषाणापेक्षांही तूं निर्दय आहेस! मला द्रव येतो, तुझ्या चित्ताला येत नाहीं !" खरेंच, ही मूर्ति नाहीं! ही माझी प्रियाच आहे ! कारण,

श्लोकार्ध.

संचरे मम जी प्रिया हृदयांतरीं अशरीरिणी[3],
सोडुनी निलया[4] तयो[5] नयनापुढें दिसते क्षणीं !

आणखी हा चमत्कार नव्हे काय कीं,

श्लोकाचा तिसरा चरण.

शब्द एक न बोलतां छल आपुला स्मरवीतसे ?

आणि माझेंच मन विस्मयांत पाडते असें नाहीं, तर

श्लोकाचा चौथा चरण.

गोंवितें जननी सुतामन[6] विस्मयीं प्रणयीं[7] तसें !

**मुक्ता०**—आई ! मीं तुला कांहीं सुख दिलें नाहीं ! मी झालें, आणि तुझा अंत झाला! तुझें मुख जाणतेपणीं मला दिसलें नाहीं ! असो; हीच माझी आई ! इला जाऊन मी नमस्कार करितें, हीच आशीर्वाद देईल!

**यशो०**—अगे ! जवळ जाऊं नको ! येथूनच नमस्कार कर. पुतळीला रंग नुक्ताच दिला आहे तो अजून वाळला नाहीं !

**सत्य०**—महाराज ! आपण किती पण शोक कराल हा ? एक तप झालें, तरी तो कमी होऊं नये काय ? ह्मणावें तरी काय याला?

**सुध०**—दादा ! खरोखर या शोकाचें कारण मी आहें, तेव्हां या दुःखाचा कांहीं वांटा मला द्या, आणि थोडें समाधान करून घ्या !

**यशो०**—खरेंच, महाराज ! मला जर वाटलें असतें कीं, ही पुतळी पाहून आपलें मन इतकें कळवळेल, तर ही मीं आपणांस दाखविलीच नसती! (पडदा पाडावयास जाते.)

**चंद्र०**—यशोदाबाई ! हा पडदा नकाहो पाडूं !

**यशो०**—नाहीं ! आतां आणखी पहात उभें राहतां कामाचें नाहीं ! आपण ह्मणाल, ही पुतळी हालते चालतेशी.

**चंद्र०**—राहूं द्या ! राहूं द्या ! हरहर ! माझे प्राण अजून कसे राहिले आहेत ? कां नाहीं हृद्बंधनें तोडून टाकीत ? ह्मणजे तरी तिचा समागम होईल ! पण हें पहा ! होय—यांत कांहीं संशय नाहीं—कोण कारागिरानें ही पुतळी घडली?—पाहिलें का भाऊ ! नाहीं बरें पुतळी हलल्यासारखी वाटली ? खरेंच, ही जिवंतशी वाटते !

**सुध०**—कारागिराचें कसब खरें ! आतां बोलतीलशा वाटतात !

**चंद्र०**—तीं पहा पापणी लवली ! आणि तें बुबुळ फिरलें ! इतकें कौशल्य कोणाचें आहे ?

**यशो०**—महाराज ! आतां मी पडदा पाडतेंच! महाराजांना असा मोह झाला आहे, कीं ते आतां कदाचित् असें ह्मणतील कीं बाईसाहेब जिवंतच आहेत ह्मणून !

**चंद्र०**—यशोदाबाई! हें पहा—

---

१. शरीरस्थ प्राण. २. प्रीतीमुळें विकास पावलेल्या (डोळ्यांनीं). ३. शरीररहित. ४. स्थानाप्रत. ५. तें स्थान ह्म० हृदय. ६. कन्येचें मन. ७ प्रीतींत.

श्लोक.

आत्मा त्यजी जोंवरि हा न देह,
राहोच माझा सुखकारि मोह !
तत्त्वावबोधें सुख हो न तैसें,
मोहें अशा होय मनास जैसें ?

याकरितां, हा पडदा टाकूं नका !

**यशो०**—महाराज! मला वाईट वाटतें, कीं मीं आपणाला इतकें उद्विग्न केलें ! पण याहीपेक्षां आपणाला मला उद्विग्न करितां येईल !

**चंद्र०**—तर मग कराच यशोदाबाई ! कारण या उद्वेगांत असा कांहीं आनंद आहे, कीं तो कोणत्याही सुखांत नाहीं!—तरी पण—आतां इनें उच्छ्वास टाकिलासा वाटतो! कितीही कुशल कारागीर असो, त्याला आपल्या कृतींत प्राणानिल[2] घालितां येईल काय? कांहीं असो; माझी खातरी आहे कीं ही जिवंत आहे ! तुम्ही हंसा, पण मी जाऊन हात लावून पहाणार!

**यशो०**—महाराज ! एवढें मात्र करूं नका ! कारण पुतळीला रंग नुक्ताच दिला आहे, तो आपण हात लावल्यानें खराब होईल, आणि आपल्याही हाताला तेल लागेल! आतां हा पडदा टाकतेंच.

**चंद्र०**—नका नका! मी असा रात्रंदिवस इला पहात राहीन !

**मुक्ता०**—आणि मीही पण राहीन !

**यशो०**—महाराज! आतां असें एक तरी करा, कीं आपण येथून चला! नाहीं, तर मी याहूनही एक मोठाच चमत्कार दाखवितें तो पहायला मन स्थिर करा ! आपण पहायला तयार असाल, तर मी आपणाला पुतळी चालवून दाखवितें ! ती चौरंगावरून उतरून येईल, आणि आपल्या कन्येला पोटाशीं धरील. पण तुम्हीं ह्मणाल कीं इनें मंत्रविद्या साधन करून भूतचेष्टा दाखविली ! पण तसा कांहीं एक प्रकार नाहींहो !

**चंद्र०**—तुम्हीं इजकडून जें करवाल, तें पहाण्याला मी तयार आहें! कारण,

श्लोक.

देई विलोचनसुखास तदीय चेष्टा,
वाणी तशी सुखकरा श्रवणांस इष्टा !
देतां जरी चलन ये इजला तुम्हांला
कां उक्ति देउनि न द्यां सुख यां जनाला ?

**यशो०**—तर मग व्हा तयार चमत्कार पहायला! कोणी गडबड करूं नका ! ज्यांना ही भूतचेष्टा वाटत असेल, त्यांनीं पाहिजे तर बाहेर जावें!

**चंद्र०**—हूं! दाखवा चमत्कार! कोणी बाहेर जाणार नाहीं.

**यशो०**—बरें तर, मंगलवाद्यांचा गजर ऐकून आमच्या बाईसाहेब जागृत होतील.

(वाद्यांचा गजर होतो.)

बाईसाहेब ! समय प्राप्त झाला ! चौरंगावरून खालीं या ! पाषाणमय राहूं नका ! या ! सर्वांना चमत्कार दाखवा या! या आतां ! जडता टाकून द्या आणि या !—पहा ! त्या हलूं लागल्या. ( इंदुमती चौरंगावरून खालीं येते. ) आश्चर्य वाटूं देऊं नका ! भिऊं नका ! ही भूतचेष्टा नव्हे ! ही तुमचीच पत्नी आहे ! यांचा धिक्कार करूं नका ! कारण तो त्यांस मरणप्राय होईल ! महाराज ! तरुणपणीं

१. खरें काय आहे त्याच्या ज्ञानानें. २. प्राणवायु.

१. मला.

यांची आपण विनवणी केली असेल, मोठे-
पणीं या आपली विनवणी करीत आहेत!

चंद्र०—खरेंच! ही भूतचेष्टा नव्हे ! इचें अंग थंड लागत नाहीं !

०—खरोखरच या जिवंत आहेत !

०—तर मग बोलत कां नाहींत ? यांचे ुर शब्द आमच्या कानीं पुनः एकवार ां पडत नाहींत ?

—यशोदाबाई !—हें एक मोठेंच गूढ आहे ! या जिवंत होत्या, तर होत्या कोठें? व निवर्तल्या होत्या, तर जिवंत कशा झाल्या?

०—या जिवंतच होत्या, असें जर मीं सांगितलें, तर ह्मणाल या ह्मातारीला चळ लागला आहे! जरी अजून बोलत नाहींत, तरी पण जिवंतच आहेत! थोडा दम खा—ह्मणजे बोलतीलही या! ये बाई! आपल्या आईला नमस्कार कर, ह्मणजे ती तुला आशीर्वाद देईल! बाई! ही आपली **मुक्तावली** सांपडली बरें!

इंद्र०——सर्व देव माझ्या कन्येकडे प्रेमदृष्टीनें पाहोत, आणि हिचें कल्याण करोत! बये! कोणीं ग तुझें लालन पालन केलें? कोठें तूं होतीस ? आणि कधीं येथें पुनः आलीस ? **यशोदाबाईनें** मला सांगितलें, कीं गुरुजींचें असें वचन आहे कीं तूं सांपडशील, तेव्हां तें कधींही खोटें ठरणार नाहीं या भरंवशावर राहून, तुला एकदा पहावें एवढ्याच आशातंतूवर प्राण राखून ठेवले!—

यशो०—हें सर्व सांगायला अजून पुष्कळ वेळ आहे! यांची गोष्ट झाली ह्मणजे मग तुह्मांला आपली गोष्ट सांगावी लागेल! ह्मणून फावल्या वेळीं सर्व सांगतां येईल!—ालें बाई एकदाचे देवानें सुखाचे दिवस दाखविले ? माझें काय आतां उरलें आहे? सर्व हौस झाली. जाईन आतां एखाद्या क्षेत्रीं आणि बसेन तेथें रामराम ह्मणत !

चंद्र०—**यशोदाबाई** ! तुह्मीं मला डोईखांद्यावर घेऊन वाढविलें, आणि आतां माझी प्रिया मला समर्पिली ! मला तर त्यावेळीं वाटलें कीं हिनें प्राण सोडले ! मी मोहांतच होतों, त्यावेळीं मला तुह्मीं फसविलें, पण हा मी उपकारच स्मरतों. तुमचे उपकार कोठें फेडावे ? तसेच—हे **सत्यव्रत** !—यांचाही ह्यां दुष्टानें छळ केला! पण हे **सत्यव्रत** ते सत्यव्रतच ! यांनीं दोन्ही कुळांचें कल्याण केलें. यांचे तरी उपकार कोठवर स्मरावे ! येथून आपण जाऊं काय? अझून ही शंका तुझ्या मनांतली गेली नाहीं काय ? याजकडे बघ—हा माझा भाऊच ! ह्यां चांडाळानें व्यर्थ कल्पना घेतली ! हा माझा व्यामोह ! या आपल्या कन्येवर **कमलाक्षाचें** मन जाणों विधीनेंच बसविलें, तेव्हां हा आपला जामात होणार ! चल ! मग फावल्यावेळीं एकमेकांचें वृत्त एकमेकांस विचारतां येईल ! तूर्त ज्या जगद्गुरूच्या प्रसादेंकरून हा सुदिन उगवला, त्यास नमस्कार करून अनन्यभावें शरण जाऊं आणि त्याची प्रार्थना करूं !—

श्लोक.

कालीं वर्षोनि धारा अमित तृणवती तुष्टिदा भूमि होवो,
दुष्टांचा हेतु होवो विफल, सफलते साधुचा यत्न पावो,
झाली मोहप्रभावें मति अतिकलुषा ती प्रसादास पावो,
मोहांधां सर्वलोकां विलसित सगळें हें खरा मार्ग दावो!

( सर्व जातात. )

---

१. सफलतेला पावो=सफल होवो. २. अत्यंत गढुळ. ३. प्रसन्नतेस. स्वच्छतेप्रत. ४. चरित्र. ( व्यंग्य अर्थ ) हें मोहविलसित नाटक.